इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

मुंबई उच्च न्यायालय
दिवाणी अपिलीय अधिकारीता

रिट याचिका क्र. २०६८/२०२५

लक्झएम्पायर रिअल्टी प्रायव्हेट लिमिटेड.
कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत
नोंदणीकृत खाजगी मर्यादित कंपनी,
जिचे नोंदणीकृत कार्यालय सर्वे क्र. २७१,
सी.टी.एस. ४३३७, प्लॉट क्र. ३,
श्रिनिधर नगर, पुणे – ४११ ००३ येथे आहे. ... याचिकाकर्ता

विरुद्ध

१. **एमिनन्स लँडमार्क्स एलएलपी**
मर्यादित दायित्व भागीदारी,
एलएलपी अधिनियम, २००८
अंतर्गत नोंदणीकृत, नोंदणीकृत कार्यालय:
दुकान क्र. १, सिंड्रेला अपार्टमेंट्स,
६०१, साचापीर स्ट्रीट, पुणे – ४११ ००१.

२. **मे. गगन प्लॅटिनम स्पेसेस एलएलपी**
मर्यादित दायित्व भागीदारी,
एलएलपी अधिनियम, २००८ अंतर्गत नोंदणीकृत,
नोंदणीकृत कार्यालय: १५/बी, वेल्लेस्ली कोर्ट,
वेल्लेस्ली रोड, लाल देवल जवळ, कॅम्प,
पुणे – ४११ ००१.

३. **श्री सुशील घनश्याम अग्रवाल**
कार्यालयाचा पत्ता: १५/बी, वेल्लेस्ली कोर्ट,
वेल्लेस्ली रोड, लाल देवल जवळ, कॅम्प,
पुणे – ४११ ००१.

४. **श्री अल्नेश मोहम्मदाकील सोमजी**
कार्यालयाचा पत्ता: १५/बी, वेलस्ली कोर्ट,
वेल्लेस्ली रोड, लाल देवल जवळ, कॅम्प,
पुणे – ४११ ००१.

५. **श्री विशाल घनश्याम अग्रवाल**
कार्यालयाचा पत्ता: १५/बी, वेल्लेस्ली कोर्ट,
वेल्लेस्ली रोड, लाल देवल जवळ, कॅम्प,
पुणे – ४११ ००१.

६. **मे. गगन ऐस डेव्हलपर्स**
भागीदारी फर्म, भागीदारी अधिनियम, १९३२
अंतर्गत नोंदणीकृत, नोंदणीकृत कार्यालय:
१५/बी, वेल्लेस्ली कोर्ट, वेल्लेस्ली रोड,
लाल देवल जवळ, कॅम्प, पुणे – ४११ ००१.

७. **मे. गगन ऐस होरायझन**
भागीदारी फर्म, भागीदारी अधिनियम,
१९३२ अंतर्गत नोंदणीकृत, नोंदणीकृत
कार्यालयाचा पत्ता: १५/बी, वेल्लेस्ली कोर्ट,
वेल्लेस्ली रोड, लाल देवल जवळ, कॅम्प,
पुणे – ४११ ००१.

८. **मे. गगन उन्नती व्हेंचर्स ए.ओ.पी.**
संयुक्त उद्यम, व्यक्तींच्या संघाच्या
स्वरूपात स्थापन,पत्ता: १५/बी, वेल्लेस्ली कोर्ट,
वेल्लेस्ली रोड, लाल देवल जवळ, कॅम्प,
पुणे – ४११ ००१.

९. गगन आय-लँड टाउनशिप प्रायव्हेट लिमिटेड
खाजगी मर्यादित कंपनी,
नोंदणीकृत कार्यालय: १५/बी, वेल्लेस्ली कोर्ट,
वेल्लेस्ली रोड, लाल देवल जवळ, कॅम्प,
पुणे – ४११ ००१. ... उत्तरवादी

श्री. वेंकटरमण धोंड, वरिष्ठ वकील, सोबत श्री. रोहन केळकर, सौ. करिश्मा राव, श्री. विवेक शेठ्टी, सौ. शेरिल फर्नांडिस, श्री. अंकित पाल आणि श्री. नामन नैय्यर, हे ए.झेड.बी. अँड पार्टनर्स यांच्या सूचनेवर, याचिकाकर्ता यांच्या वतीने उपस्थित.
श्री. दारियस खंबाटा, वरिष्ठ वकील, सोबत श्री. रोहान कामा, श्री. करण रुख़ाना, श्री. कायरस मोदी, श्रीमती. विधी शाह, श्री. हरीप्रसाद शेठ्टी, श्री. अभिषेक श्रीनिवासन, श्रीमती. ज्युलियस डिसोझा आणि श्री. प्रदीप कुमार हे उत्तरवादी क्रमांक १ यांच्या वतीने उपस्थित.
श्री. यश जरीवाला, उत्तरवादी क्रमांक २ ते ८ यांच्या वतीने उपस्थित.
श्री. आमिर अर्सीवाला सोबत सौ. वैश्णवी धुरे आणि श्रीमती. रश्मी जैन उत्तरवादी क्रमांक ९ यांच्या वतीने उपस्थित.

न्यायमंच	**:**	**न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि** **न्यायमूर्ती अद्वैत एम. सेठना**
दिनांक	**:**	**१६ ऑक्टोबर, २०२५**

न्यायनिर्णय (न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी यांच्याद्वारे,)

१. या न्यायनिर्णयाचे विश्लेषण सुलभ व्हावे यासाठी खालील विभागांमध्ये विभाजन केले आहे: –

विभाग	शीर्षक	परिच्छेद क्रमांक
अ	प्रस्तावना	३
ब	तथ्ये	४ ते २१
क	याचिकाकर्त्याच्या वतीने मांडणी	२२ ते ३३
ड	उत्तरवादी क्र. १ च्या वतीने मांडणी	३४ ते ५४
इ	याचिकाकर्त्याच्या वतीने प्रत्युत्तर मांडणी	५५ ते ६६
फ	विश्लेषण व आदेश	६७ ते १३०

२. न्यादेशावर त्वरित उत्तर मागवण्यात आले. उत्तरवादीने नोटीस बजावणीचा हक्क सोडला. पक्षकारांच्या संमतीने अंतिम सुनावणी घेण्यात आली.

अ. प्रस्तावना:

३. जरी ही याचिका स्वरूपाने संक्षिप्त असली तरी, तिच्यातून काही महत्त्वपूर्ण प्रश्न निर्धारणासाठी उद्भवतात, ही कार्यवाही विद्वान एकल लवादकाने दिलेल्या वादग्रस्त आदेशातून उद्भवते, ज्यामध्ये एक तृतीय पक्ष जो ना लवाद कराराचा पक्षकार आहे, ना "गट कंपनी सिद्धांताच्या" (group of companies doctrine) च्या परिघात येतो त्याला लवाद कार्यवाहीत पक्षकार/उत्तरवादी म्हणून सामील करता येईल का, हा प्रश्न निर्माण होतो. सदर लवाद कार्यवाही उत्तरवादी क्र. १ एमिनन्स लॅंडमार्क्स एलएलपी (संक्षेपाने “मे. एमिनन्स”) आणि उत्तरवादी क्र. २ मे. गगन प्लॅटिनम स्पेसेस एलएलपी (संक्षेपाने “मे. गगन”) या दोघांमधील प्रलंबित लवाद कार्यवाही आहे, जे मुख्य पक्षकार

आहेत. दुसरा प्रश्न असा निर्माण होतो की, वादग्रस्त आदेशाचे स्वरूप आणि कायद्याची स्थिती लक्षात घेता, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत दाखल केलेले सध्याचे प्रकरण, लवाद न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्यासाठी स्वीकारले जाऊ शकते का.

ब. **तथ्ये**

४. सध्याच्या कार्यवाहीच्या न्यायनिर्णयासाठी संबंधित तथ्ये पुढीलप्रमाणे आहेत: याचिकाकर्ता – लक्सएम्पायर रिअल्टी प्रायव्हेट लिमिटेड ही एक खाजगी मर्यादित कंपनी असून ती पुणे शहर व त्याच्या परिसरातील निवासी आणि व्यावसायिक विकासासाठी जमीन खरेदी करण्याच्या व्यवसायात गुंतलेली आहे. याचिकाकर्त्याचे प्रकरण असे आहे की, उत्तरवादी क्र. ९ आणि याचिकाकर्ता यांच्यात दिनांक २९ मार्च, २०२४ रोजी झालेल्या हस्तांतरण दस्ताच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेली जमीन, जी प्लॉट क्र. २६२ आहे, ती जमीन संगमवाडी टाउन प्लॅनिंग योजना क्र. ३ अंतर्गत संगमवाडी गावामध्ये, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित आहे (थोडक्यात "सदर जमीन"), त्या जमिनीचे ते सद्भावनाधारक खरेदीदार आहेत.

५. मे. एमिनन्स ही लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप असून ती रिअल इस्टेट उद्यमांमध्ये गुंतवणुकीच्या व्यवसायात कार्यरत आहे. मे. गगन ही विकासक संस्था असून ती रिअल इस्टेट बांधकामाच्या व्यवसायात गुंतलेली आहे. २५ फेब्रुवारी २०१७ रोजी मे. एमिनन्स

आणि मे. गगन यांनी एक करार पत्र केले, ज्याअंतर्गत उत्तरवादी क्रमांक १ ने सदर जमिनीच्या खरेदी व विकासासाठी मे. गगन यांना रुपये २५ कोटींचे कर्ज दिले. करारातील अटींनुसार, मे. एमिनन्सला ३१ मार्च २०२० पर्यंत निश्चित हमी परतावा रुपये ५४ कोटी (यानंतर "निश्चित रक्कम" म्हणून संबोधलेली) देण्यात येईल, अशी हमी देण्यात आली होती.

६. हे निर्विवाद आहे की २५ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या करार पत्राच्याअंमलबजावणीच्या वेळी मे. गगन कडे सदर जमिनीचे मालकी हक्क नव्हते, कारण ती जमीन त्या वेळी "क्लासिक सिटी इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड" या कंपनीकडे होती. दुसऱ्या शब्दांत, मे. गगनकडे सदर जमिनीवर कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा स्वारस्य नव्हते . पक्षकारांमधील सामंज्यस्य असे होते की मे. गगन ही मे. एमिनन्सकडून मिळालेल्या निधीचा उपयोग करून सदर जमीन विकत घेईल.

७. १ सप्टेंबर २०१७ रोजी, क्लासिक सिटी इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेडने एक खरेदी खत करून सदर मालमत्ता उत्तरवादी क्र. ९ – गगन आय-लँड टाउनशिप प्रायव्हेट लिमिटेड यांच्या नावावर हस्तांतरित केली. मे. एमिनन्सचा दावा आहे की, उत्तरवादी क्र. ९ ही मे. गगन – उत्तरवादी क्र. २ ते ८ याच कॉर्पोरेट गटातील कंपनी असून, तिने करारात सहभाग घेतला किंवा त्याचा लाभ मिळविला आणि म्हणूनच त्या अटींना ती बांधील आहे.

८. सप्टेंबर २०२३ मध्ये हमी रकमेच्या परतफेडीतील कथित त्रुटींमुळे, मे. एमिनन्स यांनी मे. एमिनन्स आणि मे. गगन–उत्तरवादी क्रमांक २ यांच्यात २५ फेब्रुवारी २०१७ रोजी केलेल्या करार पत्रातील कलम क्रमांक ७ अंतर्गत लवाद कराराचा अवलंब केला आणि ३० नोव्हेंबर २०२३ रोजी उत्तरवादी क्रमांक २ ते ८ विरुद्ध लवाद कार्यवाही सुरू केली.

९. दरम्यान, डिसेंबर २०२३ मध्ये, सदर जमीन उत्तरवादी क्रमांक ९ कडून विक्रीसाठी ऑफर करण्यात आली असता, याचिकाकर्ता, एक स्वतंत्र स्थावर मालमत्ता कंपनी – ने उत्तरवादी क्रमांक ९ कडून ती जमीन खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली. त्या अनुषंगाने, ८ डिसेंबर २०२३ रोजी याचिकाकर्त्याच्या वकिलाने सदर जमिनीच्या मालकी हक्काची तपासणी करण्यासाठी सार्वजनिक सूचना जारी केली, जेणेकरून आक्षेप मागवता येतील.

त्यास प्रत्युत्तर म्हणून, २१ डिसेंबर २०२३ रोजीच्या पत्राद्वारे मे. एमिनन्सच्या वकिलांनी असा आक्षेप घेतला की, मे. एमिनन्सचा त्या जमिनीवर वैध बोजा आहे.

१०. मे. एमिनन्सने देखील एसीएच्या कलम ९ अंतर्गत पुणे येथील जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला, ज्यामध्ये सदर जमिनीवर दिलासा / अंतरीम उपाय मागण्यात आले. २२ डिसेंबर २०२३ रोजीच्या आदेशाद्वारे, विद्वान जिल्हा न्यायाधीशांनी एकतर्फी अंतरिम दिलासा (ex-parte ad-interim relief) मंजूर केला, ज्यामध्ये उत्तरवादी क्रमांक ९

ला सदर जमिनीबाबत कोणतेही तृतीय पक्ष हक्क निर्माण करण्यास मनाई करण्यात आली.

११. २७ डिसेंबर २०२३ रोजी मे. एमिनन्सने आणखी एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करून जनतेला सदर जमिनीबाबत कोणताही व्यवहार करू नये असा इशारा दिला. पुढे, ८ जानेवारी २०२४ रोजी मे. एमिनन्सने एसीएच्या कलम ९ अंतर्गत दाखल केलेल्या कार्यवाहीचा संदर्भ देत "लिस पेंडन्स" नोंदवला.

१२. जरी उत्तरवादी क्रमांक ९ हा कराराचा स्वाक्षरीदार नव्हता, तरी त्याला १६ जानेवारी २०२४ रोजी लवाद कार्यवाहीमध्ये पुढे जाऊन पक्षकार म्हणून समाविष्ट करण्यात आले.

१३. २२ मार्च २०२४ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय व आदेशाद्वारे, पुणे येथील विद्वान जिल्हा न्यायाधीशांनी मे. एमिनन्सने दाखल केलेला कलम ९ अंतर्गत अर्ज फेटाळला, असे निरीक्षण नोंदवून की सदर जमिनीवर कोणताही नोंदणीकृत दस्त बोजा निर्माण करणारा अस्तित्वात नाही आणि सदर जमिनीवरील बोजाचा मे. एमिनन्सचा दावा स्वीकारला जाऊ शकत नाही.

१४. याचिकाकर्त्याचे प्रकरण असे आहे की, सदर अर्ज फेटाळल्यानंतर हे स्थापित झाले की सदर मालमत्तेवर कोणताही विद्यमान बोजा किंवा निर्बंध अस्तित्वात नव्हते. त्यानंतर, याचिकाकर्त्याने उत्तरवादी क्रमांक ९ कडून दिनांक २९ मार्च २०२४ रोजी नोंदणीकृत हस्तांतरण दस्ताद्वारे १२८ कोटी रुपयांच्या योग्य मोबदल्यावर ती मालमत्ता

खरेदी केली. विद्वान जिल्हा न्यायाधीशांनी दिलेला आदेश मे. एमिनन्सने स्वीकारला आणि/किंवा त्याला आव्हान दिले नाही, कारण सदर आदेशाविरुद्ध दाखल केलेले अपील मे. एमिनन्सने मागे घेतले. त्यामुळे मे. एमिनन्सने दाखल केलेल्या कलम ९ अंतर्गत कार्यवाहीवरील आदेश अंतिम झाले.

१५. विद्वान लवादाने दिनांक ११ एप्रिल २०२४ च्या आदेशाद्वारे मे. एमिनन्सला लवाद कार्यवाहीमध्ये पक्षकार-उत्तरवादी म्हणून समाविष्ट केले.

१६. अशा पार्श्वभूमीवर, १२ नोव्हेंबर २०२४ रोजी मे. एमिनन्सने विद्वान एकल लवादासमोर समावेशन अर्ज दाखल करून प्रलंबित लवाद कार्यवाहीमध्ये याचिकाकर्त्याला पक्षकार-उत्तरवादी म्हणून समाविष्ट करण्याची विनंती केली. असा युक्तिवाद करण्यात आला की, याचिकाकर्त्याने लवाद कार्यवाही प्रलंबित असताना सदर मालमत्ता खरेदी केल्यामुळे, याचिकाकर्ता अनिवार्यपणे उत्तरवादी क्रमांक ९ "कडून किंवा अंतर्गत हक्क सांगणारा" आहे आणि म्हणूनच तो लवाद कार्यवाहीतील आवश्यक पक्ष आहे. १२ डिसेंबर २०२४ रोजी याचिकाकर्त्याने मे. एमिनन्सने केलेल्या समावेशन अर्जाला उत्तर दाखल केले.

१७. याचिकाकर्त्याने अर्जाला विरोध करताना असा युक्तिवाद केला की मे. एमिनन्स आणि मे. गगन यांच्यातील लवादाशी त्याचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही आणि तो २५ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या लवाद तरतूद असलेल्या करार पत्राचा पक्षकार किंवा

स्वाक्षरीदारही नाही, त्यामुळे याचिकाकर्ता आणि कोणत्याही उत्तरवादींमध्ये कोणताही लवाद करार अस्तित्वात नाही. याचिकाकर्त्याने असा आग्रह धरला की तो उत्तरवादींशी संबंध नसलेला असा स्वतंत्र कायदेशीर घटक आहे आणि केवळ मालमत्ता खरेदी केल्याने लवाद अधिकारक्षेत्रास संमती दिल्याचे समजले जाऊ शकत नाही. याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयाच्या कॉक्स अँड किंग्स लिमिटेड विरुद्ध एसएपी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड[1] या न्यायनिर्णयावर अवलंबून राहून असा युक्तिवाद केला की गट कंपनी सिद्धांत किंवा "द्वारे किंवा अंतर्गत" या संकल्पनेचा अवलंब स्पष्ट किंवा गर्भित संमतीशिवाय लागू येत नाही, कारण मे. एमिनन्स आणि मे. गगन यांच्यातील कोणत्याही लवादीय निर्णयप्रक्रियेस स्वतःला अधीन करण्याचा याचिकाकर्त्याचा किंचितही हेतू नव्हता.

१८. असा युक्तिवादही करण्यात आला की याचिकाकर्त्याचा उत्तरवादींनमधील वादाशी काहीही संबंध नाही आणि त्याने कधीही स्पष्ट किंवा गर्भित संमती दिलेली नाही की त्याच्यावर लवाद लागू होईल. तसेच कोणत्याही गर्भित संमतीचा प्रश्नच उद्भवत नाही, विशेषतः करार गोपनीयतेच्या आणि पक्ष स्वायत्ततेच्या सर्वमान्य तत्त्वांचा विचार करता. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की लवादीय कार्यवाहीची केवळ माहिती असणे याचा अर्थ असा होत नाही की त्या कार्यवाहीने बांधले जाण्याची गर्भित संमती आहे. याचिकाकर्त्याने आणखी असा युक्तिवाद केला की, याचिकाकर्ता उत्तरवादी क्र. ९

[1] (२०२४) ४ एससीसी १

'मार्फत किंवा अंतर्गत' दावा करीत नाही, कारण जर एखादा पक्ष दुसऱ्या पक्षाच्या मार्फत किंवा अंतर्गत दावा करत असेल, तर त्याने दुय्यम, कनिष्ठ किंवा गौण क्षमतेत त्या दुसऱ्या पक्षाची जागा घेतली पाहिजे आणि त्याचे स्वतंत्र अस्तित्व असू शकत नाही , अशी स्थिती सामान्यतः हस्तांतरण, सबरोगेशन किंवा करारबदल यामध्ये निर्माण होते. असा युक्तिवाद करण्यात आला की याचिकाकर्त्याने उत्तरवादी क्र. ९ कडून दिनांक २९ मार्च २०२४ च्या हस्तांतरण दस्ताद्वारे मिळकत खरेदी केल्याच्या प्रकरणात असे नव्हते, जो एक नोंदणीकृत करार होता आणि मे. एमीनन्स आणि मे. गगन यांच्यात झालेल्या दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या वित्त कराराच्या गोपनीयतेपासून दूर असलेला आणि लवादाचा विषय असलेला एक स्वतंत्र करार होता. तसेच याचिकाकर्त्याचा असा ही युक्तिवाद होता की कोणतेही हस्तांतरण, सबरोगेशन किंवा करारबदल नसताना केवळ एखादी संपत्ती खरेदी केल्याने याचिकाकर्त्याला “द्वारे किंवा अंतर्गत” हक्क सांगणारा पक्ष समजणे शक्य नाही, जेणेकरून लवाद कराराशी संबंध जोडता येईल. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की याचिकाकर्त्याचा विषय मिळकतीवर कोणताही कनिष्ठ हक्क किंवा मालकी हक्क नव्हता, जेणेकरून तो लवाद कार्यवाहीसाठी आवश्यक संमती देणारा पक्ष ठरेल, कारण याचिकाकर्ता सदर जमिनीचा एक स्वतंत्र सद्भावनाधारक खरेदीदार होता.

१९. याचिकाकर्त्याचा आणखी असा युक्तिवाद होता की सदर जमिनीवर कोणताही बोजा किंवा भार अस्तित्वात नव्हता आणि प्रत्यक्षात, विद्वान जिल्हा न्यायाधीशांनी १२ नोव्हेंबर २०२४ रोजी दिलेल्या आदेशात कलम ९ एसीए अंतर्गत अर्ज फेटाळताना स्पष्टपणे निरीक्षण नोंदवले की विषय मालमत्तेवर कोणताही बोजा नाही, आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे कोणताही बोजा नोंदणीकृत कराराद्वारे अस्तित्वात नाही. त्यामुळे ती मालमत्ता सर्व भारापासून मुक्त होती. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, जिल्हा न्यायालयाने कलम ९ एसीए अंतर्गत अर्ज फेटाळणारा जो आदेश दिला होता, त्या आदेशाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले होते, परंतु २९ जानेवारी २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे ते अपील मागे घेण्यास परवानगी देण्यात आली. त्यामुळे कोणत्याही प्रकारे, किंवा कोणत्याही कायदेशीर तत्त्वांचा अवलंब करून, याचिकाकर्त्याला लवादीय कार्यवाहीतील पक्ष म्हणून समाविष्ट करणे शक्य नाही.

२०. मेहरबान एकल लवाद यांनी २० जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या वादग्रस्त आदेशाद्वारे पक्ष समावेश अर्ज मंजूर केला. विद्वान एकल लवाद यांनी असे ठरविले की, याचिकाकर्त्याने लवादीय कार्यवाही प्रलंबित असताना उत्तरवादी क्रमांक ९ कडून विषय मालमत्ता खरेदी केली असून, मे. एमिनन्सने त्या मालमत्तेवर बोजा व हितसंबंध असल्याचा नोटीसने दावा केला होता, त्यामुळे याचिकाकर्ता उत्तरवादी क्रमांक ९ च्या “द्वारे किंवा अंतर्गत दावा करणारा” म्हणून गणला जाईल आणि म्हणूनच त्याला लवादीय

कार्यवाहीत उत्तरवादी पक्ष म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे. विद्वान एकल लवाद यांनी निरीक्षण केले की, विक्री ही जरी पूर्ण व्यवहार स्वरूपात झाली असली तरी याचिकाकर्त्याचे हक्क हे गौण स्वरूपाचे आहेत , कारण याचिकाकर्त्याने न्यायाधीकरणासमोर चालू असलेल्या लवादीय कार्यवाहीतील पक्षाकडूनच मालकीहक्क आणि ताबा प्राप्त केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा) या निर्णयावर आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्या मे. देवट्री कॉर्प. एलएलपी विरुद्ध भूमिका नॉर्थ गार्डेनिया[2] या निर्णयावर अवलंबून राहून विद्वान एकल लवाद यांनी निष्कर्ष काढला की, प्रलंबित कार्यवाहीची माहिती असताना पेंडेंट लाइट काळात मालमत्ता खरेदी करणारा नंतरचा खरेदीदार, त्या मालमत्तेशी संलग्न हक्क व जबाबदाऱ्या जितक्या प्रमाणात आहेत तितक्या मर्यादेत लवाद कराराने बांधील राहील. विद्वान एकल लवाद यांनी पुढे असेही ठरविले की सदर मालमत्तेवर वैध आणि अमलात आणता येणारा बोजा अस्तित्वात आहे की नाही हा संपरीक्षेचा विषय आहे, मात्र संपूर्ण न्यायनिर्णयाच्या हितासाठी आणि एकाधिक कार्यवाही टाळण्यासाठी, याचिकाकर्त्याची उपस्थिती आवश्यक आहे.

२१. सदर आदेशामुळे व्यथित झालेल्या याचिकाकर्त्याने, वादग्रस्त आदेश रद्द करण्याची विनंती करून ही याचिका दाखल केली आहे, ज्यामध्ये मुख्यतः असा दावा केला आहे की विद्वान लवाद यांना अशा व्यक्तीला, जी करारावर स्वाक्षरी करणारी नाही आणि जिने

2

स्पष्ट अथवा गर्भित स्वरूपात लवादासमोर जाण्यास संमती दिलेली नाही, तिला बांधील ठेवण्याचे अधिकारक्षेत्र नाही.

क. **याचिकाकर्त्याच्या वतीने मांडलेले युक्तिवाद**

२२. याचिकाकर्त्याच्या वतीने विद्वान वरिष्ठ वकील श्री. ढोंड यांनी वादग्रस्त आदेशाला आव्हान देताना खालील युक्तिवाद मांडले:

याचिकाकर्ता हा "एमिनन्स" आणि "मे. गगन प्लॅटिनम" यांच्यामध्ये झालेल्या लवाद कराराशी पूर्णपणे अनभिज्ञ आहे, कारण याचिकाकर्ता ना तर २५ फेब्रुवारी २०१७ च्या करार पत्राचा स्वाक्षरीदार होता, ना तो कोणत्याही प्रकारे थेट किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही उत्तरवादींशी संबंधित होता. याचिकाकर्ता हा उत्तरवादींशी भागभांडवल, नियंत्रण किंवा व्यवस्थापनात कोणतीही समानता नसलेले एक स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व आहे. याचिकाकर्त्याचा एकमेव संबंध असा आहे की त्याने विषयांकित जमीन उत्तरवादी क्रमांक ९ – गगन आय-लँड कडून प्रामाणिक खरेदीदार म्हणून खरेदी केली होती, आणि जो स्वतःच लवाद कराराचा स्वाक्षरीदार नव्हता तसेच लवादीय कार्यवाहीतील मूळ पक्ष नव्हता, परंतु नंतर विद्वान लवाद यांनी त्याला समाविष्ट केले.

२३. विद्वान एकल लवाद यांनी याचिकाकर्त्याला लवाद कराराच्या पक्षाच्या "द्वारे किंवा अंतर्गत" दावा करणारा असल्याच्या चुकीच्या आधारावर समाविष्ट केले जाऊ शकते, असा निष्कर्ष देण्यात घोर चूक केली आहे. असा निष्कर्ष हा कायद्यातील स्थापित नियम

व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या पूर्णपणे विरोधात आहे. सर्वोच्च न्यायालयाने सातत्याने असे ठरविले आहे की लवाद करार हा करारातून निर्माण झालेला असतो आणि तो फक्त त्या पक्षांनाच बांधील असतो ज्यांनी त्या कराराने बांधील राहण्यास संमती दिली आहे.

२४. वादग्रस्त आदेश हा एका मूलभूत गैरसमजुतीवर आधारित आहे, ज्यात असे गृहीत धरले गेले आहे की मालमत्तेचा खरेदीदार, विक्रेत्याकडून मालकीहक्क प्राप्त झाल्यामुळे, आपोआपच लवादाच्या दृष्टीने त्या विक्रेत्याच्या "द्वारे किंवा अंतर्गत दावा करणारा" ठरतो. असा तर्क कराराची गोपनीयता आणि मालमत्तेची मालकी यांचा गोंधळ करतो आणि लवादाची जबाबदारी ही मालमत्तेशी संलग्न नसते, या तत्त्वाकडे दुर्लक्ष करतो. पुढे असा युक्तिवाद मांडण्यात आला की वादग्रस्त आदेश हा स्पष्ट अधिकारक्षेत्राच्या अभावात दिला गेला असून, त्याद्वारे याचिकाकर्त्याला अन्यायकारकपणे अनावश्यक लवादीय कार्यवाहीत ओढले गेले आहे, ज्यामुळे याचिकाकर्त्याने विकत घेतलेल्या मालमत्तेचा मुक्तपणे उपभोग घेण्याचा त्याचा महत्त्वपूर्ण हक्क बाधित झाला आहे.

२५. विद्वान एकल लवाद यांनी मध्यस्थी व सलोखा अधिनियमाच्या कलम ८ मधील "द्वारे किंवा अंतर्गत दावा करणारा" या शब्दप्रयोगाचा चुकीचा वापर केला आहे. सदर शब्दप्रयोग, जसा सर्वोच्च न्यायालयाने चेरन प्रॉपर्टीज लिमिटेड विरुद्ध कस्तुरी अँड सन्स लिमिटेड[3] या प्रकरणात स्पष्ट केला आहे, तो अशा परिस्थितींना लागू होतो जसे की हक्क

[3] (२०१८) १६ एससीसी ४१३

हस्तांतरण, सबरोगेशन किंवा करारातील हक्कांचे उत्तराधिकारीत्व, जिथे एखादा व्यक्ती केवळ मालमत्तेची मालकीच नव्हे तर स्वतः लवाद करारामध्ये गौण कराराधारित हितसंबंध प्राप्त करतो. याचिकाकर्त्यासारखा खरेदीदार, जो पूर्ण विक्रीचा लाभार्थी आहे आणि ज्याच्याकडे मालमत्तेवरील संपूर्ण व स्वतंत्र मालकी आहे , त्याला कोणत्याही कायदेशीर तर्काने गौण किंवा अधीन स्वरूपात दावा करणारा म्हणता येणार नाही. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेड विरुद्ध डिस्कव्हरी एंटरप्रायझेस प्रा. लि.[4] हा निर्णय अधोरेखित करण्यात आला आहे, ज्यात सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा नमूद केले की पक्षांची संमती आणि स्वायत्तता ही लवाद प्रक्रियेची मूलभूत तत्त्वे आहेत आणि गैर -स्वाक्षरीदारांना फक्त मर्यादित व कायदेशीररित्या मान्य असलेल्या कारणांवरच म्हणजे प्रतिनिधित्व, हक्क हस्तांतरण किंवा इस्टोपल याद्वारे बांधील केले जाऊ शकते. अशा परिस्थितींच्या अभावात, गैर-स्वाक्षरीदाराला लवाद प्रक्रियेत भाग घेण्यास भाग पाडणे हे करारातील प्रायव्हिटीच्या तत्त्वाचे आणि स्वतःचे न्यायमंच निवडण्याच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन ठरते.

२६. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा) या संविधान पीठाच्या निर्णयाने पुन्हा एकदा हे तत्त्व अधोरेखित केले आहे की संमती ही लवाद प्रक्रियेची कोनशिला आहे आणि केवळ स्वाक्षरीदार व गैर-स्वाक्षरीदार यांच्यातील व्यापारी किंवा कायदेशीर संबंधांवरून संमती गृहीत धरता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले

[4] (२०२२) ८ एससीसी ४२

आहे की केवळ मर्यादित परिस्थितींमध्ये, जसे की हक्क हस्तांतरण, उत्तराधिकार किंवा करारबदल, एखाद्या व्यक्तीला इतर पक्षाच्या “तर्फे किंवा अंतर्गत दावा करणारा” म्हणता येईल. तसेच सर्वोच्च न्यायालयाचा अलीकडील एएसएफ बिल्डटेक प्रा. लि. विरुद्ध सिंप्लेक्स प्रोजेक्ट्स लि. आणि इतर[5] या निर्णयात, मुळात कॉक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा) मध्ये मांडलेली कायदेशीर भूमिका पुन्हा अधोरेखित केली आहे. याशिवाय, सर्वोच्च न्यायालयाचा अदव्या प्रोजेक्ट्स प्रा. लि. विरुद्ध विशाल स्ट्रक्चरल्स प्रा. लि. आणि इतर[6] या निर्णयानेही याचिकाकर्त्याच्या भूमिकेला संपूर्ण पाठबळ दिले आहे.

२७. विद्वान एकल लवाद यांचा हा निष्कर्ष की याचिकाकर्त्याचे हक्क “गौण” स्वरूपाचे आहेत, हा स्वतःमध्ये विसंगत आहे आणि पूर्ण विक्रीच्या तत्त्वाच्या पूर्णतः विरोधात आहे. एकदा याचिकाकर्त्याने मालमत्ता मूल्यवान मोबदला देऊन विकत घेतली की, त्याचा मालकीहक्क हा पूर्ण व स्वतंत्र स्वरूपाचा ठरतो आणि विक्रेत्यापासून स्वतंत्र होतो. असा निष्कर्ष काढणे की अशा मालकीहक्कातून लवाद करारातील कराराधारित हक्कांचे “हस्तांतरण” किंवा “प्रत्यासन” होते, हा निष्कर्ष कायदेशीररित्या टिकाऊ नाही.

२८. विद्वान एकल लवाद यांनी नमूद केलेली कारणे ही स्थापित कायदेशीर तत्त्वांचे आणि हक्क हस्तांतरण, प्रत्यासन व करारबदल या सिद्धांतांचे पुनर्निर्धारण करते आणि लवाद प्रक्रियेतील पक्षकारांना समाविष्ट करण्याच्या अधिकाराला दिवाणी प्रक्रिया संहिता,

---

[5] [२०२५ आयएनएससी ६१६]
[6] दिवाणी अपील क्र. ५२९७/२०२५.

१९०८ च्या आदेश I नियम १० अंतर्गत दिवाणी न्यायालयाच्या अधिकाराशी एकत्रीकरण करते. लावादीय अधिकारक्षेत्र हे पूर्णपणे कराराधारित असल्याने, ते न्यायसंगत सोयीसाठी किंवा सर्वांगीण न्यायनिवाड्याच्या विचारांवर आधारित करून विस्तारित करता येत नाही.

२९. विद्वान एकल लवाद यांनी याचिकाकर्त्याला लवादासाठी संमती देण्यासाठी प्रलंबित कार्यवाहीच्या माहितीवर किंवा उत्तरवादी क्र. १ ने दावा केलेल्या कथित बोज्यावर अवलंबून राहणे हे संमतीचा पर्याय ठरू शकत नाही, कारण प्रलंबित विवादाची माहिती असणे हे लवादासाठी संमती देण्यासारखे नाही. तसेच, संपत्ती हस्तांतरण अधिनियमाचे कलम ४० किंवा भारतीय ट्रस्ट अधिनियमाचे कलम ९१ लागू करणे हे पूर्णपणे चुकीचे आहे, कारण ही तरतूद मालमत्तेच्या कायद्यातील न्याय्य बंधनांना नियंत्रित करते, लवादातील अधिकारक्षेत्राच्या संमतीला नव्हे.

३०. वाद प्रलंबित असताना याचिकाकर्त्याने सदर जमीन विकत घेतल्याने लावादीय प्रक्रियेसाठी मुक संमती निर्माण होते हा निष्कर्ष पूर्णपणे न टिकणारा आहे. प्रलंबित दावा असताना केलेली खरेदी, नोटीससंबंधी दिवाणी परिणाम घडवू शकते, परंतु कोणत्याही कायदेशीर काल्पनिकतेने ती खाजगी वाद निराकरण मंचासाठी संमती ठरू शकत नाही. अन्यथा असे ठरविल्यास, लवादाला कोणत्याही मालमत्तेच्या हस्तांतरधारकावर अधिकारक्षेत्र लादण्याची परवानगी मिळेल, जे करार कायदा तसेच

सक्षम मंचासमोर न्याय मिळविण्याच्या घटनात्मक हमीच्या विरोधात ठरेल, शिवाय जेव्हा विनाकारण लावादीय प्रक्रिया याचिकाकर्त्यावर लादली जाते तेव्हा अनेक इतर कायदेशीर व घटनात्मक हक्कही बाधित होतील.

३१. म्हणून असे सादर करण्यात येते की वादग्रस्त आदेश वरवर पाहता विकृत असून त्यात अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव दिसून येतो. विद्वान लवादाने असा अधिकार वापरला आहे जो कायद्यात अस्तित्वातच नाही, कारण सही न करणाऱ्या पक्षास त्याच्या संमतीशिवाय लवादासमोर आणले आहे. असे सादर केले जाते की हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेल्या अपवादांच्या चौकटीत मोडतो, ज्या प्रकरणांत अनुच्छेद २२६ व २२७ अंतर्गत हस्तक्षेप न्याय्य ठरतो, म्हणजेच – (१) जेथे अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव असतो, (२) जेथे आदेश वरवर पाहता विकृत असतो, किंवा (३) जेथे एखादा पक्ष अधिनियमांतर्गत उपाययोजनेपासून वंचित राहतो.

३२. या संदर्भात, याचिकाकर्त्याच्या वकिलांनी पंजाब स्टेट पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड विरुद्ध ईएमटीए कोल लिमिटेड[7], भवन कन्स्ट्रक्शन विरुद्ध कार्यकारी अभियंता, सरदार सरोवर नर्मदा निगम लिमिटेड[8], सेरोसॉफ्ट सॉल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध डेक्सटर कॅपिटल ॲडव्हायझर्स लिमिटेड[9], केल्विन एअर कंडिशनिंग अँड व्हेंटिलेशन सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध ट्रायम्फ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड[10], गोदरेज सारा ली लिमिटेड

[7] (२०२१) ११ एससीसी ७१३
[8] (२०२२) १ एससीसी ७५
[9] २०२३ एससीसी ऑनलाईन दिल ५२९२
[10] २०२४ एससीसी ऑनलाईन दिल ७१३७

विरुद्ध उत्पादन आणि कर अधिकारी -सह-निर्धारण प्राधिकरण आणि इतर[11] आणि तामिळनाडू सीमेंद्व कॉर्पोरेशन लिमिटेड विरुद्ध सूक्ष्म आणि लघु उद्यम सुविधा परिषद आणि इतर[12] या निर्णयांवर अवलंबून राहून सादर केले आहे की या न्यायालयाचे अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत अधिकारक्षेत्र लागू केले जाऊ शकते जेथे लवादीय आदेशात अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव किंवा मूलभूत विकृती आढळते.

३३. शेवटी असे सादर करण्यात येते की विद्वान एकल लवादाने दिलेला वादग्रस्त आदेश: (१) कराराची गोपनीयता आणि पक्षीय स्वायत्तता या सिद्धांतांकडे दुर्लक्ष करतो, (२) "अंतर्गत किंवा मार्फत दावा करणे" या संकल्पनेचा चुकीचा उपयोग करतो, (३) कोणत्याही कायदेशीर पायाशिवाय सही न करणाऱ्या पक्षावर लवादीय अधिकारक्षेत्र विस्तारित करतो, आणि (४) विद्वान लवादाने स्पष्ट अधिकारक्षेत्रीय त्रुटी केली आहे, ज्यामुळे वादग्रस्त आदेश रद्द करण्यास पात्र ठरतो.

ड. **उत्तरवादी क्र. १ च्या वतीने युक्तिवाद**

३४. उत्तरवादी क्रमांक १ च्यावतीने विद्वान वरिष्ठ वकील श्री. खांबाटा यांनी याचिकेला विरोध करताना व वादग्रस्त आदेशाचे समर्थन करताना खालीलप्रमाणे युक्तिवाद मांडले:

सुरुवातीलाच असे सादर करण्यात येते की, सध्याची रिट याचिका टिकण्यायोग्य नाही, कारण लवाद आणि समेट अधिनियम हा स्वतःमध्ये परिपूर्ण असा कायदा आहे.

---

[11] (२०२३) एससीसी ऑनलाईन एससी ९५
[12] २०२५ एससीसी ऑनलाईन एससी १२७

असे सादर करण्यात येते की विद्वान एकल लवादाने दिलेला वादग्रस्त आदेश हा अधिनियमाच्या कलम १६ च्या व्याप्तीमध्ये पूर्णपणे येतो, ज्यामध्ये कोम्पीटेंझ-कोम्पीटेंझ (kompetenz-kompetenz) या सिद्धांताचा समावेश असून, लवादीय न्यायाधिकरणाला स्वतःच्या अधिकारक्षेत्रावर निर्णय घेण्याचा अधिकार दिला आहे, ज्यात हेही समाविष्ट आहे की कोणता पक्ष लावादीय कराराच्या व्याप्तीमध्ये येतो किंवा त्याद्वारे बांधील आहे की नाही.

३५. सर्वोच्च न्यायालयाने कॉक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा) या प्रकरणात स्पष्टपणे मान्य केले आहे की, योग्य त्या प्रकरणांमध्ये सही न करणारे पक्ष देखील लावादीय करारांनी बांधील राहू शकतात, हे मुक संमतीच्या आधारे किंवा सही केलेल्या पक्षाच्या अंतर्गत दावा करणाऱ्या व्यक्ती म्हणून. न्यायालयाने असा निर्णय दिला की संमती ही पक्षांच्या वर्तनातूनही अनुमानित केली जाऊ शकते आणि नियुक्ती, प्रत्यासन किंवा करारबदलाद्वारे उद्भवणारे व्युत्पन्न अधिकार (derivative rights) हे कराराच्या गोपनीयतेच्या सिद्धांतातील मान्य अपवाद म्हणून ओळखले जातात.

३६. विद्वान एकल लवाद यांनी, सध्याच्या प्रकरणात, याचिकाकर्ता अशा दोन्ही मान्यताप्राप्त श्रेण्यांमध्ये येतो , असा समवर्ती निष्कर्ष काढला आहे . प्रथम, याचिकाकर्त्याने प्रलंबित दावा असताना ("pendente lite") आणि लावादीय कार्यवाहीची संपूर्ण माहिती असताना दावा मिळकत खरेदी केल्यामुळे, त्याने मुक

संमतीने लावादीय प्रक्रियेने बांधील राहण्यास सहमती दर्शविली आहे. द्वितीय, उत्तरवादी क्र. ९ कडून मालकी हक्क मिळविल्यामुळे, जो स्वतः लावादीय प्रक्रियेतील एक पक्ष आहे, याचिकाकर्ता अशा संस्थेच्या अंतर्गत दावा करीत आहे. या संदर्भात कर्नाटक उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने दिलेल्या देवट्री कॉर्प. एलएलपी (सुप्रा) या न्यायनिर्णयावर अवलंबून राहण्यात आले आहे, ज्यामध्ये न्यायालयाने असे ठरविले की लावादीय कलमाने बांधील असलेल्या व्यक्तीकडून मालमत्ता खरेदी करणारा खरेदीदार देखील त्या कलमाने बांधील राहतो, कारण व्यवहाराचे लाभ व जबाबदाऱ्या या मालमत्तेबरोबर प्रवाहित होतात. असे सादर करण्यात आले की त्या प्रकरणातील तथ्ये आणि सध्याच्या प्रकरणातील तथ्ये मूळतः समान आहेत.

३७. सही न करणाऱ्या पक्षाला लावादीय कराराचा पक्ष म्हणून वागवता येईल का, हा प्रश्न अंतर्निहितरीत्या अधिकारक्षेत्राशी संबंधित असून, म्हणूनच तो लवाद आणि सामोपचार अधिनियम (एसीए) च्या कलम १६ अंतर्गत लवादी न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात स्पष्टपणे मोडतो. कोम्पीटेंझ-कोम्पीटेंझ या सिद्धांतानुसार लवाद न्यायाधिकरणालाच स्वतःच्या अधिकारक्षेत्राशी संबंधित प्रश्नांचा प्रथम निर्णय घेण्याचा अधिकार आहे. या युक्तिवादाच्या समर्थनार्थ विद्या ड्रोलिया विरुद्ध दुर्गा ट्रेडिंग कंपनी[13] व कॉक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा) या न्यायनिर्णयांवर अवलंबून राहण्यात आले आहे, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण केले की अधिकारक्षेत्राशी संबंधित

[13] २०२१ (२) एससीसी १

गुंतागुंतीचे प्रश्न - विशेषतः बहुपक्षीय वाद किंवा सही न करणाऱ्या पक्षांचा समावेश असलेले वाद हे नैसर्गिक न्यायाच्या योग्य हमीसह लवाद न्यायाधिकरणाकडे सोपविणेच उचित आहे. तसेच अजय मधुसूदन पटेल विरुद्ध ज्योत्रिंद्र एस. पटेल[14] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अशाच प्रकारच्या आव्हानावर विचार करताना स्पष्टपणे ठरविले की सही न करणारा पक्ष लावादीय कराराचा खरा पक्ष (veritable party) आहे का, याचा निर्णय तथ्यांच्या गुंतागुंतीमुळे व संबंधित सिद्धांतांच्या विचारामुळे लवाद न्यायाधिकरणानेच घ्यावा. याशिवाय, या न्यायालयाच्या कार्डिनल एनर्जी अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध सुब्रमण्या कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड[15] या न्यायनिर्णयावरही अवलंबून राहण्यात आले आहे, ज्यात असे ठरविण्यात आले की सही न करणाऱ्या पक्षाला नवीन पक्ष म्हणून दाव्यात जोडण्याचा प्रश्न जर संदर्भाच्या टप्प्यावर उपस्थित झाला नाही तरी, लवादाला असा मुद्दा, कलम १६ अंतर्गत ठरविण्याचा अधिकार आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की लवाद न्यायाधिकरणाने नवीन पक्षाला दाव्यात जोडण्याच्या प्रश्नावर घेतलेला कोणताही निर्णय नंतर अधिनियमाच्या कलम ३४ अंतर्गत आव्हानित केला जाऊ शकतो.

३८. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की सदर रिट याचिका ही भ्रामक असून, ती लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम १६(५) आणि १६(६) अंतर्गत असलेल्या वैधानिक यंत्रणेला बगल देण्याचा प्रयत्न करते. याचिकाकर्त्याने लवाद न्यायाधिकरणाच्या

---

[14] २०२५ २ एससीसी ऑनलाईन एससी १४७
[15] २०२४ एससीसी ऑनलाईन बॉम्बे ९६४

अधिकारक्षेत्रास मान्यता दिल्यानंतर आणि विद्वान लवादासमोर आपले लेखी सादरीकरण सादर केल्यानंतर, आता अंतरिम निर्धारणाला आव्हान देण्यासाठी रिट अधिकारक्षेत्र लागू करू शकत नाही.

३९. लवाद अधिनियम हा एक स्वयंपूर्ण आणि परिपूर्ण संहिता आहे , ज्याची पुनर्पुष्टी मेहरबान सर्वोच्च न्यायालयाने लवाद अधिनियम, १९९६ आणि मुद्रांक अधिनियम, १८९९[16] अंतर्गत लवाद करारांमधील परस्पर संबंध यामध्ये केली आहे. लावादीय कराराचे अस्तित्व, वैधता आणि व्याप्ती या सर्व बाबींचा निर्णय अधिनियमात दिलेल्या पद्धतीनुसारच काटेकोरपणे करण्यात यावा, असेही ठरविण्यात आले आहे.

४०. घटनेच्या अनुच्छेद २२६ आणि २२७ अंतर्गत हस्तक्षेप करणे अनुमत नाही, असे मत सर्वोच्च न्यायालयाने सततच्या न्यायनिर्णयाच्या श्रृंखलेत स्पष्ट केले आहे, जे एस.बी.पी. अँड कंपनी विरुद्ध पटेल इंजिनिअरिंग लिमिटेड[17] पासून सुरू होते आणि त्याचा पुनरुच्चार दीप इंडस्ट्रीज लिमिटेड विरुद्ध ओएनजीसी लिमिटेड[18] तसेच भवेन कन्स्ट्रक्शन (सुप्रा) मध्ये करण्यात आला आहे. लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम १६ अंतर्गत दिलेला लवाद आदेश केवळ अत्यंत मर्यादित परिस्थितीतच न्यायालयीन पुनरावलोकनास पात्र ठरतो — म्हणजेच जेव्हा त्या आदेशात अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव असतो किंवा तो वाईट हेतूने दिला गेलेला असतो, असेही भवेन कन्स्ट्रक्शन (सुप्रा) व

[16] (२०२४) ६ एससीसी १
[17] [(२००५) ८ एससीसी ६१८
[18] [(२०२०) १५ एससीसी ७०६

पंजाब स्टेट पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (सुप्रा) मध्ये ठरविण्यात आले आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की लवाद प्रक्रियेत दिलेल्या अंतरिम आदेशांविरुद्ध रिट न्यायालयांचा हस्तक्षेप फक्त त्या घटनांपुरताच मर्यादित असावा, ज्या ठिकाणी अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव किंवा वाईट हेतू सिद्ध होतो.

४१. सदर प्रकरण अशा अपवादात्मक श्रेणीत बसत नाही. लवादाने लवाद आणि समेट अधिनियमाच्या (एसीए) कलम १६ अंतर्गत असलेल्या आपल्या वैधानिक अधिकारांच्या चौकटीत राहूनच कार्य केले आहे आणि त्याच्या विरोधात वाईट हेतू किंवा विकृतपणाचा कोणताही आरोप नाही. जर याचिकाकर्ता वादग्रस्त आदेशामुळे व्यथित असेल, तर त्याला सदर आदेशाला आव्हान देण्यासाठी एसीए च्या कलम ३४ अंतर्गत पर्यायी उपाय उपलब्ध आहे.

४२. याचिकाकर्त्याचा हा दावा की विद्वान लवादाकडे “अंतर्निहित अधिकारक्षेत्र” नव्हते, हे चुकीचे आहे. एखादी व्यक्ती लावादीय कराराची पक्षकार आहे की नाही, हा प्रश्न ठरविण्याचा अधिकार स्वतः लवाद न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रातच अंतर्भूत आहे. त्यामुळे अशा अधिकाराचा वापर करताना झालेली चूक ही अधिकारक्षेत्राच्या अभावाशी समकक्ष ठरू शकत नाही.

४३. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड विरुद्ध ओम कन्स्ट्रक्शन[19] या, ह्या न्यायालयाच्या खंडपीठाच्या निर्णयावर अवलंबून राहण्यात आले आहे, ज्यात असे ठरविण्यात आले की, जोपर्यंत लवाद आदेशात अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव नाही व त्याचा दर्जा असा आहे की त्यावर कोणत्याही युक्तीवादाची गरज नाही, तोपर्यंत उच्च न्यायालयाने अशा आदेशात हस्तक्षेप करू नये.

४४. शेवटी असा युक्तिवाद करण्यात आला की, ही याचिका लवाद अधिनियमाच्या वैधानिक चौकटीला बगल देण्याचा प्रयत्न असून, घटनेच्या अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत अकाली हस्तक्षेप मागविण्याचा प्रयत्न आहे. लवादाचा आदेश हा कारणासहित आणि अधिकारक्षेत्रात राहून दिलेला आहे; आणि जर याचिकाकर्त्याला त्या आदेशाविषयी कोणतीही तक्रार असेल, तर त्याला कायद्यानुसार उपलब्ध पर्यायी उपायांचा अवलंब करता येईल

४५. वरील सर्व कारणांवरून असा निष्कर्ष काढण्यात येतो की ही रिट याचिका गुणवत्ता विरहित असून, ग्राह्य धरता येण्यासारखी नाही आणि ती फेटाळण्यात यावी.

४६. “अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव” या वाक्यप्रचाराचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने असा स्पष्ट केला आहे की, जेव्हा एखादा आदेश इतका विकृत आणि असंबद्ध असतो की ज्यावरून फक्त एकच निष्कर्ष निघू शकतो की , संबंधित

[19] (२०२३) १ एससीसी ऑनलाईन बॉम २२१९

न्यायाधिकरणाने संपूर्णतः आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन कृती केली आहे, म्हणजेच "आपल्या अधिकारक्षेत्रापेक्षा पूर्णतः भिन्न पद्धतीने" कार्य केले आहे . असे प्रतिपादन करण्यात आले आहे की, सध्याचे प्रकरण तसे नाही, कारण लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम १६ मध्ये स्पष्टपणे लवाद न्यायाधिकरणाला स्वतःच्या अधिकारक्षेत्रावर निर्णय घेण्याचा अधिकार दिलेला आहे, ज्यामध्ये लावादीय कराराचे अस्तित्व, वैधता आणि एखादा विशिष्ट पक्ष त्यास बांधील आहे का , हे प्रश्न समाविष्ट होतात.

४७. याचिकाकर्त्याने केलेले हे प्रतिपादन की, लवादाकडे सही न करणारा पक्ष लावादीय कराराचा पक्षकार आहे की नाही, हे निर्धारित करण्याचा अंतर्निहित अधिकार नव्हता, हे मूलत: चुकीचे आहे. असा प्रश्न ठरविण्याचा अधिकार स्वतःच लवाद आणि समेट अधिनियम (ACA) च्या कलम १६ मधून उद्भवतो, ज्यामध्ये "कोम्पेटेन्झ-कोम्पेटेन्झ" हा सिद्धांत अंतर्भूत आहे. त्यामुळे लवादाने याचिकाकर्त्याला नवीन पक्ष म्हणून दाव्यात जोडता येईल का, यावर निर्णय देताना ते आपल्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादेतच कार्य करत होते. त्या निर्णयाचे योग्यत्व, जरी चर्चास्पद असले, तरी ते "अधिकारक्षेत्राच्या मर्यादेत झालेली चूक" (error within jurisdiction) म्हणून गणले जाईल, "अधिकारक्षेत्रातील चूक" (error of jurisdiction) म्हणून नव्हे. या संदर्भात कॉक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा), विद्या ड्रोलिया (सुप्रा), इंटरप्ले बिटवीन आर्बिट्रेशन अँड

कन्सिलिएशन ॲक्ट, १९९६ आणि इंडियन स्टॅम्प ॲक्ट , १८९९ (सुप्रा), आकाश ऑटोमोबाईल्स विरुद्ध महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड[20], तसेच उत्तराखंड पूर्व सैनिक कल्याण निगम लिमिटेड विरुद्ध नॉर्दर्न कोलफिल्ड लिमिटेड [21] या निर्णयांचा अवलंब करण्यात आला आहे, ज्यांनुसार उत्तरवादी क्रमांक १ चे म्हणणे आहे की, लवाद न्यायाधिकरणाकडे सही न करणाऱ्या पक्षासंबंधी स्वतःचे अधिकारक्षेत्र निश्चित करण्याचा अंतर्निहित अधिकार असतो, ज्यामध्ये असा पक्ष “तर्फे किंवा अंतर्गत दावा करणारा” आहे का हे ठरविणेही समाविष्ट आहे.

४८. याचिकाकर्त्याने “अंतर्निहित अधिकारक्षेत्र” या संकल्पनेचा केलेला अर्थ लवाद न्यायाधिकरणाच्या दोन भिन्न संकल्पनांचा गोंधळ घालतो — एक म्हणजे अधिकारक्षेत्राशी संबंधित तथ्यांवर निर्णय देण्याचे न्यायाधिकरणाचे अधिकार, आणि दुसरे म्हणजे त्या तथ्यांवरील न्यायाधिकरणाच्या अंतिम निष्कर्षाचे योग्यत्व. असे प्रतिपादन करण्यात आले आहे की, पहिली बाब ही अधिकाराशी संबंधित आहे, तर दुसरी बाब ही न्यायाधिकरणाच्या कारणासहित निष्कर्षाच्या गुणवत्तेशी संबंधित आहे. विद्वान ज्येष्ठ वकिलांनी एम. एल. सेठी विरुद्ध आर. पी. कपूर[22] या निर्णयाचा दाखला देत असा युक्तिवाद केला की, जेव्हा एखाद्या न्यायाधिकरणाकडे कोणत्याही चौकशीमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार आहे, तेव्हा त्या मुद्द्यांवर निर्णय देताना झालेली कोणतीही

[20] २०२२ एससीसी ऑनलाईन बॉम्ब ८४३७
[21] (२०२०) २ एससीसी ४५५
[22] (१९७२) २ एससीसी ४२७

चूक ही अधिकारक्षेत्राच्या मर्यादेत झालेली चूक समजली जाते, आणि ती त्याच्या अधिकाराला बाधा आणणारी चूक मानली जात नाही.

४९. लवाद न्यायाधिकरणाचा, लवाद आणि समेट अधिनियमाच्या (ACA) कलम १६ अंतर्गत असलेला अधिकार हा कलम ८ किंवा ११ अंतर्गत झालेल्या पूर्वसंदर्भावर अवलंबून नाही, तसेच कोणत्याही न्यायालयाने सही न करणारा (non-signatory) पक्ष खरा पक्ष आहे का याविषयी प्रथमदर्शनी निष्कर्ष नोंदविण्यावरही अवलंबून नाही. असे प्रतिपादन करण्यात आले की हा सिद्धांत एस. बी. पी. अँड कंपनी (सुप्रा) मध्ये मान्य केला गेला आणि अजय मधुसूदन पटेल (सुप्रा) मध्ये पुन्हा अधोरेखित केला गेला, जिथे सर्वोच्च न्यायालयाने सही न करणाऱ्या पक्षाच्या स्थितीवर कोणताही प्रथमदर्शनी निष्कर्ष न नोंदविता, तो मुद्दा पूर्णपणे लवाद न्यायाधिकरणावर सोडून देत, संबंधित पक्षांना लवादाकडे पाठविले.

५०. लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम २(ह) चे कलम ७ सोबत वाचन केले असता “पक्ष” या संज्ञेची व्याख्या इतकी व्यापक आहे की त्यात सही न करणारे असे व्यक्ती देखील समाविष्ट होतात, जे कोणत्यातरी पक्षाच्या तर्फे किंवा अंतर्गत दावा करतात. ही व्याख्या चेरन प्रॉपर्टीज लिमिटेड (सुप्रा) आणि कॉक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा) या निर्णयांमध्ये मान्य करण्यात आली आहे, जिथे न्यायालयाने स्पष्ट केले की “तर्फे किंवा अंतर्गत दावा करणाऱ्या व्यक्ती” हा वाक्प्रचार असा सिद्धांत विधिमान्य

करतो की मूळ पक्षांव्यतिरिक्त प्रत्येक ती व्यक्ती, ज्याची क्षमता किंवा स्थिती कोणत्यातरी पक्षापासून व्युत्पन्न (derived) झाली आहे, ती देखील लावादीय कराराने बांधली जाते.

५१. सध्याच्या प्रकरणात, याचिकाकर्त्याने लवाद कार्यवाही प्रलंबित असताना, प्रलंबित वाद आणि प्रलंबित दावा नोटिसांची पूर्ण माहिती असताना, सदर मिळकत खरेदी केली. असा दावा करण्यात आला आहे की अशा प्रकारचा खरेदीदार हा सूचना असलेला नंतरचा ज्याच्या नावावर मिळकत हस्तांतरित केली तो (हस्तांतरिती) असून, कायद्याच्या दृष्टीने हस्तांतरण करणाऱ्या पक्षाच्या हिताचा प्रतिनिधी मानला जातो. राजकुमार विरुद्ध सरदारीलाल[23], सैला बाला दासी विरुद्ध निर्मला सुंदरी दासी[24] आणि अमितकुमार शॉ विरुद्ध फरीदा खातून[25] या निर्णयांचा दाखला देऊन असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रलंबित दावा असताना केलेला हस्तांतरिती हा हस्तांतरणकर्त्याच्या अंतर्गत दावा करणारा व्यक्ती मानला जातो आणि अशा कार्यवाहीच्या निकालाने तो बांधला जातो.

५२. जगनसिंग विरुद्ध धनवंती[26] आणि कृष्णाजी बालवनकर विरुद्ध अनुसयाबाई सीदराम गुलबिले[27] या निर्णयांवर अवलंब करून असे प्रतिपादन करण्यात आले की प्रलंबित दाव्या संबंधीची सूचना अपीलसाठीच्या मर्यादा कालावधीदरम्यान लागू राहते.

---

[23] (२००४) २ एससीसी ६०१

[24] एआयआर १९५८ एससी ३९४

[25] (२००५) ११ एससीसी ४०३

[26] (२०१२) २ एससीसी ६२८

[27] एआयआर १९५९ बॉम्ब ४७५

त्यामुळे याचिकाकर्त्याने लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम ९ अंतर्गत केलेला अर्ज फेटाळल्यानंतर लगेचच केलेली खरेदी ही प्रलंबित प्रकरणाच्या अधीन होती. म्हणूनच असा युक्तिवाद करण्यात आला की लवादाचा हा निष्कर्ष की याचिकाकर्ता उत्तरवादी क्र.९ तर्फे किंवा अंतर्गत दावा करणारा आहे आणि त्याने लावादीय प्रक्रियेसाठी मुक संमती दिली होती, हा तर्कसंगत व कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य आहे.

५३. शेवटी, असे प्रतिपादन करण्यात आले की, जरी लवादाने “तर्फे किंवा अंतर्गत दावा करणारा” या संज्ञेच्या अर्थाबाबत चूक केली, असे गृहीत धरले, तरी अशा चुकीच्या अर्थ लावण्यामुळे अनुच्छेद २२६ किंवा २२७ अंतर्गत हस्तक्षेप करण्याचे औचित्य ठरत नाही, कारण ती जास्तीत जास्त अधिकारक्षेत्राच्या मर्यादेत झालेली चूक समजली जाईल. याचिकाकर्त्याकडे लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम ३४ अंतर्गत कायदेशीर उपाय उपलब्ध आहे आणि ही याचिका स्वीकारली तर ते कायदेमंडळाच्या चौकटीच्या विरुद्ध जाणारा अप्रत्यक्ष आक्षेप मानला जाईल.

५४. वरील सर्व बाबींच्या आधारे असे प्रतिपादन करण्यात आले की वादग्रस्त आदेशामध्ये कोणतीही विकृती किंवा अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव नाही, त्यामुळे सध्याची याचिका फेटाळण्यास पात्र आहे.

इ. याचिकाकर्त्याच्या वतीने प्रत्युत्तर मांडणी

५५. मे. एमिनन्स-उत्तरवादी क्र. १ यांच्या वतीने मांडलेल्या युक्तिवादांना उत्तर देताना, श्री. धोंड यांनी मे. एमिनन्स यांच्या वतीने मांडलेल्या सादरीकरणाला विरोध केला आणि असे सादर केले की अशा सादरीकरणाने "अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव" या अभिव्यक्तीचा आणि एसीएच्या कलम १६ अंतर्गत लवादाच्या अधिकारमर्यादेचा चुकीचा अर्थ लावला आहे.

५६ असे सादर करण्यात आले की उत्तरवादी क्र. १ यांचा "अंतर्निहित अधिकारक्षेत्र" व "विषयवस्तू अधिकारक्षेत्र" यांचा गोंधळ घालण्याचा प्रयत्न चुकीचा आहे. जर असा युक्तिवाद ग्राह्य धरला, तर तो डीप इंडस्ट्रीज लिमिटेड (सुप्रा) आणि पंजाब स्टेट पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (सुप्रा) या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या विरोधात जाईल; कारण या निर्णयांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम १६ अंतर्गत अधिकारक्षेत्र नाकारण्याच्या आदेशाला, जर त्यात अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव आढळला, तर न्यायालयीन पुनरावलोकन करता येते. जर "अंतर्निहित अधिकारक्षेत्र" ही संकल्पना केवळ वादाच्या स्वरूपापुरती मर्यादित केली, तर कोणत्याही लवाद आदेशाला आव्हान देता आले नसते कारण लवादाला नेहमीच त्याला अधिकारक्षेत्र आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार असतो.

५७. "अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव" ठरविण्याची योग्य चाचणी दोन टप्प्यांत होते: (अ) प्रत्यक्षात लवादाने कोणता विषय निर्णीत केला आहे, हे पाहणे; आणि (आ)

निर्विवाद तथ्ये व प्रस्थापित कायदा यांच्या आधारे लवादाला असा निर्णय देण्याचा अधिकार होता का, हे तपासणे. जेथे लवादाच्या निर्णयामुळे स्वतःला अधिकारक्षेत्र प्राप्त होते जे कायद्याने मान्य नाही, जसे की, लावादीय प्रक्रियेसाठी कधीही संमती न दिलेल्या सही न केलेल्या व्यक्तीस कराराचा पक्ष बनविणे अशा परिस्थितीत तो आदेश अनिवार्यपणे अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या स्पष्ट अभावाने ग्रस्त ठरतो.

५८. सध्याच्या प्रकरणात, विद्वान लवादाने याचिकाकर्त्याला केवळ लावादीय प्रक्रियेत सामील करण्याऐवजी, मे. एमिनन्स आणि मे . गगन यांच्यात झालेल्या लावादीय कराराचा पक्ष बनवले आहे. असे प्रतिपादन करण्यात आले की अशा प्रकारचे कृत्य हे लवाद आणि समेट अधिनियम (ACA) च्या कलम १६ मध्ये दिलेल्या अधिकारमर्यादेपलीकडे आहे. लवादाचे अधिकारक्षेत्र केवळ पक्षांच्या संमतीवर आधारित असते, जे लावादीय करारात कलम ७ च्या अर्थाने व्यक्त केलेले असते. जर अशी संमती अस्तित्वात नसेल, तर लवादाला कोणत्याही तृतीय पक्षास लावादीय प्रक्रियेशी बांधील करण्याचा अधिकार नाही.

५९. सादर केलेल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ अदव्या प्रोजेक्ट्स प्रा. लि. विरुद्ध विशाल स्ट्रक्चरल्स प्रा. लि.[28] या सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील न्यायनिर्णयावर अवलंबून राहण्यात आले आहे, ज्यामध्ये न्यायालयाने ठरविले आहे की लवाद न्यायाधीकरणाचे कोणत्याही व्यक्तीवर अधिकारक्षेत्र गाजविण्याचे सामर्थ्य फक्त त्या व्यक्तीने लावादीय

[28] २०२५ एससीसी ऑनलाईन एससी ८०६

करारानुसार, एसीए च्या कलम ७ अंतर्गत बांधिल राहण्यास संमती दिल्यासच उद्भवते. न्यायालयाने स्पष्ट केले की अशा संमतीवरच लवादाला त्या व्यक्तीविरुद्ध बंधनकारक निवाडा देण्याचे "अधिकारक्षेत्रीय स्त्रोत" प्राप्त होतात. त्यामुळे जेव्हा संमतीच अस्तित्वात नाही, तेव्हा सही न करणाऱ्या व्यक्तीला दाव्यात नवीन पक्ष म्हणून जोडण्याचा कोणताही आदेश हा अधिकारक्षेत्राचे अतिक्रमण ठरेल.

६०. उत्तरवादी क्र.१ ने उद्धृत केलेला प्रलंबित दावा सिद्धांत पूर्णतः चुकीचा आहे. संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ च्या कलम ५२ अंतर्गत हा सिद्धांत केवळ विशिष्ट प्रकरणांनाच लागू होतो आणि त्याद्वारे लवादिय न्यायाधीकरणास अधिकारक्षेत्र प्राप्त होत नाही. उत्तरवादीने ज्या प्रलंबित दाव्याचा उल्लेख केला, तो केवळ लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम ९ अंतर्गत दाखल केलेल्या कारवाईतून उद्भवला होता, जो अंतिम रूपाने फेटाळला गेला आहे. लावादीय कार्यवाहींशी संबंधित कोणतीही प्रलंबित दावा सूचना अस्तित्वात नाही, तसेच ती गृहित धरता येत नाही.

६१. असे प्रतिपादन करण्यात आले की, गृहित धरले तरी की याचिकाकर्ता हा प्रलंबित दावा मिळकत हस्तांतरित करणारा पक्ष आहे, तरीही त्याचा तो दर्जा त्यास एसीएच्या कलम ८ च्या अर्थाने "तर्फे किंवा अंतर्गत दावा करणारी व्यक्ती" ठरवत नाही. कॉक्स अँड किंग्ज लिमिटेड (सुप्रा) या निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, "तर्फे किंवा अंतर्गत दावा करणे" ही संकल्पना ही संमतीवर आधारित आहे आणि ती केवळ त्या परिस्थितीत लागू

होते जेव्हा सही न करणाऱ्या पक्षाचे हक्क हे लावादीय करारातील सही करणाऱ्या पक्षाच्या करारात्मक हक्कांपासून व्युत्पन्न (derivative) झालेले असतात, जसे की हक्क हस्तांतरण, करारबदल किंवा उत्तराधिकार अशा प्रकरणांत. परंतु, याचिकाकर्त्याने स्वतंत्र आणि पूर्ण विक्रीद्वारे मिळकत खरेदी केल्यामुळे , त्याचे कोणतेही करारात्मक हक्क उत्तरवादी क्र. ९ कडून व्युत्पन्न झालेले नाहीत.

६२. पुढे असेही प्रतिपादन करण्यात आले की उत्तरवादी क्र.१ यांचा हा युक्तिवाद की याचिकाकर्त्याने लवादकाच्या अंतर्निहित अधिकारक्षेत्राला आव्हान दिले नाही, हा वस्तुस्थितीपरदृष्ट्या चुकीचा आहे. लावादीय न्यायाधीकरणासमोर याचिकाकर्त्याने दिलेल्या उत्तरात स्पष्टपणे नमूद केले होते की पक्षांदरम्यान कोणताही लावादीय करार अस्तित्वात नाही आणि तो त्याचा सही करणारा पक्ष नाही, त्यामुळे लवाद यांस नवीन पक्षाला दाव्यात सामील करण्याचा अधिकार नाही. लवादासमोर याचिकाकर्त्याचा सहभाग हा फक्त अधिकारक्षेत्रास विरोध करण्यापुरता मर्यादित होता आणि त्याला कोणत्याही प्रकारची संमती मानता येणार नाही.

६३. तसेच असे सादर करण्यात आले की उत्तरवादी क्र.१ यांनी केलेले हे सजेशन की, याचिकाकर्त्याने नवीन पक्षाला दाव्यात सामील करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर लगेचच या न्यायालयात यावे, ही कायद्याची चुकीची समजूत आहे. याचिकाकर्ता आपले उत्तर दाखल करण्यापूर्वीच रिट अधिकारक्षेत्र लागू करू शकला असता आणि प्रथम

लवादासमोर अधिकारक्षेत्राबाबत वाद घालण्याचा पर्याय निवडला म्हणून त्याचा नंतर स्पष्टपणे अधिकारक्षेत्राशी संबंधित आदेशाला (patently jurisdictional order) आव्हान देण्याचा हक्क हिरावला जाऊ शकत नाही.

६४. विद्वान वरिष्ठ वकील यांनी असे प्रतिपादन केले की उत्तरवादी क्र.१ यांचा हा युक्तिवाद की "तर्फे किंवा अंतर्गत दावा करणाऱ्या व्यक्तींना" संमतीशिवायही बंधनकारक मानले जाईल, हा कॉक्स अँड किंग्ज लिमिटेड (सुप्रा) व अदव्य प्रोजेक्ट्स (सुप्रा) या निर्णयांच्या रेश्यो डिसिडेंडीच्या पूर्णतः विरोधात आहे. दोन्ही निर्णयांनी हे पुन्हा अधोरेखित केले आहे की व्यक्त संमती किंवा मुक संमती ही लवादीय अधिकारक्षेत्राची मूलभूत कसोटी आहे. सही न करणारा पक्ष केवळ तेव्हाच नवीन नवीन पक्ष म्हणून दाव्यात जोडला जाऊ शकतो, जेव्हा त्याचे हक्क हे सही करणाऱ्या पक्षाच्या लवादीय करारातील करारात्मक हक्कांपासून व्युत्पन्न असतात — परंतु सद्यप्रकरणात ही अट पूर्ण झालेली नाही.

६५. याचिकाकर्त्याने पुढे असेही सादर केले की उत्तरवादी क्र.१ यांनी वापरलेला "खरा पक्ष" (veritable party) हा शब्दप्रयोग या प्रकरणात अनुचित आहे. याचिकाकर्त्याचा त्या मूलभूत करारामधील ज्यामध्ये लवादीय तरतूद आहे त्यातील कोणत्याही वाटाघाटी, अंमलबजावणी किंवा पूर्ततेशी काहीही संबंध नाही, तसेच त्यातून त्याला कोणताही लाभ

मिळालेला नाही. कॉक्स अँड किंग्ज (सुप्रा) मध्ये मान्य केल्याप्रमाणे, मूलभूत कराराच्या पूर्ततेत सहभाग हा संमती दर्शविणारा सर्वात महत्त्वाचा घटक मानला जातो.

६६. शेवटी असे प्रतिपादन करण्यात आले की, एका सही न करणाऱ्या पक्षाला कोणत्याही प्रकारची संमती नसताना लवाद प्रक्रियेसमोर जाण्यास भाग पाडणे, हा वादग्रस्त आदेश अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या स्पष्ट अभावाने ग्रस्त असल्याचे दाखवितो. लवाद न्यायाधीकरणाने प्रत्यक्षात स्वतःसाठी अशा अधिकाराचा स्वीकार केला आहे की ज्याद्वारे तो अस्तित्वात नसलेले करारातील हितसंबंध निर्माण करू शकतो, जे लवाद कायद्याच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे. म्हणून, याचिकाकर्ता हे पुनरुच्चारित करतो की सदर रिट याचिका ग्राह्य असून गुण्यताद्दष्ट्या योग्य आहे आणि वादग्रस्त आदेश रद्द केला जाणे आवश्यक आहे.

फ. **विश्लेषण**

६७. आम्ही दोन्ही पक्षांचे विद्वान वकील यांचे युक्तिवाद ऐकले आहेत. तसेच आम्ही दप्तराचे अवलोकनही केले आहे.

६८. सुरुवातीलाच, सद्य कार्यवाहीत आमच्या विचारार्थ पुढील प्रश्न उद्भवतात :—

(i) प्रकरणातील तथ्यांच्या पार्श्वभूमीवर, भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद २२६ आणि २२७ अंतर्गत दाखल करण्यात आलेली ही रिट याचिका ग्राह्य आहे का आणि लवाद न्यायाधीकरणाने दिलेल्या वादग्रस्त आदेशांमध्ये हस्तक्षेप

करण्यासाठी ती स्वीकारली जाऊ शकते का?

(ii) प्रकरणातील तथ्यांच्या आधारे, विद्वान एकल लवादाने वादग्रस्त आदेश देताना, ज्यामध्ये याचिकाकर्त्याला उत्तरवादी म्हणून दाव्यात सामील करण्याचे निर्देश दिले गेले आहेत, असा आदेश देताना त्यात अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा स्पष्ट अभाव आहे का, ज्याद्वारे याचिकाकर्त्यावर अन्यायकारक लवाद प्रक्रिया लादण्यात आली आहे?

६९. आता आम्ही पहिल्या मुद्द्याकडे वळतो की याचिकाकर्ता भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद २२६ आणि २२७ अंतर्गत या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र लागू करण्यास कायद्यानुसार पात्र आहे का. हा प्रश्न या कारणाने उद्भवतो की मे. एमिनन्स यांच्या वतीने श्री. खांबाटा यांनी दोन कारणांवर आक्षेप घेतला आहे, पहिला म्हणजे, याचिकाकर्त्याला वादग्रस्त आदेशाला आव्हान देण्यासाठी लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम १६(६) नुसार पर्यायी उपाय उपलब्ध आहे, तो म्हणजे जर याचिकाकर्ता निवाड्यामुळे व्यथित असेल तर तो कलम ३४ अंतर्गत दाखल होऊ शकणाऱ्या कार्यवाहीत निवाडा आव्हानित करू शकतो. दुसरा म्हणजे, श्री. खांबाटा यांचे प्रतिपादन असे आहे की एसीए स्वतःमध्ये एक पूर्ण संहिता आहे जी लवाद न्यायाधीकरणाने दिलेल्या आदेशांविरुद्ध आव्हानासाठी उपाययोजना प्रदान करते. त्यांचे म्हणणे आहे की सदर प्रकरणात वादग्रस्त आदेश हा मे. एमिनन्स यांनी याचिकाकर्त्याला उत्तरवादी म्हणून दाव्यात

सामील करण्यासाठी दाखल केलेल्या अर्जावर, एसीए च्या कलम १६ मध्ये मान्य करण्यात आलेल्या कॉम्पेतेन्झ- कॉम्पेतेन्झ या तत्त्वावर आधारित आहे, जे लवाद न्यायाधीकरणाला स्वतःचे अधिकारक्षेत्र ठरविण्याचा अधिकार देते. श्री. खांबाटा यांनी सादर केले की, एकदा वादग्रस्त आदेशाचा पाया कलम १६ च्या लागूतेवर आधारित असल्यास, कलम १६(६) मधील उपाय हाच याचिकाकर्त्याला उपलब्ध एकमेव उपाय ठरतो, या व्यतिरिक्त नाही. त्यांचा पुढील युक्तिवाद असा आहे की अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत असाधारण अधिकारक्षेत्र अशा प्रकारच्या दिलाशासाठी लागू करता येत नाही. या प्रतिपादनाला समर्थन देताना, श्री. खांबाटा यांनी दीप इंडस्ट्रीज लिमिटेड विरुद्ध ओएनजीसी लिमिटेड (सुप्रा), भावेन कन्स्ट्रक्शन (सुप्रा) आणि एसबीपी अँड कंपनी (सुप्रा) या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांवर विशेष भर दिला आहे. दुसरीकडे, श्री. खांबटा यांच्या प्रतिपादनाला उत्तर देताना, श्री. ढोंड यांनी सादर केले की सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या कायद्याच्या सर्वमान्य तत्त्वांनुसार, लवाद कार्यवाहीत राज्यघटनेतील अनुच्छेद २२६ आणि २२७ अंतर्गत न्यायालयाचे अधिकारक्षेत्र वापरण्याच्या मर्यादांचा विचार करता, ही रिट याचिका निश्चितच ग्राह्य आहे. तसेच वादग्रस्त आदेश हा न्यायाधीकरणाने अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या स्पष्ट अभावात दिलेला असल्याने, याचिकाकर्ता या न्यायालयाच्या रिटसाठी पात्र आहे. त्यांचे पुढील प्रतिपादन असे आहे की याचिकाकर्त्याला अवांछित लवाद कार्यवाहीत खेचले जाऊ शकत नाही आणि त्याला अशा कार्यवाहीचा बचाव करत अंतिम निकालाची प्रतीक्षा

करणे बंधनकारक ठरवले जाऊ शकत नाही, कारण त्या कार्यवाहीचा अंतिम निकाल फक्त लवाद निर्णयाच्या स्वरूपातच असू शकतो. त्यांचे असे म्हणणे आहे की न्यायाधीकरणाने एसीए अंतर्गत दिलेल्या आदेशांनुसार लवाद/खटल्याचे लादणे हे याचिकाकर्त्याच्या मूलभूत कायदेशीर अधिकारांचे उल्लंघन आहे, हा हक्क म्हणजे याचिकाकर्त्याने वैधपणे नोंदणीकृत विक्री हक्कपत्राद्वारे खरेदी केलेल्या दावा जमिनीचा मुक्त आणि निर्बंधरहित उपभोग घेण्याचा हक्क होय. त्यांचे प्रतिपादन असे आहे की याचिकाकर्त्याला पक्ष म्हणून दाव्यात सामील केल्याने सदर मालमत्तेला अनावश्यक खटल्यात ओढले गेले असून, हेच स्वतःमध्ये एक बंधन किंवा प्रतिबंध ठरते, जे याचिकाकर्त्याच्या मूलभूत कायदेशीर हक्काचे उल्लंघन करते, हा हक्क राज्यघटनेनेही मान्य केला आहे. याशिवाय, याचिकाकर्त्याच्या मालमत्तेला खटल्यात खेचल्यामुळे निर्माण झालेला असा प्रतिबंध त्याच्या व्यवसायिक कार्यांवरही प्रतिकूल परिणाम करतो, जे कायद्याने आणि कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत परवानगीप्राप्त आहेत. पुढील चर्चा आमच्या निष्कर्षाला मदत करेल.

७०. दीप इंडस्ट्रीज लिमिटेड विरुद्ध ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेड[29] या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयासमोर असा प्रश्न होता की, राज्यघटनेतील अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालय एसीए अंतर्गत ठरविण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये अधिकारक्षेत्राचा वापर करू शकते का. उच्च न्यायालयात राज्यघटनेतील अनुच्छेद २२६

[29] (२०१०) १५ एससीसी ७०६

अंतर्गत दाखल केलेल्या कार्यवाहीत, लवाद न्यायाधीकरणाने एसीएच्या कलम १७ अंतर्गत दिलेल्या अंतरीम आदेशावरून उद्भवलेल्या व कलम ३७ अंतर्गत दाखल केलेल्या अपीलावर नगर दिवाणी न्यायालयाने दिलेल्या आदेशाला आव्हान देण्यात आले होते. अशा कार्यवाहीत, उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या वतीने घेतलेल्या प्राथमिक हरकतीचा उल्लेख केला की अनुच्छेद २२७ अंतर्गत दाखल केलेली याचिका आरंभीच्या टप्प्यावरच फेटाळली जावी, कारण ती कोणताही अधिकारक्षेत्राशी संबंधित मुद्दा उपस्थित करत नाही. उच्च न्यायालयाने ती रिट याचिका मंजूर केली. सर्वोच्च न्यायालयाने एसीएच्या कलम ५ आणि कलम ३७ च्या तरतुदींचा विचार करून असे ठरवले की, अनुच्छेद २२७ ही राज्यघटनेतील तरतूद असल्याने, एसीएच्या कलम ५ मधील नॉन-ऑब्स्टँट क्लॉज मुळे त्यावर कोणताही परिणाम होत नाही. सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण केले की, जरी कलम ३७ अंतर्गत पहिल्या अपीलातील निर्णय मंजूर किंवा फेटाळणाऱ्या आदेशांविरुद्ध अनुच्छेद २२७ अंतर्गत याचिका दाखल करता येऊ शकते, तरीही उच्च न्यायालयाने अशा प्रकरणांमध्ये अत्यंत संयमाने हस्तक्षेप करावा, आणि सर्वोच्च न्यायालयाने चर्चिलेल्या वैधानिक धोरणाचा विचार करून , हस्तक्षेप केवळ त्या आदेशांपुरता मर्यादित ठेवावा, जे स्पष्टपणे अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या अभावाने ग्रस्त आहेत. न्यायालयाने केलेली पुढील निरीक्षणे लक्षात घेणे आवश्यक आहे, जी पुढीलप्रमाणे आहेत:-

"१७. या परिस्थितीत यात कोणतीही शंका नाही की, जर एसीएच्या कलम ३७ अंतर्गत दिलेल्या अपीलातील आदेशांविरुद्ध राज्यघटनेतील अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत याचिका दाखल करण्यात आल्या, तर संपूर्ण लवादीय प्रक्रिया विस्कळीत होईल आणि अनेक वर्षे अंतिम निष्पत्तीपर्यंत पोहोचू शकणार नाही. त्याचवेळी आपण हे विसरता कामा नये की अनुच्छेद २२७ ही राज्यघटनेतील तरतूद आहे, ज्यावर एसीएच्या कलम ५ मधील नॉन-ऑब्स्टँट क्लॉज चा कोणताही परिणाम होत नाही. या परिस्थितीत हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, जरी एसीएच्या कलम ३७ अंतर्गत पहिल्या अपीलातील निर्णय मंजूर किंवा फेटाळणाऱ्या आदेशांविरुद्ध अनुच्छेद २२७ अंतर्गत याचिका दाखल करता येतात, तरीही उच्च न्यायालयाने अत्यंत सावधगिरीने अशा आदेशांमध्ये हस्तक्षेप करावा. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने वर नमूद केलेल्या वैधानिक धोरणाचा विचार करून, हस्तक्षेप केवळ अशा आदेशांपुरता मर्यादित ठेवावा, जे स्पष्टपणे अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या अभावाने ग्रस्त आहेत."

(ठळक करून दाखवले)

७१. आम्ही हेही निरीक्षण करू शकतो की दीप इंडस्ट्रीज लिमिटेड विरुद्ध ओएनजीसी लिमिटेड (सुप्रा) या प्रकरणातील तथ्ये निश्चितच भिन्न होतीत, ज्यात रिट न्यायालयासमोर विचाराधीन असलेल्या आदेशाचे स्वरूप सुद्धा वेगळे होते. तथापि, त्या निर्णयाचे महत्त्व या कायद्याच्या घोषणेमध्ये आहे की, सदर निर्णयातील परिच्छेद १७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये लवादीय न्यायाधीकरणाने स्पष्टपणे अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या अभावाने ग्रस्त आदेश दिल्यास, उच्च न्यायालयास रिट अधिकारक्षेत्र वापरणे अनुमत आहे.

७२. भवन कन्स्ट्रक्शन विरुद्ध कार्यकारी अभियंता (सुप्रा) या प्रकरणात, राज्यघटनेतील अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयास निर्देश, आदेश किंवा रिट जारी करण्याचे अधिकार मान्य करताना, सर्वोच्च न्यायालयाने असे ठरविले की हा राज्यघटनेचा मूलभूत घटक आहे, जो संसदीय कायदेमंडळाद्वारे मर्यादित केला जाऊ शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने असेही ठरविले की असा अधिकार उच्च न्यायालयाने अत्यंत अपवादात्मक

परिस्थितीतच वापरावा, विशेषतः जेव्हा एखाद्या पक्षाला कायद्यानुसार कोणताही उपाय उपलब्ध नसतो किंवा जेव्हा स्पष्ट "दुर्भावनेने" कार्य केलेले असते. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केलेली खालील निरीक्षणे लक्षात घेणे आवश्यक आहे, जी पुढीलप्रमाणे आहेत:-

> "१८. कोणत्याही परिस्थितीत, आपल्या कायदेशीर संरचनेतील श्रेणीक्रमानुसार, कायदेविषयक अधिनियमाद्वारे राज्यघटनेतील अधिकार मर्यादित करता येत नाही. निवेदिता शर्मा विरुद्ध सीओएएस या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने अनेक न्यायनिर्णयांचा संदर्भ देऊन पुढीलप्रमाणे ठरविले : (एससीसी पृ. ३४३, परिच्छेद ११)
>
>> "११. आम्ही संबंधित युक्तिवादांचा विचार केला आहे. यात कोणतीही वादाची गोष्ट नाही की राज्यघटनेतील अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयास हॅबिअस कॉर्पस, सर्टिओररी, मंडामुस, क्वो वॉरंटो व प्रोहीबिशन अशा रिट्स जारी करण्याचे अधिकार आहेत, जे राज्यघटनेचे मूलभूत वैशिष्ट्य आहे आणि संसदीय कायदेमंडळाद्वारे मर्यादित केले जाऊ शकत नाही – एल. चंद्र कुमार विरुद्ध युनियन ऑफ इंडिया. तथापि, संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत दिलेल्या अधिकाराचा वापर करून राज्य आणि/ किंवा त्याची एजन्सी/ साधन किंवा कोणतेही सार्वजनिक प्राधिकरण किंवा अर्ध-न्यायिक संस्था/ प्राधिकरणाने पारित केलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध किंवा केलेल्या कृतीविरुद्ध उच्च न्यायालय रिट याचिका स्वीकारू शकते, असे म्हणणे एक गोष्ट आहे, आणि आणि हे म्हणणे पूर्णतः वेगळे आहे की प्रत्येक अनुच्छेद २२६ अंतर्गत दाखल याचिका उच्च न्यायालयाने स्वाभाविकपणे विचारात घ्यावी, जरी व्यथित पक्षाला प्रभावी पर्यायी उपाय उपलब्ध असला तरी. उलट, हा स्थापित कायदा आहे की जेव्हा कायद्यानुसार तक्रारींच्या निवारणासाठी वैधानिक मंच निर्माण करण्यात आला असेल, तेव्हा रिट याचिका दाखल करून त्या वैधानिक प्रक्रियेची उपेक्षा करता येणार नाही."
>>
>> (ठळक करून दाखवलेले)
>>
>> म्हणून, न्यायाधीशाने विवेकबुद्धीचा वापर करून, अधिनियमात निश्चित केलेल्या प्रक्रियेपलीकडे न्यायालयीन हस्तक्षेप करण्याचे अधिकार वापरू नयेत. हा अधिकार केवळ अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत वापरला जावा — जसे की, जेव्हा एखाद्या पक्षाला कायद्यानुसार कोणताही उपाय उपलब्ध नसतो, किंवा जेव्हा एखाद्या पक्षाकडून स्पष्ट "दुर्भावना" दाखवली जाते. सर्वोच्च न्यायालयाने ठरविलेला हा उच्च निकष लवादीय प्रक्रिया निष्पक्ष व कार्यक्षम ठेवण्याच्या विधिमंडळाच्या उद्देशाचे प्रतिबिंब आहे."
>>
>> (ठळक करून दाखवलेले)

७३. यावरून हे स्पष्ट होते की, राज्यघटनेतील अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत रिट याचिका दाखल करून उच्च न्यायालयाने लवादीय न्यायाधीकरणाने दिलेल्या आदेशांमध्ये हस्तक्षेप करू नये असा कायद्यातील पूर्णतः सर्वसमावेशक सिद्धांत नाही. जेव्हा लवादीय न्यायाधीकरणाकडून स्पष्टपणे अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा अभाव असलेला आदेश दिला जातो किंवा स्पष्ट अधिकारक्षेत्राच्या अभावाने ग्रस्त आदेश जारी केला जातो, तेव्हा अशा परिस्थितीत रिट याचिका ग्राह्य धरली जाऊ शकते. अशा अधिनियमाद्वारे शासित कोणतीही न्यायिक प्रक्रिया संमती न देणाऱ्या पक्षावर न्यायाचा उघड अपहार किंवा उघड अन्याय करू शकत नाही, कारण लवाद कार्यवाहीच्या बाबतीत पक्षकार स्वायत्ततेचे नियम सर्वोच्च आहेत, आणि लवाद प्रक्रियेत कोणत्याही वादग्रस्त पक्षाच्या सोयीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत, कारण लवाद प्रक्रिया पूर्णपणे ऐच्छिक स्वरूपाची असते.

७४. सदर प्रकरणात मे. एमिनन्स तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, लवादीय प्रक्रिया संपल्यानंतर म्हणजेच निवाडा जाहीर झाल्यानंतर उपलब्ध असलेल्या दिलास्याचा म्हणजेच वादग्रस्त आदेशाला आव्हान देण्यासाठी, एसीए च्या कलम १६(६) च्या तरतुदींच्या संदर्भात, याचिकाकर्त्याने एसीए च्या कलम ३४ च्या तरतुदींचा आधार घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, ही रिट याचिका ग्राह्य नाही आणि स्वीकारली जाऊ नये. या संदर्भात आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या मे. गोदरेज सारा

ली. वि. द एक्साइज आणि टॅक्सेशन ऑफिसर-कम-असेसिंग ऑथोरिटी आणि इतर[30] या निर्णयाचा उल्लेख करतो. ज्यामध्ये, अपीलकर्त्याने दाखल केलेली रिट याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून, त्याला वैधानिक अपीलच्या उपायाकडे वळविले होते. त्यावर सर्वोच्च न्यायालयासमोर जो प्रश्न निर्माण झाला तो असा होता की, उच्च न्यायालयाने पर्यायी वैधानिक उपाय उपलब्ध असल्याच्या कारणावरून हस्तक्षेप नाकारणे योग्य होते का, विशेषतः जेव्हा अपीलकर्त्याने तो उपाय अवलंबलेलाच नव्हता. या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेतील अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा सखोल विचार केला, आणि विशेषतः, जेव्हा उच्च न्यायालयाने फक्त वैधानिक पर्यायी उपाय उपलब्ध आहे या कारणावरून रिट याचिका ग्राह्य नाही असे ठरविले, तेव्हा, आणि रिट अधिकारक्षेत्राचा अवलंब करू इच्छिणाऱ्या पक्षाने त्या पर्यायी उपायाचा अवलंब केला नाही, अशा परिस्थितीत कायदेशीर दृष्ट्या काय भूमिका असावी, यावर विचार करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने असे ठरविले की, अनुच्छेद २२६ अंतर्गत प्रिरोगेटिव्ह रिटचा अधिकार हा स्वरूपतः सर्वव्यापी आहे. अशा अधिकारांच्या वापरावर कोणतीही मर्यादा लादायची असल्यास, ती स्वतः राज्यघटनेतूनच अनुसरली पाहिजे. तसेच, अनुच्छेद २२६ मध्ये रिट जारी करण्याच्या अधिकारावर कोणतीही स्पष्ट मर्यादा किंवा निर्बंध नाहीत. असे निरीक्षण करण्यात आले की उच्च न्यायालयासमोर असलेला याचिकाकर्ता, जर त्याने उपलब्ध असलेला पर्यायी

[30] २०२३ एससीसी ऑनलाईन एससी ९५

उपाय अवलंबलेला नाही, केवळ या वस्तुस्थितीला याचिका फेटाळण्याचे कारण म्हणून यांत्रिकपणे अर्थ लावला जाऊ शकत नाही, कारण उच्च न्यायालयांना रिट याचिका स्वीकारायची की नाही, याबद्दल स्वेच्छाधिकार आहे, हे स्वयंसिद्ध आहे.

यासोबतच, न्यायालयाने हे स्पष्ट केले की, अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारांच्या वापराबाबत स्वतः लादलेली मर्यादा अशी की, जेव्हा प्रभावी आणि परिणामकारक पर्यायी उपाय उपलब्ध असेल, तेव्हा रिट याचिका विचारात घेऊ नये तथापि, फक्त पर्यायी अपील किंवा पुनर्विलोकनाचा उपाय उपलब्ध आहे या कारणावरून, आणि त्या उपायाचा अवलंब न केल्यामुळे, उच्च न्यायालयाचे अधिकार नष्ट होत नाहीत किंवा रिट याचिका "अग्राह्य" ठरत नाही. असे निरीक्षण करण्यात आले की दीर्घ न्यायनिर्णयांच्या मालिकेत, मेहरबान सर्वोच्च न्यायालयाने असे ठरविले आहे की पर्यायी उपाय उपलब्ध असणे हे रिट याचिका "स्वीकारण्यास" अडथळा निर्माण करणारे संपूर्ण कारण ठरत नाही आणि कायद्याने दिलेला पर्यायी उपाय प्रथम अवलंबला जावा ही नियमावली, कायद्याची बंधनकारक अट नसून धोरण, सोयीसाठी आणि विवेकाधिकाराचा नियम आहे, कायद्याचा नियम नाही. असेही निरीक्षण करण्यात आले की रिट याचिकेची "स्वीकार्यता" आणि "टिकण्यायोग्यता" या दोन स्वायत्त आणि वेगवेगळ्या संकल्पना आहेत, आणि त्यातील फरक लक्षात ठेवला पाहिजे. अशा संदर्भात, असे निरीक्षण करण्यात आले की "टिकण्यायोग्यतेवर" आक्षेप हा प्रकरणाच्या मुळाशी (to the root

of the matter) जातो आणि जर असा आक्षेप ग्राह्य धरला गेला तर न्यायालयांना न्यायनिर्णयासाठी प्रकरण स्वीकारण्यासही असमर्थ ठरवले जाईल. दुसरीकडे, “स्वीकारार्हते”चा प्रश्न हा पूर्णतः उच्च न्यायालयाच्या विवेकाधिकाराच्या क्षेत्रात मोडतो, कारण रिट उपाययोजना स्वेच्छाधीन आहे. या संदर्भातील तत्त्वांचा विचार करता, व्हर्लपूल कॉर्पोरेशन विरुद्ध रजिस्ट्रार ऑफ ट्रेड मार्क्स, मुंबई आणि इतर[31] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अशा अपवादात्मक परिस्थितींचे वर्णन केले ज्यामध्ये, वैधानिक पर्यायी उपाय उपलब्ध असतानाही, रिट न्यायालयाला रिट याचिका स्वीकारण्याचे समर्थन मिळेल. यासंबंधी गोदरेज सारा ली लिमिटेड (सुप्रा) मधील खालील निरीक्षणांची नोंद घेणे आवश्यक आहे:-

> ४. प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी, आम्हाला अनुच्छेद २२६ अंतर्गत संविधानाने रीट अधिकारांच्या वापराबाबत काही शब्द मांडण्याची आवश्यकता वाटते, कारण आम्हाला काही उच्च न्यायालयांचे आदेश आढळले की केवळ संबंधित कायद्यांमध्ये उपलब्ध पर्यायी उपाय अवलंबले गेले नाहीत म्हणून रीट याचिका “टिकण्यायोग्य नाही” (not maintainable) असे घोषित केले आहे. अनुच्छेद २२६ अंतर्गत प्रेरोगेटिव्ह रिट्स जारी करण्याचा अधिकार स्वायत्त स्वरूपाचा आहे. अशा अधिकारांवरील कोणतीही मर्यादा केवळ संविधानातूनच उद्भवली पाहिजे. या संदर्भात अनुच्छेद ३२९ आणि संविधानातील इतर तत्सम शब्दबद्ध अनुच्छेदांचा संदर्भ घेणे उपयुक्त ठरेल. अनुच्छेद २२६ स्वतःच रिट जारी करण्याच्या अधिकारावर कोणतीही मर्यादा किंवा बंधन घालत नाही. जरी हे खरे आहे की, ज्या कायद्याचे प्रावधान वापरून कारवाई केली आहे त्या कायद्यातच उपाय उपलब्ध असताना रीट अधिकारांचा वापर साध्या पद्धतीने किंवा नेहमीप्रमाणे होऊ नये, तरीही केवळ एवढ्यामुळे की उच्च न्यायालयासमोर आलेल्या याचिकाकर्त्याने पर्यायी उपायाचा अवलंब केला नाही, हे एकमेव कारण म्हणून याचिका फेटाळणे योग्य नाही. हे स्वयंस्पष्ट आहे की प्रत्येक प्रकरणातील तथ्य लक्षात घेऊन, उच्च न्यायालयांकडे ही स्वतंत्र विवेकाधिकाराची शक्ती आहे की त्यांनी रीट याचिका स्वीकारावी की नाही. अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारांच्या वापरावर न्यायिक निर्णयांमधून विकसित झालेल्या स्वतः लागू केलेल्या मर्यादांपैकी एक म्हणजे — जेथे प्रभावी आणि परिणामकारक पर्यायी उपाय उपलब्ध आहे तेथे उच्च न्यायालयांनी साधारणतः रीट याचिका स्वीकारू नये. त्याच वेळी, हे लक्षात ठेवले पाहिजे की केवळ अपील किंवा पुनरावलोकन याची पर्यायी उपाययोजना उपलब्ध असल्यामुळे, जी

[31] (१९९८) ८ एससीसी १

> अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राला आवाहन देणाऱ्या पक्षकाराने अवलंबली नसल्यास, उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र संपत नाही आणि रीट याचिका "टिकण्यायोग्य नाही" अशी स्थिती निर्माण होत नाही. या न्यायालयाने न्यायनिर्णयाच्या दीर्घ शृंखलेत स्पष्ट केले आहे की पर्यायी उपाययोजनेची उपलब्धता ही रिट याचिकेच्या "टिकण्यायोग्यतेवर" संपूर्ण बंधन घालत नाही आणि पर्यायी उपायाचा अवलंब करणे ही कायद्याची सक्ती नसून, धोरण, सोयीसुविधा आणि न्यायालयाच्या विवेकाधिकाराचा भाग आहे, कायद्याचा नियम नाही. जरी प्राथमिक असल्या तरीही, "स्वीकारार्हता" आणि "टिकण्यायोग्यता" या रिट याचिकेच्या वेगळ्या संकल्पना आहेत, या दोन्हीतील सूक्ष्म पण वास्तविक फरक दुर्लक्षित होता कामा नये. "टिकण्यायोग्यतेवर" आक्षेप हा प्रकरणाच्या मुळाशी जातो आणि जर अशा आक्षेपात तथ्य असेल, तर न्यायालयांना न्यायनिर्णयासाठी प्रकरण स्वीकारण्यासही असमर्थ ठरवले जाईल. दुसरीकडे, "स्वीकारार्हतेचा" प्रश्न हा उच्च न्यायालयांच्या स्वेच्छाधिकाराच्या क्षेत्रात येतो, रिट उपाययोजना स्वेच्छाधीन असल्यामुळे, रिट याचिका टिकण्यायोग्य असूनही, ती उच्च न्यायालयाकडून अनेक कारणांमुळे स्वीकारली जाऊ शकत नाही किंवा याचिकाकर्त्याने दावा केलेला उपाय सार्वजनिक हित पुढे नेणार नसेल, तर कायदेशीर मुद्दा मांडूनही उपाय नाकारला जाऊ शकतो. म्हणूनच, फक्त एवढ्या कारणावर की, याचिकाकर्त्याने पर्यायी उपाय अवलंबले नाहीत, उच्च न्यायालयाने रीट याचिका फेटाळणे योग्य ठरत नाही, जोपर्यंत न्यायालय हे परीक्षण करत नाही की प्रकरण अपवादात्मक आहे की नाही.

७५. सेरोसॉफ्ट सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध डेक्स्टर कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड[32] या प्रकरणात, न्यायालयासमोर असलेल्या पक्षकारांमध्ये लावादीय कार्यवाही प्रलंबित होती. अपिलिय न्यायाधिकरणाने असा विनंती अर्ज फेटाळल्यानंतरही प्रतिवादी/दावेदाराला अपीलकर्त्याच्या साक्षीदाराची पुन्हा उलटतपासणी करण्याची आणखी एक संधी देताना अनुच्छेद २२७ अंतर्गत उच्च न्यायालयाने त्याच्या पर्यवेक्षकीय अधिकारक्षेत्राचा योग्य वापर केला का, हा मेहरबान सर्वोच्च न्यायालयासमोरील विचाराधीन प्रश्न होता. अशा प्रश्नाचा विचार करताना, सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिकेच्या टिकण्यायोग्यतेचा प्रश्न तपासला. सर्वोच्च न्यायालयाने केल्विन एअर कंडिशनिंग अँड व्हेंटिलेशन सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध ट्रायम्फ रिॲलिटी प्रायव्हेट लिमिटेड या निर्णयाचा संदर्भ घेतला व हे स्पष्ट केले की, अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत

[32] २०२५ एससीसी ऑनलाईन एससी २२

हस्तक्षेप तेव्हाच शक्य आहे जेव्हा आदेश पूर्णपणे दुराग्रही असेल, आणि ही दुराग्रहीता स्पष्टपणे दिसली पाहिजे, तसेच लवाद न्यायाधिकरणाचा आदेश कसा दुराग्रही आहे हे उच्च न्यायालयाने कारणासहित नोंदविणे आवश्यक आहे.

७६. आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या मे. तमिळनाडू सीमेंट्स कॉर्पोरेशन लिमिटेड विरुद्ध मायक्रो अँड स्मॉल एंटरप्रायझेस फॅसिलिटेशन कौन्सिल आणि इतर[33] या निर्णयाचाही संदर्भ घेऊ शकतो, जिथे मायक्रो, स्मॉल अँड मीडियम एंटरप्रायझेस डेव्हलपमेंट अधिनियम, २००६ च्या कलम १८ अंतर्गत अधिकार वापरून मायक्रो अँड स्मॉल एंटरप्रायझेस फॅसिलिटेशन कौन्सिलने पारित केलेल्या आदेशाविरुद्ध भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत रिट याचिका टिकण्यायोग्य असेल का, हा मेहरबान सर्वोच्च न्यायालयासमोरील विचाराधीन प्रश्न होता, जो कलम १८ लावादीय प्रक्रियेसाठी संदर्भ देण्याचा अधिकार आहे. या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने संविधानातील अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या वापरासंबंधीची कायदेशीर स्थिती विचारात घेतली आणि उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या संबंधात पुढील तत्त्वांची पुनरावृत्ती केली:

> १३. भारताच्या संविधानातील अनुच्छेद २२५ अंतर्गत रिट याचिका दाखल करण्याचा मार्ग हा केवळ एक संवैधानिक हक्क नसून संविधानाच्या मूलभूत रचनेचाही एक भाग आहे. संविधानिक हक्कांची किंवा कायद्यानं दिलेल्या हक्कांची पायमल्ली झाल्यावर प्रत्येक नागरिकाला या हक्काचा वापर करता येतो. हा हक्क अविभाज्य आहे . पर्यायी उपाय उपलब्ध असण्याचे नियम हे रिट अधिकारक्षेत्र वगळण्यासाठी सर्वसमावेशक नियम नाहीत, तर न्यायालयाने स्वतःवर लावलेल्या न्यायिक संयमाच्या

[33] २०२५ एससीसी ऑनलाईन एससी १२७

तत्त्वावर आधारित आहेत. अनुच्छेद २२५ अंतर्गत परमादेश / रिट जारी करण्याचे अधिकार पूर्ण (plenary) स्वरूपाचे आहेत आणि संविधानातील कोणत्याही तरतुदीने ते मर्यादित होत नाहीत, तसेच कोणत्याही कायद्याद्वारे त्यांना मर्यादित किंवा प्रतिबंधित करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी हे स्पष्टपणे ठरवले आहे की, पर्यायी उपाय उपलब्ध असले तरी रिट न्यायालय खालील तीन परिस्थितीत अधिकारक्षेत्र वापरू शकते – i) जिथे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे किंवा मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाले आहे; ii) जिथे कार्यवाहीतील आदेश पूर्णपणे अधिकारक्षेत्राविना आहे; किंवा iii) ज्या वेळी कायद्याच्या वैधतेला आव्हान दिले जाते. लक्षात घेण्यासारखे म्हणजे, एमएसईएफसी हे एक वैधानिक प्राधिकरण असून ते कायद्याच्या चौकटीत राहून वैधानिक कार्य करते.

१४. वरील सांगितलेल्या सिद्धांताचे अनुसरण करताना, हरबन्सलाल सहानीया विरुद्ध इंडियन ऑइल कॉर्पोरेशन या प्रकरणात या न्यायालयाने हे निदर्शनास आणून दिले की, उच्च न्यायालयाने रिट याचिकाकर्त्याला उपलब्ध असलेल्या लवाद कलमाकडे संदर्भ केला होता, परंतु रिट अधिकारक्षेत्र वगळण्याचा नियम हा बंधनकारक नसून विवेकाधिकाराचा नियम आहे. योग्य प्रकरणांमध्ये, पर्यायी उपाय उपलब्ध असला तरी, रिट न्यायालय वरील संदर्भित कमीत कमी तीन परिस्थितींमध्ये त्याचे अधिकारक्षेत्र वापरू शकते. सदर प्रकरणाच्या तथ्यांमध्ये, या न्यायालयाने हस्तक्षेप केला कारण डीलरशिपचा करार असंबंधित आणि अस्तित्वात नसलेल्या कारणावर रद्द करण्यात आला होता, त्यामुळे पक्षकारांना लवाद प्रक्रिया सुरू करण्यासाठी भाग पाडण्याची गरज नव्हती. व्हर्लपूल कॉर्पोरेशन विरुद्ध रजिस्ट्रार ऑफ ट्रेड मार्क्स, मुंबई आणि हरबन्सलाल सहानीया (सुप्रा) या निर्णयांचे अनुसरण करत, या न्यायालयाने राधा कृष्णा इंडस्ट्रीज विरुद्ध हिमाचल प्रदेश राज्य या प्रकरणात खालील तत्त्वे स्थापित केली:

> २७. कायद्याचे जे सिद्धांत उदयास येतात ते असे आहेत की:
>
> २७.१. संविधानातील अनुच्छेद २२५ अंतर्गत रिट जारी करण्याचा अधिकार केवळ मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीपुरता मर्यादित नाही, तर इतर कोणत्याही उद्देशासाठीसुद्धा वापरला जाऊ शकतो.
>
> २७.२. रिट याचिका स्वीकारायची की नाही, याबद्दल उच्च न्यायालयाला स्वेच्छाधिकार आहे. उच्च न्यायालयाच्या अधिकारांवर घातलेल्या निर्बंधांपैकी एक म्हणजे जेथे व्यथित व्यक्तीला प्रभावी पर्यायी उपाययोजना उपलब्ध असेल.
>
> २७.३. पर्यायी उपायाच्या नियमाला अपवाद उद्भवतात जेथे: (अ) रिट याचिका भाग III मधील मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी दाखल केली आहे; (ब) नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन झाले आहे; (क) आदेश किंवा कार्यवाही संपूर्णपणे अधिकारक्षेत्राशिवाय आहे; किंवा (ड) एखाद्या कायदेच्या वैधतेवर आक्षेप घेतला आहे.
>
> २७.४. केवळ पर्यायी उपाय उपलब्ध आहे म्हणूनच उच्च न्यायालयाचा अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकार काढून घेतला जात नाही; तरीसुद्धा सर्वसाधारणपणे, जेव्हा कायद्याने प्रभावी पर्यायी उपाय प्रदान केलेला असतो तेव्हा रिट याचिका स्वीकारली जाऊ नये.

२७.५. जेव्हा एखादा हक्क कायद्याने निर्माण केला जातो आणि त्या कायद्यातच त्या हक्काची अंमलबजावणी करण्याचा उपाय/प्रक्रिया दिलेली असते, तेव्हा अनुच्छेद २२६ अंतर्गत विवेकाधिकाराचा उपयोग करण्यापूर्वी, कायदेशीर उपायाचा अवलंब करणे आवश्यक आहे. सांविधिक उपाय पूर्ण करण्याचा हा नियम धोरण, सोय आणि विवेकाधिकाराचा नियम आहे.

२७.६. जेथे तथ्यांचे विवादित प्रश्न आहेत, तेथे उच्च न्यायालय रिट याचिकेत अधिकारक्षेत्र नाकारण्याचा निर्णय घेऊ शकते. तथापि, जर उच्च न्यायालयाला असे वस्तुनिष्ठपणे वाटले की वादाच्या स्वरूपामुळे रिट अधिकारक्षेत्र वापरणे आवश्यक आहे, तर अशा मतामध्ये सहज हस्तक्षेप केला जाणार नाही.

१५. म्हणून, असे म्हणणे योग्य ठरेल की वैधानिक उपाय अस्तित्वात असल्याने उच्च न्यायालयाचा रिट जारी करण्याचा अधिकार प्रभावित होत नाही. तथापि, रिट अधिकारक्षेत्र हे धोरणानुसार विवेकाधीन असल्यामुळे, रिट न्यायालये साधारणतः पक्षकारांनी उपलब्ध असलेल्या पर्यायी सांविधिक उपायांचा अवलंब करावा, अशी अट घालतात, कारण यामुळे कायद्याच्या शासनाचे सुदृढीकरण होते. परंतु, अपवादात्मक प्रकरणांमध्ये, न्याय व दिलासा मिळवण्यासाठी न्यायालयापर्यंत पोहोचण्याच्या अधिकाराप्रमाणे, रिट अधिकारक्षेत्राचा वापर अजूनही केला जाऊ शकतो. याच संदर्भात, १९५४ मध्ये पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने हिम्मतलाल हरीलाल मेहता विरुद्ध मध्य प्रदेश राज्य या प्रकरणात असे निरीक्षण केले होते की, जेव्हा अधिनियमांतर्गत उपाय कष्टप्रद किंवा अत्यंत तापदायक स्वरूपाचा असतो, तेव्हा पर्यायी उपाय उपलब्ध आहे म्हणून रिट जारी करू नये हा सिद्धांत लागू होणार नाही.

(भर दिला)

७७. युनिटेक लिमिटेड आणि इतर विरुद्ध तेलंगणा स्टेट इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशन (टीएसआयआयसी) आणि इतर[34] या प्रकरणात, पक्षकारांमध्ये लवाद करार (arbitration agreement) अस्तित्वात असताना देखील, संविधानातील अनुच्छेद २२५ अंतर्गत दाखल केलेल्या कार्यवाहीमध्ये हस्तक्षेप केल्याबद्दल तेलंगणा उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी दिलेल्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली. करारविषयक विवादात सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की अनुच्छेद २२५ अंतर्गत प्रिरोगेटिव्ह रिट्स जारी करण्याची शक्ती ही स्वभावतः व्यापक आहे आणि संविधानातील इतर कोणत्याही तरतुदीमुळे तिच्यावर मर्यादा येत नाहीत. प्रकरणाच्या

---

[34] (२०२१) १६ सुप्रीम कोर्ट केसेस ३५

तथ्यांचा विचार करून, उच्च न्यायालयाला रिट याचिका स्वीकारायची की नाही, याबद्दल स्वेच्छाधिकार होता, असे ठरवण्यात आले. न्यायालयांनी अधिकाराच्या वापरावर स्वतःहून काही निर्बंध लादले आहेत, परंतु हेही स्पष्टपणे ठरले आहे की फक्त वाद कराराशी संबंधित असल्यामुळे अनुच्छेद २२५ अंतर्गत अधिकारक्षेत्र बाद होऊ शकत नाही. तसेच असेही ठरवले की, लवाद कलम अस्तित्वात असल्यामुळे, अनुच्छेद २२५ अंतर्गत अधिकारक्षेत्र सर्व प्रकरणांमध्ये बाद होत नाही आणि एखादे प्रकरण सार्वजनिक कायद्याच्या उपाययोजनेस पात्र आहे का, हे प्रकरणानुसार ठरवावे लागते.

७८. आम्ही असे निरीक्षण करतो की एसबीपी अँड कंपनी विरुद्ध पटेल इंजिनीअरिंग लिमिटेड[35] या निर्णयातील संविधान पीठाने दिलेल्या निष्कर्षातील परिच्छेद ४५ मधील निरीक्षणे, ज्यांवर मे. एमीनन्स च्या वतीने अवलंबून राहिले गेले, ती लवाद करारातील पक्षकारांस लागू होतात, आणि अशा पक्षकारांमधील परस्पर चालणाऱ्या कार्यवाहीच्या संदर्भातच वाचली पाहिजेत, कारण लवाद न्यायाधीकरण हे कराराचे निर्मित रूप आहे, असे सर्वोच्च न्यायालयानेच परिच्छेद ४५ व ४६ मध्ये नमूद केले आहे. कोणत्याही परिस्थितीत, ही निरीक्षणे लवाद आणि समेट अधिनियम (एसीए) च्या कलम ११(६) अंतर्गत पारित केलेल्या आदेशाच्या स्वरूपाच्या संबंधात मेहरबान सर्वोच्च न्यायालयासमोरील विचारासाठी आलेल्या विवादाच्या संदर्भात वाचणे आवश्यक आहे, म्हणजे की उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना किंवा भारताच्या मुख्य

---

[35] (२००५) ८ एससीसी ६१८

न्यायाधीशांना दिलेला असा अधिकार प्रशासकीय होता की न्यायिक होता. म्हणून, ही निरीक्षणे दीप इंडस्ट्रीज लिमिटेड (सुप्रा) च्या परिच्छेद १७ मध्ये आणि त्याहून अधिक मेहरबान सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल ऑर्गनायझेशन फॉर रेल्वे इलेक्ट्रिफिकेशन विरुद्ध ईसीआय स्पीटी एसएमओ एमसीएमएल (जेव्ही), अ जॉइंट व्हेंचर कंपनी[36] (सुप्रा) या संविधान पीठाने केलेल्या निरीक्षणांसारखी नाहीत.

७९. वर नमूद केलेल्या कायदेशीर स्थितीच्या पार्श्वभूमीवर, आम्ही असे निरीक्षण करतो की मे. एमीनन्स च्या वतीने अवलंबून राहण्यात आलेले या न्यायालयाचे निर्णय, जे सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत व बंधनकारक निर्णयापूर्वीचे आहेत, त्यांची चर्चा करण्याची आवश्यकता नाही.

८०. वर नमूद केलेल्या कायदेशीर स्थितीचा आणि या प्रकरणातील तथ्यांचा विचार करता, आम्ही श्री. खांबटा यांचे हे म्हणणे मान्य करू शकत नाही की एकदा लवाद न्यायाधीकरण स्वतःच्या अधिकारक्षेत्रावर निर्णय देण्यास सक्षम असेल, ज्यात लवाद करार अस्तित्वात आहे की नाही किंवा वैध आहे की नाही या संदर्भातील आक्षेपाचादेखील समावेश आहे, तर अशा आदेशांना आव्हान देण्याचा एकमेव उपाय कलम १६(६) अंतर्गत उपलब्ध आहे, म्हणजेच लवादीय निवाडा कलम ३४ अंतर्गत आव्हानित करताना त्या प्रश्नाला आव्हान देता येईल, कारण हेच एकमेव साधन आहे ज्याद्वारे याचिकाकर्ता कलम १६ अंतर्गत पारित केलेल्या अधिकारक्षेत्राच्या आदेशाला

---

[36] (२०२५) ४ एससीसी ६४१

आव्हान देऊ शकतो. आमच्या मते, हा दृष्टिकोन फक्त त्या परिस्थितीत योग्य ठरू शकतो, जेव्हा लवाद न्यायाधीकरण केवळ मूळ पक्षांमधील अधिकारक्षेत्राशी संबंधित प्रश्नाचा विचार करीत आहे, परंतु सध्याची परिस्थिती तशी नाही, कारण येथे याचिकाकर्ता हा तृतीय पक्ष आहे, ज्याला जबरदस्तीने नवीन पक्ष म्हणून दाव्यात सामील करणे आणि लवादीय प्रक्रियेत ओढणे अपेक्षित आहे. कारण असे की, पक्षीय स्वायत्तता हा लवाद प्रक्रियेचा पाया आहे, आणि अशा परिस्थितीत, लवाद न्यायाधीकरणाचे अधिकारक्षेत्र हे पक्षांमधील नसून एका मुक संमती नसलेल्या आणि सही न करणाऱ्या व्यक्तीच्या संदर्भात उद्भवते, ज्याने कधीही लवाद प्रक्रियेस संमती दिलेली नाही. हा असा प्रश्न आहे, जो लवाद अधिकारक्षेत्राच्या मुळाशी जातो आणि लवाद कार्यवाहीच्या पवित्र कर्तव्यावर परिणाम करतो. कायद्याचे धोरण अशा कोणत्याही अनावश्यक संपरीक्षेचा / खटल्याचा भार टाकण्यास मान्यता देत नाही, विशेषतः जेव्हा संबंधित व्यक्ती ही फक्त लवाद करारापासूनच नव्हे तर लवादाच्या विषयापासून देखील पूर्णपणे परकी आहे. आमच्या मते, कलम १६ चे उद्देशपूर्ण अर्थाने विश्लेषण केले पाहिजे. अशा परिस्थितीत कलम १६ चे सरसकट लागूकरण करता येणार नाही. लवाद करारातील पक्षांच्या परस्पर संबंधात कलम १६ ची अंमलबजावणी एका स्वरूपाची असेल, परंतु संमती नसलेल्या तृतीय पक्षाच्या बाबतीत त्याचे स्वरूप पूर्णपणे वेगळे असेल. म्हणूनच, कलम १६(६) मधील तरतूद फक्त त्या पक्षांवर लागू होईल, जे लवादीय प्रक्रियेचे पक्ष आहेत किंवा जे लवाद कराराचे आवश्यक पक्ष आहेत. यात अशा पक्षांचाही समावेश होऊ शकतो, जे

गट कंपनी सिद्धांत लागू होत असल्यास जोडले जाऊ शकतात. जर कलम १६ च्या संपूर्ण वाचनानुसार असा अर्थ लावला नाही, जो लवादाच्या पक्षकारांच्या संबंधात 'कोम्पीटेंझ-कोम्पीटेंझ' च्या सिद्धांताला मान्यता देतो, तर अधिकारक्षेत्राला मूळातच परके असलेल्या पक्षकारांना लवादाच्या कक्षेत आणून लवाद कार्यवाहीचा उघड गैरवापर होऊ शकतो.

८१. मे. एमिनन्स यांच्या वतीने मांडलेल्या युक्तिवादांना जर मान्यता द्यायची झाली, तर असा तृतीय पक्ष आणि/किंवा लवाद कराराचा सही न करणारा पक्ष एका विसंगत स्थितीत ढकलला जाईल, ज्यामुळे अशा नवीन पक्षाला दाव्यात सामील करण्याच्या आदेशाचा परिणाम असा होईल की तो आदेश लवादीय कार्यवाही पूर्ण होऊन निवाडा घोषित होईपर्यंत लागू राहील. अशा परिस्थितीत, शक्यता अशी आहे की अशा तृतीय पक्षाला, जो लवाद कराराचा भाग नाही आणि ज्याने लवादीय अधिकारक्षेत्र मान्य केले नाही, त्याला अनावश्यक आणि/किंवा बंधनकारक पद्धतीने प्रतिवाद करावा लागेल आणि लवादीय कार्यवाहीत भाग घ्यावा लागेल, केवळ यासाठी की त्याला लवादीय प्रक्रियेत पक्ष बनवण्यात आले आहे. अशा प्रकारे, लवादीय कार्यवाहीसाठी पूर्णपणे परके असलेल्या पक्षांवर कलम १६(६) अंतर्गत उपाययोजना एक कठोर आणि अपरिवर्तनशील सूत्र म्हणून लादली जावी आणि त्यांना संपूर्ण लवादीय संपरीक्षा सहन करावी लागावी, आणि अशा परिस्थितीत संविधानाच्या अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत रिट याचिकेच्या प्रकरणांमध्ये सदर आदेशाला आव्हान देण्याच्या उपाययोजनेची मान्यता

दिली जाऊ नये, हे कल्पन करणे कठीण आहे. कायद्याने अशा प्रकारच्या मर्यादित चौकटीत कार्य करू नये, विशेषतः त्या पक्षांच्या बाबतीत, जे लवाद कराराचे पक्ष नाहीत, आणि ज्यांच्याबाबतीत लवादीय प्रक्रियेस संमती सिद्ध होत नाही.

८२. आमच्या मते, जेव्हा लवादाच्या विवादाशी असंबद्ध असलेले पक्षकार असतात, तेव्हा पक्षकारांनी दिलेल्या अधिकारक्षेत्रापेक्षा वेगळ्या लवाद अधिकारक्षेत्राची व्याप्ती वाढवून लावादीय प्रक्रिया लादली जाऊ शकते, हा कायद्याचा नियम नाही. अप्रामाणिक वादकर्ते स्वतःच्या फायद्यासाठी अशा पद्धतींचा अवलंब करू शकतात, ज्यामुळे लवादीय प्रक्रियेपासून पूर्णपणे परक्या असलेल्या पक्षांना प्रक्रियेत नवीन पक्ष म्हणून सामील करणे शक्य होईल. याच कारणाने, विशिष्ट आणि अपवादात्मक परिस्थितींमध्ये, तसेच जे आदेश अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या अभावाने ग्रस्त आहेत किंवा तृतीय पक्षाच्या संदर्भात उघडपणे बेकायदेशीर आहेत, अशा आदेशांमध्ये अनुच्छेद २२६/२२७ अंतर्गत हस्तक्षेप करण्यास काहीच अडथळा नाही कारण हा संवैधानिक उपाय असून, एसीए च्या कलम ५, कलम १६(६) आणि कलम ३४ च्या तरतुदींपासून प्रभावित होत नाही.

८३. हे सुस्थापित आहे की घटनेतील तरतूद ही स्वतःच संविधानाची मूलभूत रचना असून, ती कायद्याने अप्रभावित राहते, आणि सद्य परिस्थितीत एसीए चे कलम ५ जे वाचले जाते कलम १६(६) आणि कलम ३४ सोबत यांची तरतूद त्यास बाधा आणू शकत नाही. म्हणूनच अशा स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये न्यायालयाने अशा तत्वांचे पालन करणे

अत्यावश्यक आहे, मात्र सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे, लवाद न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशांमध्ये हस्तक्षेप करताना विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे, कारण एसीए ही स्वतःमध्ये एक संपूर्ण संहिता आहे हे ओळखणे आवश्यक आहे. तथापि, याचा अर्थ असा नाही की लवाद न्यायाधिकरणाला पूर्ण व अनियंत्रित स्वातंत्र्य (कार्टे ब्लाँश) आहे की ते कोणताही आदेश देऊ शकेल किंवा त्या न्यायाधिकरणाला अंतर्निहित अधिकारक्षेत्र नसताना अधिकार वापरता येईल. अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा अभाव, जो लवादीय करारातील पक्षांमधील वादांच्या बाबतीत लागू होतो, त्याचा गैरसमज करून, असा अधिकार तृतीय पक्षांवर लागू केला जाऊ शकत नाही, विशेषतः त्या व्यक्तीवर जी सही न करणारी आहे, आणि लवादीय प्रक्रियेपासून पूर्णतः परकी आहे, म्हणजेच जो गट कंपनी सिद्धांत च्या कक्षा बाहेर आहे, किंवा जेव्हा असा पक्ष हे सिद्ध करू शकत नाही की तो लवादीय करारातील मूळ पक्षाच्या अंतर्गत दावा करतो किंवा मार्फत दावा करतो. म्हणून, जरी लवाद न्यायाधिकरणास, लवादीय प्रक्रियेतील मूळ पक्षांबाबत अधिकार असू शकतो, तरी ज्या क्षणी ते लवादीय कराराचे पक्ष नसलेल्या व्यक्तींवर किंवा संमती न दिलेल्या व्यक्तींवर अधिकार वापरते (गट कंपनी सिद्धांत लागू असल्याचा किंवा संमती दिलेल्या तृतीय पक्षाचा अपवाद करून), तेव्हा ते पक्षीय स्वायत्ततेच्या तत्त्वावर अतिक्रमण करते, जे लवादीय करारातून उद्भवणारे मूळ अधिकारक्षेत्रीय तत्त्व आहे. आमच्या मतानुसार, असा आदेश हा अंतर्निहित आणि स्पष्ट अधिकारक्षेत्राच्या अभावाने

ग्रस्त असतो आणि त्यामुळे अशा आदेशात हस्तक्षेप करणे अनुच्छेद २२६ / २२७ अंतर्गत योग्य ठरते.

८४. वरील निरीक्षणे ही लवाद प्रक्रियेला नियंत्रित करणाऱ्या मूलभूत घटकांवर आधारित आहेत, म्हणजे पक्षीय स्वायत्तता, पक्षांमध्ये अस्तित्वात असलेला वैध लावादीय करार, ज्याअंतर्गत पक्षकार स्वतःला लवाद न्यायाधीकरणाच्या अधिकारक्षेत्रासमोर सादर करतात. अशा पार्श्वभूमीवर, लावादीय करार अस्तित्वात असलेल्या लवाद प्रक्रियेत सहभागी पक्षांमध्ये असलेल्या वैध लावादीय कराराच्या मूलभूत आवश्यक घटकांच्या कक्षे बाहेर असलेल्या, आणि ज्याचा लवाद प्रक्रियेत कोणत्याही पक्षाशी किंवा लवादाच्या विषयाशी कोणताही संबंध नाही, अशा पक्षाला नवीन पक्षाला दाव्यात सामील करण्याच्या दृष्टीने, न्यायाधीकरणाला अंतर्निहित पद्धतीने अधिकारक्षेत्र प्राप्त होत नाही. पक्षांनी लावादीय कराराद्वारे वाद सोपविलेल्या वादांचे निवारण करताना अशा तृतीयपक्षाला लवाद प्रक्रियेच्या कक्षेत आणण्याचे अधिकारक्षेत्र न्यायाधीकरणाकडे असू शकत नाही.

८५. वरिल चर्चेच्या पार्श्वभूमीवर, प्रथम प्रश्नाच्या संदर्भात, काही निर्विवादित तथ्यांचा विचार करणे आवश्यक आहे. सदर लवादीय कार्यवाही विद्वान एकल लवाद यांच्यापुढे सुरू आहे आणि प्रामुख्याने मे . इमिनन्स (उत्तरवादी क्रमांक १) आणि मे. गगन (उत्तरवादी क्रमांक २) यांच्यामधील कार्यवाही आहे मे. इमिनन्स आणि मे . गगन

यांच्यातील वाद करारनामा दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ अंतर्गत उद्भवला आहे, ज्यामध्ये मे. गगन याचे वर्णन ‘विकासक’ असे केले आहे आणि मे. इमिनन्स याचे वर्णन ‘गुंतवणूकदार’ असे केले आहे. या कारणास्तव, करारनाम्याचे पक्ष केवळ दावेदार-मे. इमिनन्स आणि मे. गगन होते, कारण ते दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या साठे करारनाम्याचे पक्ष/सही करणारे होते. आम्ही हेही नमूद करू शकतो की मे. गगन ही लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप ऍक्ट, २००८ अंतर्गत नोंदणीकृत भागीदारी संस्था असून, मे. इमिनन्स यांनी मे. गगन विरुद्ध दाव्यात मे. गगनच्या उत्तरवादी क्रमांक ३ ते ५ या भागीदारांद्वारेही दावा दाखल केला आहे. पुढे, उत्तरवादी क्रमांक ६ ते ८ हे मे. गगन यांनी मे. इमिनन्स कडून घेतलेल्या रकमेबाबत हमीदार म्हणून त्यांच्या क्षमतेत लवादीय कार्यवाहीत नवीन पक्ष म्हणून दाव्यात जोडले गेले आहेत. उत्तरवादी क्रमांक ९, जो याचिकाकर्त्यास संबंधित दावा मिळकत विकणारा होता, त्यास नंतर लवादीय कार्यवाहीत पक्ष म्हणून सामील करण्यात आले. मे. इमिनन्स यांनी दाव्यात सामील केलेल्या इतर पक्षांबाबत आम्ही कोणतीही चर्चा करू इच्छित नाही, कारण त्या बाबी या कार्यवाहीतील विचारप्रक्रियेच्या चौकटीत येत नाहीत.

८६. याप्रमाणे, दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या करार कलमांमधील मूळ पक्षकार (principal parties), ज्यांच्याअंतर्गत वाद आणि मतभेद उद्भवले आहेत, ते मे. एमीनन्स आणि मे. गगन हे होते, जे सदर कराराच्या कलम ७ मध्ये समाविष्ट असलेल्या

लवाद करारानुसार लवाद न्यायाधीकरणासमोर प्रतिस्पर्धी पक्षकार होते, कारण कलम ७ हे मे. एमीनन्स आणि मे. गगन यांनी लवाद न्यायाधीकरणाला दिलेल्या अधिकारक्षेत्राचा मूलभूत स्रोत होता, आणि हेच लवाद कराराचे एकमेव पक्षकार आहेत. कलम ७ — लवाद करार पुढीलप्रमाणे आहे:

> "या करारनाम्यातील तरतुदींमधून किंवा त्यातील कोणत्याही कलमातून किंवा बाबीतून उद्भवणारे किंवा संबंधित असलेले सर्व वाद आणि मतभेद, तसेच या करारनाम्याच्या अस्तित्वाच्या कालावधीत प्रत्येक पक्षाने आपापल्या हक्क व जबाबदाऱ्यांच्या पूर्ततेशी संबंधित असलेले प्रश्न, लवाद आणि समेट अधिनियम, १९९६ च्या तरतुदीनुसार लवादाकडे सोपविले जातील. अशा लवादासाठी तिन्ही लवाद नेमले जातील, प्रत्येक पक्ष एक लवाद नेमेल आणि त्या दोघांनी तिसऱ्या लवादाची नियुक्ती मुख्य लवाद म्हणून करावी. संदर्भातील मुद्द्यावर बहुमताने घेतलेला लवादांचा निर्णय अंतिम आणि संबंधित पक्षांवर बंधनकारक असेल."

८७. लवाद कराराची नोंद घेतल्यानंतर, दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या करारनाम्या अंतर्गत, ज्या लवाद करणाऱ्या पक्षांमध्ये (मे. एमिनन्स आणि मे. गगन) वाद उद्भवले आहेत, त्यातील विविध कलमांमधून हे स्पष्ट होते की सदर करारनाम्याचे स्वरूप काय आहे, हे विचारात घेणे देखील आवश्यक ठरेल. वर नमूद केल्याप्रमाणे, दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या करारनाम्यात, मे. गगनला “विकासक/प्रवर्तक” तर मे. एमिनन्सला "गुंतवणूकदार" असे नमूद करण्यात आले आहे, त्यामुळे तो स्पष्टपणे एक वित्तीय करार आहे. करारनाम्यातील पुढील प्रस्तावना पक्षकारांचा उद्देश स्पष्ट करेल:

> “ज्याअर्थी विकासक/प्रवर्तक यांनी सध्या "सन अँड सँड हॉटेल" या नावाने आणि शैलीने चालणारी हॉटेल मालमत्ता (यापुढे "हॉटेल" म्हणून संदर्भित) खरेदी करण्यासाठी मोलभाव केला आहे, ज्यामध्ये सर्व त्या जमिनीचा विकासाचा हक्क समाविष्ट आहे, जी जमीन सर्व्हे क्र. २३ मधील प्लॉट क्र. २६२ असून, अंदाजे ४९,५०० चौ. फूट क्षेत्रफळाची आहे, जी बंड गार्डन रोड, पुणे – ४११००१ येथे स्थित आहे, पुणे महानगरपालिका हद्दीत, तालुका हवेली, जिल्हा पुणे, आणि यापुढे संक्षेप आणि सोयीसाठी,

"सदर मालमत्ता" म्हणून उल्लेखित केली आहे, आणि खालील अनुसूचीत अधिक स्पष्टपणे वर्णन केलेली आहे.

आणि ज्याअर्थी विकासक /प्रवर्तक यांनी सदर हॉटेल पाडून त्या मालमत्तेवर बहुमजली इमारत/इमारती/प्रकल्प उभारण्याची इच्छा व्यक्त केली आहे आणि त्या उद्देशासाठी आवश्यक गरजांच्या पूर्ततेकरिता तसेच प्रकल्पाचे सुरळीत बांधकाम व पूर्णता करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. विकासक/प्रवर्तक यांनी गुंतवणूकदाराकडे प्रस्तावासह संपर्क साधला व सदर प्रकल्पात रुपये २५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस कोटी फक्त) इतकी गुंतवणूक करण्याची विनंती केली. विकासक/प्रवर्तक यांनी गुंतवणूकदारासमोर आपली सादरीकरणे दाखविली व योजना समजावून सांगितली. सदर योजना आणि त्यातून मिळणाऱ्या आकर्षक व निश्चित परताव्याच्या आश्वासनामुळे प्रभावित होऊन, गुंतवणूकदाराने त्या योजनेत रुची दाखविली आणि आकर्षक योजनेवर समाधान होऊन, या करारनाम्यात नमूद केलेल्या अटी व शर्तींवर सदर प्रकल्पात रुपये २५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस कोटी फक्त) इतकी गुंतवणूक करण्यास सहमती दर्शविली आहे.

आणि ज्याअर्थी मे. गगन एस डेव्हलपर्स, मे. गगन उन्नती व्हेंचर्स (एओपी) आणि मे. गगन एस होरायझन तसेच एलएलपीचे प्रवर्तक/विकासक भागीदार, त्यांच्या वैयक्तिक क्षमतेने, विकासक/प्रवर्तक यांच्या वतीने आणि त्यांच्या तर्फे, संयुक्तरीत्या व स्वतंत्ररीत्या हमीदार म्हणून उभे राहण्यास तयार झाले आहेत.

आणि ज्याअर्थी मे. गगन एस डेव्हलपर्स, मे. गगन उन्नती व्हेंचर्स (एओपी) आणि मे. गगन एस होरायझन तसेच एलएलपीचे भागीदार प्रवर्तक/विकासक, त्यांच्या वैयक्तिक क्षमतेने, गुंतवणूकदाराच्या अनुकूलतेसाठी आणि या करारनाम्यात पुढे नमूद केल्याप्रमाणे निश्चित लाभांच्या संदर्भात, संयुक्तरीत्या व स्वतंत्ररीत्या हमीदार म्हणून उभे राहण्यास तयार झाले नसते, तर गुंतवणूकदाराने विकासक/प्रवर्तकाला कोणतीही रक्कम गुंतवण्यास सहमती दर्शविली नसती.

आता हा करारनामा साक्ष आहे आणि खालीलप्रमाणे या करारातील पक्षकारांमध्ये सहमती करण्यात येत आहे:

१. या करारनाम्याच्या अंमलबजावणीपूर्वी किंवा त्या दिवशीच, गुंतवणूकदाराने विकासक/प्रवर्तक यांना रुपये ६,००,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी फक्त) खालीलप्रमाणे अदा केले आहेत:

क्रमांक	दिनांक	बँकेच्या नावावर धनादेश काढलेला त्या बँकेचे नाव	धनादेश क्रमांक	रक्कम (रु.)
१.	१८.०२.२०१७	ॲक्सिस बँक, औंध शाखा	२२३९०४/२२३९०३	रु. ६,००,००,०००/-
एकूण				रु. ६,००,००,०००/-

[ज्याची प्राप्ती विकासक/प्रवर्तक यांनी स्वीकारली असून, त्या रकमेपासून गुंतवणूकदारास मुक्त, दायमुक्त व संपूर्णतः वगळण्यात येत आहे.]

२. उर्वरित रक्कम रुपये १९,००,००,०००/- (अक्षरी रुपये एकोणीस कोटी फक्त) गुंतवणूकदाराने विकासक/प्रवर्तक यांना दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ पूर्वी किंवा त्या दिवशी अदा करावयाची आहे.

३. गुंतवणूकदारास, आपल्या विवेकबुद्धीनुसार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ पूर्वी किंवा त्या दिवशी व्यवहार रद्द करण्याचा अधिकार असेल आणि विकासक /प्रवर्तक यांनी गुंतवणूकदारास रुपये ६,००,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी फक्त) दिनांक ०१ मार्च २०१७ पर्यंत परत करावयाचे आहे. वेळ हा या व्यवहाराचा अत्यावश्यक भाग असल्याने, विलंब झाल्यास, विकासक/प्रवर्तक यांनी देयकाच्या तारखेपासून, प्रतिमहिना चक्रवाढ पद्धतीने वार्षिक १८% व्याजासह ती रक्कम देय होईल. वरील दिनांकानंतर विलंब झाल्यास, वरील रक्कम आणि व्याज यांव्यतिरिक्त, गुंतवणूकदारास विकासक/प्रवर्तक यांच्या सर्व मालमत्तेवर बोजा ठेवण्याचा अधिकार राहील.

४. विकासक/प्रवर्तक यांना सदर मालमत्तेचा व्यवहार कायदेशीरदृष्ट्या अंमलबजावणीस योग्य अशा कराराद्वारे निश्चित करण्यात व त्या संदर्भात आवश्यक दस्तांवर स्वाक्षरी करण्यात दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत अपयश आले, तर रुपये २५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस कोटी फक्त) किंवा गुंतवणूकदाराने प्रत्यक्षात अदा केलेली रक्कम, गुंतवणूकदारास दिनांक ३० एप्रिल २०१७ पर्यंत परत केली जाईल, आणि देयकाच्या तारखेपासून प्रतिमहिना चक्रवाढ पद्धतीने वार्षिक १८% व्याज देखील दिले जाईल. वरील दिनांकानंतर विलंब झाल्यास, वरील रक्कम आणि व्याज यांव्यतिरिक्त, गुंतवणूकदारास विकासक/प्रवर्तक यांच्या सर्व मालमत्तेवर बोजा ठेवण्याचा अधिकार राहील.

५. विकासक/प्रवर्तक यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यास सहमती दर्शविली आहे:

> ५.१ विकासक/प्रवर्तक यांनी वरील नमूद प्रकल्पाच्या विकासासाठी सदर मालमत्तेवर आवश्यक परवानग्या / एनओसी / मंजुरी प्राप्त कराव्यात. विकासक/प्रवर्तक यांच्याकडून कोणतीही चूक / अपयश झाल्यास त्या बाबतीत गुंतवणूकदार कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
>
> ....
>
> ५.७ विकासक/प्रवर्तक सदर हॉटेल खरेदी करण्यासाठी पैसा उधार घेऊ शकतात व बांधकामासाठी वित्तीय सहाय्य देखील घेऊ शकतात. या करारनाम्यात नमूद केल्याव्यतिरिक्त कोणतेही उधारीकरण करण्यासाठी गुंतवणूकदाराची पूर्वलिखित संमती आवश्यक असेल, व ज्या प्रकरणांमध्ये बँकेकडून कर्ज घेतले जाईल, त्या सर्व प्रकरणांमध्ये सदर मालमत्तेवर गुंतवणूकदाराचा द्वितीय बोजा राहील, जोपर्यंत या करारनाम्यातील अटींनुसार संपूर्ण रक्कम गुंतवणूकदारास अदा होत नाही; प्रथम बोजा त्या बँकेचा असेल, ज्या बँकेकडून विकासक/प्रवर्तक वरील नमूद प्रकल्पासाठी कर्ज घेतील.
>
> ५.८ विकासक/प्रवर्तक यांनी संपूर्ण प्रकल्पातून विक्रीयोग्य क्षेत्र २ ,००,००० चौ. फूट हस्तांतरित करून किमान एकूण महसूल रुपये ३६०,००,००,०००/- (अक्षरी रुपये तीनशे साठ

कोटी फक्त) मिळवण्याची हमी दिली आहे. विकासक/प्रवर्तक यांनी एकूण महसुलाच्या १५% रक्कम किंवा किमान रुपये ५४,००,००,०००/- (अक्षरी रुपये चोपन्न कोटी फक्त) गुंतवणूकदारास खाली नमूद केल्याप्रमाणे अदा करण्याची हमी दिली असून, खाली नमूद केलेल्या समयमर्यादांचे पालन करण्याचे बंधन स्वीकारले आहे:

क्रमांक	गुंतवणूकदारास देय महसूल / वाटा	टक्केवारी	किमान हमी रक्कम (रु.)
१.	३१ मार्च २०१८ पर्यंत	१२%	६,४८,००,०००/-
२.	३१ मार्च २०१९ पर्यंत	४५%	२४,३०,००,०००/-
३.	३१ मार्च २०२० पर्यंत	१००%	५४,००,००,०००/-

देयकाची वेळ ही सदैव या कराराचा अत्यावश्यक भाग असेल. वरील समयमर्यादा पूर्ण करण्यात अपयश आल्यास विलंबित देयकावर प्रतिमहिना चक्रवाढ पद्धतीने वार्षिक १२% व्याज लागेल आणि गुंतवणूकदारास अनुषंगिक रित्या गहाणखतावर हक्क बजावण्याचा अधिकार प्राप्त होईल.

६. विकासक/प्रवर्तक यांनी वरील नमूद प्रकल्प दिनांक ०१ एप्रिल २०१७ रोजी सुरू करावयाचा आहे आणि प्रकल्पाचा संपूर्ण एकूण महसूल ३६ महिन्यांच्या आत , म्हणजे दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत प्राप्त करावयाचा आहे. तथापि, जर दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत एकूण महसूल रु. २८८,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोनशे अठ्ठयाऐंशी कोटी फक्त) वसूल/प्राप्त झाला आणि त्यातील १५% रक्कम गुंतवणूकदारास निश्चित परताव्याप्रमाणे अदा करण्यात आली किंवा गुंतवणूकदाराच्या खात्यात वर्ग करण्यात आली, तर ३६ महिन्यांच्या कालावधीवर जास्तीत जास्त ६ महिन्यांची वाजवी वाढ विकासक/प्रवर्तक यांना मिळू शकते. निर्धारित समयमर्यादा किंवा कार्यप्रदर्शन पूर्ण करण्यात अपयश आल्यास, गुंतवणूकदारास अनुषंगिकरित्या हक्क बजावण्याचा अधिकार प्राप्त होईल किंवा प्रकल्पातील युनिट्स, बाकी असलेल्या रकमेच्या बदल्यात, ४०% सूट दराने ताब्यात घेण्याचा अधिकार मिळेल. प्रकल्पातील युनिट्सच्या किमतीची गणना करण्यासाठी मागील ६ महिन्यांतील विक्री व्यवहारांमधील विक्री किमतींचा सरासरी दर विचारात घेतला जाईल. युनिट्सची किमान विक्री किंमत विकासक/प्रवर्तक व गुंतवणूकदार यांच्या परस्पर सल्लामसलतीने ठरविली जाईल आणि ती वेळोवेळी बदलता येईल.

...

८. या करारनाम्यात अंतर्भूत असलेल्या व्यवस्थेचे स्वरूप असे आहे की विकासक/प्रवर्तक यांनी गुंतवणूकदारांचे या प्रकल्पामध्ये हक्क/स्वारस्य निर्माण केले आहेत, ज्यामध्ये विकासक/प्रवर्तक यांनी या कराराच्या अटींनुसार एकूण महसूल वाटून देण्याचे बंधन घेतले आहे. तथापि, अत्यंत खबरदारीचा उपाय म्हणून, पक्षकारांनी या करारनाम्यावर महाराष्ट्र स्टॅम्प अधिनियम, १९५८ च्या तरतुदींनुसार मुद्रांक शुल्क भरून हा करारनामा मुद्रांकित केला आहे.

भर दिला.

८८. हे स्थापित आहे की कोणत्याही करारातील पक्षकारांचा उद्देश हा संपूर्ण कराराचे सर्वंकष वाचन केल्यावर निश्चित केला जातो. या संदर्भात, सदर करारनाम्यातील विविध कलमे वाचल्यास, मे. एमिनन्स यांनी मे. गगन यांना प्रस्तावित प्रकल्पाकरिता निधी उपलब्ध करून देण्यासंबंधीचा वित्तीय करार आहे, हे स्पष्ट होते, जो प्रकल्प प्रश्नांकित जमिनीवर मे. गगन यांनी हाती घ्यावयाचा होता. तथापि, वरील प्रमाणे, आपण नोंदविलेल्या कलमांवरून असे स्पष्ट दिसते की प्रश्नांकित जमिनीवर मे. एमिनन्स यांच्या हितासाठी कोणताही बोजा निर्माण करण्याचा पक्षकारांचा उद्देश नव्हता, जे कलम (४) (सुप्रा) च्या वाचनांमधून स्पष्ट होते, कारण मे. गगन यांनी दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत सदर मालमत्तेचा व्यवहार निश्चित करण्यात अपयश आल्यास, मे. गगन यांच्यावर मे. एमिनन्स कडून घेतलेली रुपये २५ कोटी रक्कम, कलम (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे परत करण्याचे बंधन आहे. यावरून स्पष्ट होते की सदर करारनामा हा केवळ वित्तीय/गुंतवणूक करार होता आणि मे. एमिनन्स यांच्या हितासाठी जमिनीवर/मालमत्तेवर कोणताही हक्क निर्माण करणारा करार नव्हता.

८९. मे. एमिनन्स यांनी उपलब्ध करून दिलेला वित्तपुरवठा हा प्रकल्पासाठी वापरला जाणार होता. संबंधित काळात प्रश्नांकित जमिनीबाबत उत्तरवादी क्रमांक २ मे. गगन यांच्या नावावर कोणत्याही हक्काचा अंशही नव्हता. त्यामुळे सदर करारनाम्याच्या आधारे त्या जमिनीत मे. एमिनन्स यांचा अगदी दूरस्थ हक्क देखील मान्यताप्राप्त होऊ शकत

नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, करारपत्राच्या दिनांकास जर मे. गगनकडे सदर जमिनीसंदर्भात कोणताही हक्क नव्हता, तर लवादाशी कराराची गोपनीयता नसलेल्या सदर करारातील तृतीय पक्षांना सदर करारांतर्गत कोणत्याही वादावर काहीही करण्याची कल्पना कशी करता येईल म्हणूनच, मे. एमिनन्स यांच्या दृष्टीने जमिनीबाबत कोणताही हक्क करारनाम्याच्या तारखेस अस्तित्वात नव्हता. ही परिस्थिती स्पष्ट असल्यामुळे, दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ चा करारनामा हा मालमत्तेशी संबंधित करार मानला जाऊ शकत नाही. प्रत्यक्षात, मे. गगन हे मालमत्ता खरेदीचा व्यवहार निश्चित करू न शकल्यास, त्या परिस्थितीसाठी करारनाम्यात यंत्रणा आधीपासूनच उपलब्ध करून देण्यात आली आहे, व त्याचा परिणाम कलम (३) आणि (४) प्रमाणे केवळ रकमेची परतफेड हाच आहे. कलम (५) मध्ये अशी परिस्थिती गृहीत धरण्यात आली आहे की मे. गगन यांनी मालमत्ता खरेदी केली व ती विकसित करावयाची आहे. करारनाम्यातील कलम (५) चे साधे वाचन केल्यास स्पष्ट होते की हक्क केवळ रक्कम परत मिळविण्यापुरते मर्यादित होते आणि त्या संदर्भातच कलम ५.७ वाचले जाणे आवश्यक आहे, म्हणजेच मालमत्तेबाबतचे हक्क मे. गगन यांच्या बाजूने प्राप्त झाले किंवा निर्णायक झाले तरच.

९०. याशिवाय, कलम ५.८ वरून दिसते की, देयकाच्या वेळेबाबत पक्षकारांनी कराराचा अत्यावश्यक घटक म्हणून सहमती दर्शविली होती आणि ठरविलेल्या वेळेमध्ये देयक न केल्यास विलंबित देयकावर प्रतिमहिना चक्रवाढ पद्धतीने वार्षिक १२% व्याज लागू

होणार होते, आणि त्या प्रमाणात मे. एमिनन्स यांना अनुषंगिकरित्या हक्क बजावण्याचा अधिकार मिळणार होता. आमच्या स्पष्ट मतानुसार, कलम ५ (५.१ ते ५.१९), तसेच कलम ६ आणि ८, कोणत्याही प्रकारे हे दाखवत नाहीत की करारनाम्याद्वारे मे. एमिनन्स यांच्या बाजूने प्रश्नांकित मालमत्तेत कोणताही हक्क निर्माण करण्यात आला होता किंवा करारनामा हा वित्तीय करार नसून प्रत्यक्ष मालमत्तेशी संबंधित करार होता, जसे की कलम ९ च्या कार्यवाहीमध्ये योग्यरीत्या निष्कर्ष काढण्यात आला आहे. कराराचा कोणताही इतर अर्थ लावल्यास, कराराच्या इतर अटी व शर्तींचे उल्लंघन होईल, जे स्पष्ट आणि असंदिग्ध आहेत. ना लवाद न्यायाधीकरण, ना न्यायालय, हे पक्षकारांनी स्पष्टपणे मान्य केलेल्या अटींपेक्षा वेगळा अर्थ लावू शकत नाहीत. तथापि, लवाद न्यायाधीकरणाने करारातील कलमांच्या मुख्य गुणांवर कार्यवाही करण्याऐवजी, करारपत्राला पुन्हा लिहिण्याची स्पष्टपणे कार्यवाही केली आहे. दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या करारनाम्यातील वरील कलमांवरून जे स्पष्ट होते, त्यापेक्षा वेगळ्या असलेल्या त्रुटी भरून काढणे हे लवाद न्यायाधीकरणाचे अधिकारक्षेत्र नाही. आमच्या मते, अगदी विशिष्ट पद्धतीने आणि लवादातील तृतीय पक्षाच्या हक्कांच्या उलट असलेल्या गोष्टीच्या आधारावर, अशा तृतीय पक्षाच्या हक्कांवर आणि त्यांच्या मालमत्तेवर निर्णय दिला गेला आहे. याचिकाकर्त्याने लवादाला संमती दिलेली नसतानाही, याचिकाकर्त्याला लवाद कराराच्या कक्षेमध्ये आणण्यासाठी, विद्वान लवादाने ज्या विचारांना प्राधान्य दिले, जे संबंधित नाहीत, ते खालील लवाद न्यायाधीकरणाने दिलेली कारणे स्पष्ट करतील:-

"२५. हे खरे असू शकते की करारनाम्यातील कलम ४ नुसार, उत्तरवादी क्रमांक १ दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत प्रश्नांकित मालमत्ता खरेदी करण्यात अपयशी ठरल्यास, करारान्वये आगाऊ दिलेली रक्कम व्याजासह वार्षिक १८% दराने परत घेण्याचा हक्क दावेदाराला मिळणार होता आणि हे निर्विवाद आहे की निर्धारित मालमत्ता उत्तरवादी क्रमांक ८ यांनी दिनांक ३१/०३/२०१७ नंतर, म्हणजे दिनांक ०१/०९/२०१७ रोजी खरेदी केली. तथापि, या बाबीवरून उत्तरवादीच्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी मांडलेला युक्तिवाद की करारातील तरतुदींच्या प्रभावाने दावेदारास केवळ मे. गगन यांच्याकडून करारान्वये आगाऊ दिलेल्या रकमेची वसुली करण्यासाठी पैसे परत मिळवण्याचा दावा करता येईल, आणि दावेदारास निर्धारित मालमत्तेबाबत कोणताही हक्क किंवा स्वारस्य सांगता येणार नाही, हा युक्तिवाद स्वीकारता येऊ शकत नाही, कारण दिनांक २०/०२/२०२३ च्या पत्रानुसार उत्तरवादी क्रमांक ८ यांनी दावेदाराच्या हितासाठी प्रश्नांकित मालमत्तेवर होणाऱ्या बांधकामात हक्क निर्माण केले आहेत, ज्याअंतर्गत उत्तरवादी क्रमांक ८ यांनी 'गगन कॉमर्स सेंटर' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पातील, काही बांधकाम क्षेत्र दावेदारास देण्याचे मान्य केले आहे, जो प्रकल्प प्रश्नांकित मालमत्तेवर विकसित केला जाणार आहे. म्हणूनच, दावेदारास दिनांक २५/०२/२०१७ च्या करारनाम्याद्वारे तसेच उत्तरवादी क्रमांक ८ यांनी जारी केलेल्या सदर पत्राद्वारे मालमत्तेबाबत काही हक्क प्राप्त झाले आहेत, हे प्रथमदर्शनी नाकारता येणार नाही."

९१. वरील निरीक्षणे ही प्रथमदर्शनी स्वीकारता येऊ शकत नाहीत, कारण त्यावरून याचिकाकर्त्याचा कोणताही संबंध असल्याचे अनुमान काढता येत नाही. याचिकाकर्ता हा लवाद प्रक्रियेतील पूर्णपणे तृतीय पक्ष आहे आणि त्या आधारावर याचिकाकर्त्यावर बंधनकारक असा कोणताही लवाद करार अस्तित्वात येत नाही, ज्यायोगे याचिकाकर्त्याने स्वतःला लवाद प्रक्रियेस अधीन केले, असे म्हणता येईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, उत्तरवादी क्रमांक ९ यांनी दावेदारास पाठविलेले दिनांक २० फेब्रुवारी २०२३ चे पत्र, जे विद्वान जिल्हा न्यायाधीशांनी दिलेल्या आदेशाच्या (दिनांक २२ मार्च २०२४) पूर्वीचे आहे, आणि उत्तरवादी क्रमांक ९ व याचिकाकर्ता यांच्यात नोंदवण्यात आलेल्या हस्तांतरण दस्त दिनांक २९ मार्च २०२४ रोजीच्या पूर्वीचे आहे, अशा पत्राद्वारे दावेदार/मे. एमिनन्स आणि याचिकाकर्ता यांच्यामध्ये कोणत्याही कोणत्याही प्रकारचे हितसंबंध

निर्माण करू शकत नव्हते. शिवाय, सदर पत्र कलम ९ च्या कार्यवाहीत विचाराधीन होते, ज्यावर विद्वान जिल्हा न्यायालयाने मे. एमिनन्सचा कोणताही बोजा निर्माण झाल्याचा दावा स्वीकृत केला नाही, हे लक्षात घेता, मे. एमिनन्ससोबत, आणि याचिकाकर्त्यासोबत तर बिलकुलच नाही, कराराची गोपनीयता ठेवण्यासाठी उत्तरवादी क्र. ९ साठी देखील असे पत्र आधार बनू शकले नसते. काहीही असो, विद्वान जिल्हा न्यायाधीशांनी सदर पत्रावर दिलेले निष्कर्ष खरेतर अंतिम झाले होते, म्हणून विद्वान एकल लवादाने, मे. एमिनन्सचा सदर जमिनीवर कोणताही बोजा किंवा हितसंबंध नाही या विद्वान जिल्हा न्यायाधीशांच्या निष्कर्षांना दुर्लक्षित करून आणि वेगळा निष्कर्ष काढणे हा योग्य दृष्टिकोन नव्हता.

एकदा पटलावरील स्थिती अशी झाली की मे. एमिनन्स यांनी तो निष्कर्ष स्वीकृत केला आहे, तर त्यानंतर लवाद प्रक्रियेत तो निष्कर्ष पुन्हा उघडण्याचा प्रश्नच राहत नाही आणि तेही विशेषत: तृतीय पक्षाला, जो या लवाद प्रक्रियेबाहेरील आहे त्याला दाव्यात सामील करण्याच्या अर्जावर विचार करताना तर अजिबातच नाही.

९२. वरील पार्श्वभूमीवर, लवाद कार्यवाहीच्या विषय (subjecta materia) असलेल्या कराराच्या संदर्भात आणि लवादीय वादाचा आधार म्हणून, याचिकाकर्त्याचे कायदेशीर स्थान काय आहे, याचा आम्हाला विचार करण्याची आवश्यकता आहे. याचिकाकर्ता हा उत्तरवादी क्र. ९ आणि याचिकाकर्ता यांच्यात निष्पादित झालेल्या दिनांक २९ मार्च

२०२४ च्या हस्तांतरण दस्तऐवजाद्वारे दावा मिळकतीचा मालक बनला आहे, याबद्दल कोणताही वाद दिसत नाही. सदर हस्तांतरण दस्त उपनिबंधक कार्यालयात नोंदविला गेला. विषयांकित मालमत्तेचा हस्तांतरण दस्त हा पूर्णपणे स्वतंत्र व्यवहार आहे आणि त्याचा प्रश्नांकित गुंतवणूक करार आणि लवादीय न्यायनिर्णयाचा विषय, म्हणजेच दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या करारपत्राशी कोणताही संबंध नाही, याबद्दल कोणताही वाद नाही. तसेच हस्तांतरण दस्त कायदेशीर, वैध आणि अस्तित्वात असलेला होता, ज्याद्वारे मालमत्तेवरील प्रत्यक्ष मालकी हक्क याचिकाकर्त्याच्या बाजूने , कोणत्याही प्रकारच्या बोजा शिवाय हस्तांतरित झाले, आणि असे हस्तांतरण इन रेम (in rem) स्वरूपात होते, जे कोणत्याही सक्षम अधिकारक्षेत्रातील प्रकरणात, कोणत्याही पक्षाने आव्हानित केलेले नव्हते. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, याचिकाकर्त्याला मालमत्तेबाबत हक्क, दावा किंवा कोणताही लाभ सांगण्यास प्रतिबंध करणारा कोणताही मनाई आदेश अस्तित्वात नव्हता, जो त्या हस्तांतरण दस्तास आडकाठी करू शकला असता. सदर बाबतीत हस्तांतरण दस्तातील खालील अटी नोंदविणे आवश्यक आहे:

> "१. विक्रेत्याचा मालमत्तेवरील मालकी हक्क स्पष्ट व बाजारात विकण्यायोग्य आहे आणि सर्व प्रकारच्या बोजा, वाद, दावे व शंका यांपासून मुक्त आहे. विक्रेता हा मालमत्तेचा कायदेशीर व लाभदायक मालक आहे आणि त्याला मालमत्तेचा मालकी हक्क, वापर, हस्तांतरण, विक्री किंवा अन्य कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावण्याचा पूर्ण, अनन्य, आणि कायदेशीररित्या अंमलबजावणी करण्यायोग्य अधिकार आहे;
>
> ....
>
> ४. विक्रेत्याने सदर मालमत्ता वैध व कायदेशीररित्या प्राप्त केली असून, विक्रेता सदर मालमत्तेच्या शांत, रिक्त आणि निर्विघ्न ताब्यात आहे;

……

९. विक्रेत्याने किंवा त्याच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने सदर मालमत्तेसंदर्भात किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणताही तृतीय पक्ष हक्क निर्माण केलेला नाही. तसेच कोणत्याही व्यक्तीस विक्री, गहाण, ग्रहणाधिकार, बोजा, भेट, भाडेकरार, विश्वस्त, भाडेकरू हक्क, ताबा, भोगवटा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणताही हक्क, मालकी हक्क, दावा किंवा स्वारस्य नाही;

………

१३. जमिनीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणतेही अतिक्रमण, अनधिकृत प्रवेश, भाडेकरू, भोगवटादार, किंवा परवाना धारक नाहीत;

…..

१५. जमीन एकसंध (contiguous) आहे आणि ती फ्रीहोल्ड हक्काची आहे. जमिनीच्या महसूल नोंदींमध्ये मर्यादित हक्क / मर्यादित करार दर्शविणारी कोणतीही नोंद किंवा शेरा नाही; …

१९. कोणत्याही शासकीय प्राधिकरणाकडून किंवा कोणत्याही इतर स्थानिक संस्थेकडून किंवा प्राधिकरणाकडून किंवा कोणत्याही कायद्यांतर्गत, ज्यात न्याय्य नुकसानभरपाई आणि पारदर्शक भू संपादन, पुनर्वसन आणि पुनर्संयोजन अधिनियम, २०१३, साथीचे रोग अधिनियम किंवा भू संपादन अधिनियम किंवा टाउन प्लॅनिंग कायदे किंवा भाडेकरू आणि कृषी कायदे किंवा महानगरपालिका अधिनियम/कायदे किंवा डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट्स, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ किंवा कोणतेही पर्यावरण कायदे किंवा कोणतेही इतर कायदेमंडळ अधिनियम/नियम, शासन निर्णय, आदेश किंवा अधिसूचना यांचा समावेश आहे, परंतु ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाहीत – विक्रेत्याला दावा जमिनीसंदर्भात किंवा त्याच्या कोणत्याही भागासंदर्भात अधिग्रहण आणि/किंवा संपादनासाठी कोणतीही नोटीस, दावे किंवा मागण्या प्राप्त झालेल्या नाहीत, ज्यामुळे विक्रेत्याच्या मालमत्तेच्या मालकी हक्कावर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कोणत्याही प्रकारे परिणाम होईल किंवा ज्याचा येथे अपेक्षित असलेल्या मालमत्तेच्या विकासावर आणि विपणनावर कोणत्याही प्रकारे परिणाम होईल किंवा मालमत्तेच्या विकास क्षमतेवर कोणत्याही प्रकारे परिणाम होईल;

२०. कोणतीही घटना, तथ्य, परिस्थिती, बदल, विकास किंवा परिणाम, प्रलंबित किंवा संभाव्य खटला, तपास किंवा कार्यवाही घडलेली नाही, ज्यामुळे मालमत्तेवर किंवा खरेदीदाराच्या मालमत्तेचा व्यवहार करण्याच्या हक्कांवर प्रतिकूल परिणाम होईल किंवा या दस्ताची वैधता, कायदेशीरता, बंधनकारक स्वरूप किंवा लागू करण्याची क्षमता यावर प्रतिकूल परिणाम होईल;

२१. मालमत्ता अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणतीही वादप्रकरणे किंवा कार्यवाही प्रलंबित नाहीत, ज्यामध्ये प्राप्तिकर अधिनियम, १९६१ अंतर्गत कलम २८१ मालमत्ता किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही खटल्याचा किंवा कार्यवाहीचा विषय नाही, ज्यात प्राप्तिकर अधिनियम, १९६१ च्या कलम २८१ आणि/किंवा वस्तू आणि सेवा कर अधिनियम, २०१६ च्या कलम ८१ (ज्याचा दावा जमिनीवर परिणाम होतो) अंतर्गत प्राप्तिकर अधिनियम, १९६१ नुसार अपेक्षित असलेली कोणतीही कार्यवाही समाविष्ट आहे असा वाद कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधीकरणात, किंवा लवादात,

किंवा महसूल प्राधिकरणासमोर, किंवा अर्धन्यायिक कार्यवाहीमध्ये प्रलंबित नाही; तसेच मालमत्ता/जमीन किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणतेही मनाई आदेश, जप्ती आदेश, अधिग्रहण, रिक्विझेशन, न्यायनिर्णयपूर्व किंवा न्यायनिर्णयानंतरचे कोणतेही आदेश लागू नाहीत, किंवा न्यायालयीन रिसिव्हरच्या ताब्यात/प्रतीकात्मक किंवा प्रत्यक्ष ताब्यात नाही; आणि विक्रेता/जमीन यांच्याविरुद्ध कोणताही धनादेश संबंधी हुकूमनामा पारित झालेला नाही.

.....

२३. कोणत्याही प्राधिकरणाकडून किंवा कोणत्याही तृतीय पक्षाकडून विक्रेता आणि/किंवा त्यांच्या मालकी हक्काच्या पूर्वाधिकारीं विरोधात कोणताही मनाई आदेश, जैसे थे आदेश, पाडकाम आदेश किंवा इतर कोणताही आदेश / नोटीस / मागणी जारी किंवा दाखल केलेली नाही, जी कोणत्याही प्रकारे विक्रेत्याच्या मालमत्तेवरील मालकी हक्कावर परिणाम करू शकेल, किंवा ज्यामुळे विक्रेत्यास हा दस्त करणे रोखले जाऊ शकेल किंवा मर्यादित केले जाऊ शकेल.

.....

२८. विक्रेत्याने मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणताही साठे करार किंवा भाडेपट्टा करार, परवाना किंवा कोणत्याही प्रकारचा हस्तांतरण करार आणि/किंवा विकास हक्क प्रदान करण्याचा करार आणि/किंवा तृतीय पक्ष हक्क निर्माण करण्यासाठी कोणतेही अन्य दस्त, दस्तऐवज आणि/किंवा लेखी कागदपत्रे केलेली नाहीत;

.....

३३. मालमत्तेवर महाराष्ट्र इंफेरियर व्हिलेज वतन रद्द अधिनियम, १९५९ लागू होत नाही आणि विक्रेत्यास वरील अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींनुसार सदर जमीन किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणतीही नोटीस प्राप्त झालेली नाही;

.....

४३. विक्रेत्याकडे हा दस्त निष्पादित करण्याचा पूर्ण आणि योग्य हक्क, संपूर्ण अधिकार आणि निर्विवाद अधिकारक्षमता आहे आणि या दस्ताची अंमलबजावणी कोणत्याही लागू असलेल्या कायद्याचे, विक्रेत्याच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशन आणि आर्टिकल ऑफ असोसिएशन किंवा विक्रेता ज्या कोणत्याही करार, दस्त, कागदपत्र अथवा लेखी कराराचा पक्षकार आहे, त्याच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन ठरणार नाही."

९३. हस्तांतरण दस्तातील सर्व कलमांचे एकत्रित वाचन केले असता हे स्पष्ट होते की याचिकाकर्ता हा प्रश्नांकित मालमत्तेचा निर्विवादित मालक आहे, व मालमत्ता सर्व प्रकारच्या बोजा, वाद, दावे आणि शंका यांपासून मुक्त आहे आणि मालमत्ता बाळगणे, वापरणे, हस्तांतरण करणे किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावणे यासंबंधीचे

कायदेशीररित्या अंमलबजावणी करण्यास योग्य हक्क व मालकी हक्क याचिकाकर्त्याकडे, विक्रेता–उत्तरवादी क्रमांक ९ यांनी हस्तांतरण दस्ताद्वारे दिल्याप्रमाणे, याचिकाकर्त्याकडे निहीत झाली आहे. दिनांक २९ मार्च २०२४ रोजी ही कायदेशीर स्थिती आहे. याचिकाकर्त्याच्या संबंधात लवाद न्यायाधीकरणाच्या अधिकारक्षेत्राच्या पार्श्वभूमीवर, जर मे. एमिनन्स (दावेदार) आणि मे. गगन यांच्या दरम्यानच्या लवाद कार्यवाहीतील हक्कांची तुलना, दिनांक २९ मार्च २०२४ च्या हस्तांतरण दस्त अंतर्गत याचिकाकर्ता आणि उत्तरवादी क्रमांक ९ यांच्या दरम्यान असलेल्या हक्कांसोबत केली, तर हे पूर्णपणे स्पष्ट होते की याचिकाकर्त्याच्या बाबतीत काहीही कायदेशीर संबंध किंवा कोणतीही संलग्नता नव्हती, ज्यायोगे लवाद न्यायाधिकरणास याचिकाकर्त्यावर अधिकारक्षेत्र प्राप्त होऊ शकले असते, विशेषतः, मे. एमिनन्स यांनी दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या करारनाम्यातून दावा केलेले हक्क याचिकाकर्त्यावर परिणाम घडवतात, असे कोणतेही कारण अस्तित्वात नव्हते. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, उत्तरवादी क्रमांक ९ स्वतः हा त्या करारनाम्याचा पक्षकार नव्हता.

९४. वरील संदर्भामध्ये, लवाद कार्यवाहीतील मे. एमिनन्स यांचा प्राथमिक दावा विचारात घेणे आवश्यक आहे, तसेच दावा निवेदन (स्टेटमेंट ऑफ क्लेम) मधील संबंधित विधानांची नोंद घेणे आवश्यक आहे. दावेच्या निवेदनातील खालील परिच्छेदांमधून दाव्याचे स्वरूप आणि दावा जमीन संदर्भातील स्थिती स्पष्ट होते:

“१७. दावेदार सादर करतो की उत्तरवादी क्रमांक २ ते ७ यांच्या संदर्भात, दिनांक २५.०३.२०२३ ची नोटीस ही केवळ लवाद कलम लागू करण्याची नोटीस नव्हती, तर हमीचा दस्त (डीड ऑफ गॅरंटी) आणि भरपाई बंधपत्र यांनुसार थकित रकमेसंदर्भात ३० दिवसांची देयक मागणी नोटीस होती, जी कोणत्याही परिस्थितीत उत्तरवादी क्रमांक २ ते ७ यांनी अदा केलेली नाही आणि त्यांनी आपली आश्वासने भंग केली आहेत. उत्तरवादी क्रमांक २ ते ७ हे संयुक्तरीत्या आणि स्वतंत्ररीत्या बाकी राहिलेली देणी परत करण्यास उत्तरवादी क्रमांक १ सोबत जबाबदार आहेत.

१८. त्या अनुषंगाने, दावेदाराने नंतर लवाद आणि समेट अधिनियम, १९९६ च्या कलम ११ अंतर्गत लवाद याचिका क्रमांक १५२/२०२३ मुंबई येथील मेहरबान उच्च न्यायालयात दाखल केली. मेहरबान उच्च न्यायालयाने दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या आदेशाने वादाचा निपटारा करण्यासाठी एकल लवाद नेमला आहे.

१९. दाव्याचा तपशील:

दावेदार सादर करतो की दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या करारनाम्यानुसार उत्तरवादी क्रमांक १ यांनी दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत रुपये ५४,००,००,०००/- (अक्षरी रुपये चोपन्न कोटी) अदा करणे अपेक्षित होते. तसे न झाल्यास, उत्तरवादी क्रमांक १ यांनी विलंबित देयकावर प्रतिमहिना चक्रवाढ पद्धतीने वार्षिक १२% व्याज अदा करण्याचे आश्वासन दिले होते. उत्तरवादी क्रमांक १ यांनी केवळ रुपये १,३०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी तीस लाख) इतकी अल्प परतफेड केली आहे. अशा प्रकारे, उत्तरवादी क्र. १ ने परतफेड केलेली ही रक्कम वजा केल्यानंतर, उत्तरवादी क्र. १ ने परतफेडीची देय असलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे:-

i	दिनांक २५.०२.२०१७ च्या करारपत्राच्या अटींनुसार ३१.०३.२०२० रोजी देय असलेली रक्कम	रु. ५४,००,००,०००/-
ii	दिनांक ३१.०३.२०२० रोजी प्रत्यक्षात प्राप्त झालेली रक्कम	रु. १,३०,००,०००/-
iii	अशा प्रकारे, प्राप्त झालेली रक्कम वजा केल्यानंतर ३१.०३.२०२० रोजी प्रत्यक्षात प्राप्य असलेली रक्कम	i - ii =रु. ५२,७०,००,०००/-
iv	०१.०४.२०२० पासून ७ जानेवारी २०२४ पर्यंत, म्हणजेच दावा याचिका दाखल करण्याच्या दिनांकापर्यंत, १२% प्रतिवर्ष दराने मासिक चक्रवाढ पद्धतीने व्याज.	रु. २९,९५,१७,३८८.५८ व्याज गणनेचा तपशील यासोबत परिशिष्ट ‘V’ म्हणून संलग्न आहे.
v	दावा केलेली एकूण रक्कम	iii + iv =रु. ८२,६५,१७,३८८.५८ (रुपये

		ब्याऐंशी कोटी पासष्ठ लाख सतरा हजार तीनशे अठ्ठ्याऐंशी आणि अठ्ठावन्न पैसे)

म्हणून, दावेदार सादर करतो की दावा याचिका दाखल करण्याच्या तारखेपर्यंत रुपये ८२,६५,१७,३८८.५८ (अक्षरी रुपये ब्याऐंशी कोटी पासष्ट लाख सतरा हजार तीनशे अठ्ठ्याऐंशी रुपये पंचावन्न पैसे) ही रक्कम उत्तरवादी क्रमांक १ ते ७ यांनी अदा करावयाची असून, रक्कम पूर्ण होईपर्यंत भविष्यकालीन व्याज देय आहे.

२०. वरीलप्रमाणे दावा कारण उद्भवले आहे. सदर दावा दाखल करण्याचे दावा कारण प्रथम दिनांक ३१.०३.२०२० रोजी उद्भवले, जेव्हा उत्तरवादी क्रमांक १ यांनी दिनांक २५.०२.२०१७ च्या करारनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार दावेदाराची गुंतवणूक परत करण्यास अपयश आले. तसेच, दिनांक २०.०२.२०२३ व ०९.०३.२०२३ रोजी उत्तरवादींनी पत्रे देऊन आपली देयके व बंधने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले, तेव्हा दावा कारण पुढे उद्भवले. तसेच दिनांक २५.०३.२०२३ रोजी दावेदाराने नोटीस दिली असता, ती प्राप्त होऊनही उत्तरवादींनी मौन बाळगले, तेव्हा देखील दावा कारण उद्भवले. दावा कारण हे सातत्यपूर्ण स्वरूपाचे असून, त्यानंतर ते दर दिवशी उद्भवत आहे.

२१. उत्तरवादी क्रमांक १ यांनी दिनांक २५.०२.२०१७ च्या करारनाम्यात दावेदारास ३१.०३.२०२० पर्यंत रुपये ५४,००,००,०००/- अदा करण्याचे आश्वासन दिले होते. उत्तरवादी क्रमांक १ यांनी दिनांक २०.०२.२०२३ रोजी दावेदारास पत्र देऊन त्यांच्याकडून निष्पादित दस्त वैध व अस्तित्वात असल्याची पुन्हा पुष्टी केली व पूर्ण देय रक्कम अदा करण्याचे पुनरुच्चारण केले. उत्तरवादी क्रमांक २ आणि ५ ते ७ यांनीही दिनांक ०९.०३.२०२३ रोजी पत्र देऊन उत्तरवादी क्रमांक १ यांनी दिलेल्या दिनांक २०.०२.२०२३ च्या पत्राची पुष्टी केली व त्यांच्या संबंधित जबाबदाऱ्या देखील लागू असल्याची पुनरुच्चरण करून, देय रक्कम अदा करण्याचे आश्वासन दिले. दावेदाराने दिनांक २५.०३.२०२३ रोजी दिलेल्या नोटीसद्वारे लवाद प्रक्रिया सुरू केली असून, ती नोटीस उत्तरवादींनी दिनांक २८.०३.२०२३ रोजी स्वीकारली आहे. तसेच, वरील परिच्छेदांत नमूद केल्याप्रमाणे, उत्तरवादी क्रमांक १ यांनी अधून मधून काही छोट्या रकमा परत केल्या आहेत आणि वेळोवेळी शिल्लक रकमेच्या पुष्टीपत्रावर स्वाक्षरी केली आहे. म्हणूनच, लवाद कार्यवाही मर्यादा कालावधीमध्येच सुरू करण्यात आली आहे.

२२. दिनांक २५.०२.२०१७ च्या करार पत्रात लवाद कलम अंतर्भूत आहे. दावेदाराने दिनांक २५.०३.२०२३ च्या नोटीसमधून लवाद प्रक्रिया लागू केली आहे. मेहरबान मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ३०.११.२०२३ च्या आदेशाद्वारे विद्वान लवाद यांची नियुक्ती केली आहे. दावेदाराचा दावा लवादाच्या कक्षे अंतर्गत येतो. त्यामुळे विद्वान लवाद यांना सदर दावा संपरीक्षा करण्याचे आणि हाताळण्याचे अधिकारक्षेत्र आहे.

२३. दावेदार असे नमूद करतो की मे. एझेडबी अँड पार्टनर्स यांनी दिनांक ०८.१२.२०२३ रोजी टाइम्स ऑफ इंडिया या दैनिक वर्तमानपत्रामध्ये सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध केली, ज्यामध्ये त्यांनी सदर सन अँड सँड मालमत्तेच्या मालकी हक्काची चौकशी / तपासणी सुरु असल्याचे नमूद केले. दिनांक ०८.१२.२०२३ च्या जाहीर नोटीसची प्रत येथे संलग्न असून परिशिष्ट 'W' म्हणून चिन्हांकित आहे. दावेदाराने तत्काळ लवाद आणि समेट अधिनियम, १९९६ च्या कलम ९ अंतर्गत मेहरबान कमर्शियल

कोर्ट, पुणे येथे दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११७७ / २०२३ दाखल केला, ज्यामध्ये मे. गगन आय-लँड टाउनशिप प्रा. लि. म्हणजेच उत्तरवादी क्रमांक ८ यांना तृतीय पक्ष हक्क निर्माण करण्यास प्रतिबंध करण्याची मागणी करण्यात आली. मेहरबान न्यायालयाने दिनांक २२.१२.२०२३ रोजी अंतरीम एकतर्फी मनाई आदेश मंजूर केला. सदर आदेशाची प्रत येथे संलग्न असून परिशिष्ट 'X' म्हणून चिन्हांकित आहे.

(दावा निवेदनात दुरुस्ती करून समाविष्ट)

२३(अ): दावेदार सादर करतो की दावेदाराने दिनांक २७/१२/२०२३ रोजी टाइम्स ऑफ इंडिया या दैनिकात सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध केली, ज्यामध्ये अनुसूची मधील मालमत्ता ही लवाद प्रक्रियेतील दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११७७/२०२३ चा विषय असल्याचे नमूद केले. पुढे दावेदाराने लिस पेंडेंस (lis pendens) नोटीस ची दिनांक ०८/०१/२०२४ रोजी नोंदणी केली, जी उपनिबंधक कार्यालय हवेली क्र. ११ येथे अनुक्रमांक ५६३/२०२४ रोजी नोंदविली गेली, ज्यामध्ये लवाद प्रक्रिया व दावेदाराचा अनुसूची मधील मालमत्तेवरील बोजा यांची माहिती दिली. तथापि, उत्तरवादी क्रमांक ८ च्या इम्प्लीडमेंट अर्जावरील आदेश प्रलंबित असताना, उत्तरवादी क्रमांक ८ यांनी दिनांक १०/०४/२०२४ रोजी एक ईमेल एकल लवाद व दावेदार यांना पाठवून माहिती दिली की त्यांनी कथितरित्या अनुसूचित मालमत्ता लक्झएम्पायर रिअल्टी प्रायव्हेट लिमिटेड यांना हस्तांतरण दस्त (Deed of Conveyance) दिनांक २९/०३/२०२४ रोजी विकली / हस्तांतरित केली असून, हा दस्त उपनिबंधक कार्यालय हवेली क्र. २३ येथे अनुक्रमांक ७६७८/२०२४ द्वारे नोंदविण्यात आला. सदर हस्तांतरण उत्तरवादी क्रमांक ८ यांनी दावेदाराचा दावा कमकुवत करण्याच्या उद्देशाने केले आहे. लक्झएम्पायर रिअल्टी प्रायव्हेट लिमिटेड यांनी सदर मालमत्ता विकत घेताना दावेदाराच्या बोजाची व दाव्याची माहिती असतानाच खरेदी केली आहे. त्यामुळे कथित हस्तांतरण सद्भावनेने केलेले नाही आणि मालमत्ता जाणीवपूर्वक अल्प किंमतीत दर्शविली आहे. कोणत्याही परिस्थितीत, खरेदीदाराने अनुसूचीतील मालमत्तेवर दावेदाराच्या बोजा आणि दाव्या अंतर्गत ती मालमत्ता खरेदी केली आहे आणि दावाकर्ता लवाद निवाड्यात दाव्याच्या समाधानासाठी अनुसूचीतील मालमत्तेवर त्यांचे हक्क लागू करण्यास कायदेशीररित्या हक्कदार आहे. सदर व्यवहार हा संपत्ती हस्तांतरण अधिनियमाच्या कलम ५३ नुसार अवैध आहे.

२३(ब): कोणत्याही परिस्थितीत, दावेदार सादर करतो की उत्तरवादी क्रमांक ८ यांनी दिनांक २०/०२/२०२३ च्या पत्राद्वारे, अनुसूचित नमूद मालमत्तेवर होणाऱ्या बांधकामाबाबत दावेदाराच्या हितासाठी हक्क निर्माण केले, ज्याअंतर्गत अनुसूचित मालमत्तेवरील "गगन कॉमर्स सेंटर" या योजनेतील काही बांधकाम क्षेत्र दावेदारास देण्याचे आश्वासन दिले. उत्तरवादी क्रमांक ८ यांनी त्या प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिके कडून बांधकाम परवाना क्रमांक CC/२११२/१७ मंजूर करून घेतला आहे. सदर प्रकल्प रेरा अंतर्गत नोंदणीकृत आहे. उत्तरवादी क्रमांक ८ यांनी दावेदारास दिलेले हे पत्र हे रेरा तसेच महाराष्ट्र मालकी हक्काचे फ्लॅट्स अधिनियम, १९६३ अंतर्गत प्रवर्तक या नात्याने जारी केले आहे. प्रवर्तकावर कायदेशीरदृष्ट्या त्याने निर्माण केलेल्या बंधनांची पूर्तता करण्याची जबाबदारी असते. लक्झएम्पायर रिअल्टी प्रायव्हेट लिमिटेड, हा विकासक म्हणून उत्तरवादी क्रमांक ८ च्या जागी रेरा मान्यताप्राप्त प्रकल्पात प्रवर्तकाच्या भूमिकेत आला असून, पूर्वीच्या प्रवर्तकाचे सर्व हक्क, जबाबदाऱ्या व बोजा स्वीकारण्यास बांधील आहे आणि त्याबद्दल अज्ञान असल्याचा दावा तो कायद्याने किंवा न्यायबुद्धीने करू शकत नाही.

२४. दावेदार म्हणून खालीलप्रमाणे विनंती करतो :

(अ) हुकूम पारित करून, उत्तरवादी क्रमांक १ ते ७ यांनी संयुक्तरीत्या व स्वतंत्ररीत्या दावेदारास त्याचा दावा असलेले रुपये ८२,६५,१७,३८८.५८ (अक्षरी रुपये ब्याऐंशी कोटी पासष्ट लाख सतरा हजार तीनशे अठ्ठ्याऐंशी रुपये पंचावन्न पैसे), परिच्छेद क्रमांक १९ मध्ये तपशीलवार नमूद केल्याप्रमाणे अदा करण्याचा हुकूम करण्यात यावा, तसेच दावा याचिका दाखल करण्याच्या तारखेपासून संपूर्ण हुकूमनाम्याची रक्कम वसूल होईपर्यंत प्रतिवर्ष १८ टक्के दराने प्रतिमहिना चक्रवाढ व्याजासह भविष्यकालीन व्याज देण्याचा आदेश करण्यात यावा;

(ब) गगन आय-लँड टाउनशिप प्रायव्हेट लिमिटेड, म्हणजेच उत्तरवादी क्रमांक ८, हे उत्तरवादी क्रमांक १ ते ७ यांच्या गट कंपन्यांपैकी एक असल्यामुळे, विनंती (अ) मधील दावेदाराच्या दाव्याची रक्कम अदा करण्यास उत्तरदायी असल्याचे जाहीर करण्यात यावे आणि उत्तरवादी क्रमांक १ ते ७ सोबत संयुक्तरीत्या व स्वतंत्ररीत्या ती रक्कम अदा करण्याचा आदेश करण्यात यावा. तसेच, दावेदाराचा वर अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेवर बोजा आहे आणि तो हुकुमाची पूर्तता करण्यासाठीच्या अंमलबजावणी कार्यवाहीत लागू केला जाऊ शकतो, असे घोषित करावे आणि तिची जप्ती आणि विक्री करण्याचा आदेश पारित करावा;

(क) उत्तरवादी क्रमांक १ ते ७ यांना, दावेदाराच्या दाव्याची अंमलबजावणी करण्यासाठी दावेदाराने केलेला लवाद खर्च व इतर खर्चाची भरपाई, दावेदारास अदा करण्याचा निर्देश करण्यात यावा;

(ड) प्रसंगी दावेदार जे कोणतेही पुढील व इतर दिलासे मागेल आणि या प्रकरणातील परिस्थितीनुसार विद्वान लवाद यांना जे न्याय्य व योग्य वाटतील, ते दिलासे दावेदाराच्या बाजूने मंजूर करण्यात यावेत;

(इ) दावेदाराच्या हितासाठी न्यायाच्या दृष्टीने कोणताही इतर आदेश पारित करण्यात यावा."

(जोर देऊन नमूद केले आहे)

९५. अशा प्रकारे, दाव्याच्या निवेदनातील मे. एमिनन्सच्या उपरोक्त प्रकरणाचे वाचन केल्यास, हे स्पष्ट होते की मुख्य दिलासा हा रुपये ८२,६५,१७,३८८.५८ या रकमेच्या वसुलीसंबंधी होता, आणि त्यापासून स्वतंत्र असा दिलासा उत्तरवादी क्रमांक ९ विरुद्ध मागितला होता, केवळ या कारणावर की ती एक गट कंपनी सिद्धांत अंतर्गत उत्तरवादी क्रमांक १ ते ७ यांच्या गटातील कंपनी आहे आणि विनंती (अ) मधील दावेदाराचा दावा पूर्ण करण्यास उत्तरदायी आहे, तसेच इतर उत्तरवादींबरोबर संयुक्तरीत्या आणि स्वतंत्ररीत्या ती रक्कम देण्याचा आदेश

करण्यात यावा. त्यापुढे, या संदर्भात अशी घोषणा मागण्यात आली होती की मे. एमिनन्स यांचा विषयांकित मालमत्तेवर बोजा आहे, आणि निवाडा (award) मिळाल्यानंतर सदर बोज्याची अंमलबजावणी करण्यासाठी मालमत्ता जप्त करून विक्री करण्याचा आदेश करण्यात यावा.

९६. दाव्याच्या निवेदनातील विनंती (ब) (सुप्रा) चे साधे वाचन केल्यास, हे स्पष्ट होते की विनंती (ब) ही विनंती (अ) मधील रकमेच्या वसुलीसंदर्भातीलच आहे, परंतु इतर उत्तरवाद्यांकडून, ज्यामध्ये उत्तरवादी क्रमांक ९ चा समावेश आहे वसुली करण्याच्या दृष्टिकोनातून मांडलेली आहे. आणि जर मे. एमिनन्स यांचा दावा यशस्वी झाला, तर त्या रकमेची वसुली केवळ विषयांकित मिळकतीमधूनच केली जावी, परंतु त्यासाठी प्रथम हा मुद्दा निश्चित केला जावा की मे. एमिनन्स यांचा त्या मिळकतीवर बोजा आहे.

९७. असे नमूद करता येईल की, सध्याच्या परिस्थितीत विषयांकित मिळकतीवरील मे. एमिनन्सच्या बोजाचा दावा, केवळ रकमा परत मिळवण्यासाठी मे. एमिनन्सचा मूळ दावा यशस्वी झाल्यावरच विचारात घेण्याची आवश्यकता होती. हे पूर्णतः वसुली आणि अंमलबजावणीच्या क्षेत्रात येणारे प्रकरण आहे, आणि अन्यथा नाही. कारण असे कोणतेही दस्त, कागदपत्र किंवा पुरावा अस्तित्वात नव्हता, ज्यास कायदा मान्यता देईल, ज्याच्या आधारे लवाद

न्यायाधीकरण असा निष्कर्ष काढू शकेल की विषयांकित जमीन/मिळकतीवर मे. एमिनन्स यांचा थेट बोजा आहे, ज्यामुळे ती लवाद प्रक्रियेचा विषय ठरू शकेल. असे देखील मे. एमिनन्स चे प्रकरण नाही. विशेष म्हणजे, दावेच्या निवेदनातील विनंती (ब) ही याचिकाकर्त्याच्या मते त्या पार्श्वभूमीवर करण्यात आली की मे. एमिनन्स यांनी लवाद आणि समेट अधिनियम च्या कलम ९ अंतर्गत पुणे येथील जिल्हा न्यायालयात दाखल केलेल्या कार्यवाहीमध्ये, ज्यात विषयांकित मिळकतीवर कथित बोजा असल्याचा मुद्दा मांडला गेला होता आणि मनाई आदेश मिळवण्याची मागणी करण्यात आली होती, त्या प्रकरणात मे. एमिनन्स यांना यश मिळाले नाही. या संदर्भात, मे. एमिनन्स यांचा विषयांकित मिळकतीवर बोजा असल्याचा युक्तिवाद जिल्हा न्यायालयाने सरळपणे फेटाळून लावला आणि पुढील निरीक्षणे नोंदवली:

> ४८) वरील संदर्भातील दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर आणि हे निर्विवाद तथ्य लक्षात घेता की अर्जदाराच्या अनुसूचीतील मालमत्तेवर बोजा निर्माण करणारा कोणताही लेखी व नोंदणीकृत दस्तऐवज नाही. बोजा फक्त नोंदणीकृत दस्ताद्वारेच निर्माण होऊ शकतो की नाही हा वादाचा मुद्दा असला तरी, प्रश्न असा येतो की अनुसूचित मालमत्ता ही उत्तरवादी क्रमांक ८ कंपनीच्या नावावर खरेदी करण्यात आली आहे आणि उत्तरवादी क्रमांक ८ यांनी अर्जदाराच्या बाजूने असा कोणताही दस्त निष्पादित केलेला नाही, ज्यामधून अर्जदाराचा बोजा अनुसूचीतील मालमत्तेवर निर्माण झाल्याचे दिसते. त्यामुळे अशा दस्ताच्या अभावी, मला असे वाटते की अर्जदाराने अनुसूचीतील मालमत्तेवर त्याचा बोजा निर्माण झाल्याचा केलेला दावा स्वीकारता येणार नाही.
>
> ५७) याउलट, उत्तरवादी क्रमांक ८ यांच्या विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद मांडला की प्रत्यक्षात अर्जामध्ये 'गट कंपनी सिद्धांत' लागू करण्यासंबंधी कोणतेही विशिष्ट वादकथन नाही. 'गट कंपनी सिद्धांत' लागू करण्यासाठी उत्तरवादी क्रमांक ८ यांची व्यक्त संमती असणे आवश्यक आहे, ज्यायोगे त्यांना अर्जदार आणि उत्तरवादी क्रमांक १ यांच्या कंपन्यांच्या

क्षेत्राधिकारात सामील करता येईल. सर्व पक्षांमध्ये, उत्तरवादी क्रमांक ८ वगळता इतर सर्व पक्ष एलएलपी स्वरूपात आहेत. त्यामुळे दोन किंवा अधिक कंपन्या अथवा गट अस्तित्वात नसताना 'गट कंपनी सिद्धांत' लागू होऊ शकत नाही. म्हणून, या दृष्टिकोनातूनही अर्जदारास अनुसूचित मालमत्तेबाबत कोणताही हक्क असल्याचे मान्य करता येणार नाही आणि उत्तरवादी क्रमांक ८ यांना सदर मालमत्तेचा व्यवहार करण्यापासून रोखता येणार नाही.

६२) येथे, सध्याच्या प्रकरणात अर्जदार असे प्रकरण सिद्ध करू शकला नाही , ज्याद्वारे उत्तरवादी क्र. ८ चे, म्हणजेच सही न करणाऱ्या पक्षाचे वर्तन, त्याला लवाद कराराने बांधील करण्यासाठी त्याची संमती दर्शवेल. त्यामुळे वरील तथ्यात्मक आणि कायदेशीर पैलूंच्या पार्श्वभूमीवर, माझे मत असे आहे की अर्जदार प्रथमदर्शनी प्रकरण सिद्ध करू शकलेला नाही, तसेच सोयीचे संतुलनही (balance of convenience) त्याच्या बाजूने झुकत नाही. परिणामी, त्याला कधीही भरून न येणारी हानी होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जरी अर्जदारास हानी झाली, तरी ती रकमेच्या स्वरूपात भरून निघू शकते, अशाप्रकारे, अंतरीम दिलासा मंजूर करण्यासाठी अर्जदारास त्याच्या बाजूने विवेकबुद्धी मिळण्यास पात्र तो नाही हे नमूद करण्याची गरज नाही. परिणामतः, मी खालीलप्रमाणे आदेश देतो:

आदेश

अर्ज फेटाळण्यात येत आहे."

(भर दिला)

९८. लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम ९ अंतर्गत जिल्हा न्यायालयाने दिनांक २२ मार्च २०२४ रोजी असा आदेश पारित केल्यानंतर, मे. एमिनन्स यांनी ६ सप्टेंबर २०२४ रोजी दाव्यांचे निवेदन (Statement of Claim) दाखल केले, आणि ते मुख्यत्वे मे. गगन (उत्तरवादी क्रमांक २), त्याचे भागीदार आणि इतर उत्तरवादी यांच्या विरोधात होते. त्यानंतर उत्तरवादी क्रमांक ९ यांना पक्षकार म्हणून दाव्यात सामील करण्यात आले.

९९. यानंतर, दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी, मे. एमिनन्स यांनी याचिकाकर्त्याला उत्तरवादी म्हणून दाव्यात सामील करण्यासाठी अर्ज केला, ज्याचे प्राथमिक कारण हे होते की, याचिकाकर्त्याने कार्यवाही प्रलंबित असताना आणि मे. एमिनन्सच्या हितसंबंधांची पूर्ण जाण असताना उत्तरवादी क्र. ९ (लवाद कार्यवाहीतील मूळ उत्तरवादी

क्र. ८) कडून विषयांकित मिळकत खरेदी केली आहे आणि सदर जमिनीवर मे. एमिनन्सचा कोणताही बोजा नाही. सदर अर्जास याचिकाकर्त्याने प्रतिज्ञापत्र दाखल करून विरोध केला, ज्यामध्ये विशेषतः असे मांडले की याचिकाकर्ता हा मे. एमिनन्स व मे. गगन यांच्यात दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ रोजी निष्पादित झालेल्या करार पत्राचा पक्षकार नाही, तसेच त्या करार पत्रावरील सही न करणारा पक्ष आहे, ज्यामध्ये लवाद कराराचा समावेश आहे. असे सादर करण्यात आले की याचिकाकर्ता हा मे. गगन च्या गट कंपनी सिद्धांता अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही कंपनीचा भाग नाही. त्यामुळे याचिकाकर्त्याने असे प्रतिपादन केले की याचिकाकर्ता ही स्वतंत्र आणि वेगळे कायदेशीर अस्तित्व असलेली संस्था आहे, आणि त्याचा लवाद कार्यवाहीतील कोणत्याही उत्तरवादींसोबत संबंध नाही. तसेच असेही नमूद केले की सर्वोच्च न्यायालयाने कॉक्स अँड किंग्स लि. (सुप्रा) मध्ये विकसित केलेला गट कंपनी सिद्धांत याचिकाकर्त्यावर लागू होऊ शकत नाही.

१००. वादग्रस्त आदेशात, विद्वान एकल लवाद यांनी असे ठरविले आहे की उत्तरवादी क्रमांक ९ कडून विषयांकित मिळकत खरेदी केल्याने याचिकाकर्ता हा उत्तरवादी क्रमांक ९ च्या जागी आला असून त्यामुळे तो मालमत्तेच्या ताबा/मालकी आणि विकासाबाबत उत्तरवादी क्रमांक ९ च्या अंतर्गत किंवा तर्फे दावा करणारा ठरतो. हे कसे शक्य आहे, जेव्हा हे निर्विवाद होते की याचिकाकर्त्याने विषयांकित मिळकतीवरील आपला हक्क

आणि मालकी उत्तरवादी क्रमांक ९ कडून प्राप्त केली आहे, जो स्वतः लवाद कराराचा पक्षकार नव्हता, आणि विशेषतः सर्वोच्च न्यायालयाने कॉक्स अँड किंग्स लि. (सुप्रा) मधील परिच्छेद १३५ मध्ये जे स्पष्ट केले आहे, त्याच्या पूर्ण विरुद्ध आहे. अशा हस्तांतरण दस्तातून कोणत्याही प्रकारे असे सिद्ध होत नाही की याचिकाकर्ता हा मिळकतीचा किंवा त्या मिळकती मधील हक्कांचा हस्तांतरिती आहे, किंवा मालमत्तेच्या हक्कांचे करारबदल / प्रत्यायोजन झाले आहे, ज्यायोगे तो लवाद कार्यवाहीतील आवश्यक पक्ष ठरतो. मे. एमिनन्स यांचा अर्ज मंजूर करताना विद्वान एकल लवाद यांनी नोंदवलेल्या इतर संबंधित निरीक्षणांची नोंद घेणे आवश्यक आहे, जी पुढीलप्रमाणे आहेत:

> "१३. सदर प्रकरणात, जरी हे खरे आहे की प्रस्तावित उत्तरवादीने विषयांकित मिळकत पूर्ण व्यवहाराद्वारे खरेदी केली असून तो त्या मिळकतीचा मालक आहे आणि त्याचे हक्क उत्तरवादी क्रमांक ८ पेक्षा कनिष्ठ नाहीत, तथापि वास्तवात पाहता प्रस्तावित उत्तरवादीचे हक्क हे 'व्युत्पन्न अधिकार' (derivative rights) आहेत, कारण त्याने त्याची मालकी आणि ताबा विषयांकित मिळकतीबाबत उत्तरवादी क्रमांक ८ मार्फत प्राप्त केले आहे आणि त्यामुळे तो उत्तरवादी क्रमांक ८ अंतर्गत व तर्फे दावा करणारा आहे.
>
> १४. लवाद आणि समेट अधिनियम, १९९६ च्या कलम ८ मध्ये स्पष्टपणे मान्यता देण्यात आली आहे की लवाद प्रक्रिया केवळ लवाद करारातील पक्षकारानेच नव्हे, तर त्या पक्षकाराच्या अंतर्गत किंवा तर्फे दावा करणाऱ्या व्यक्तीद्वारे देखील लागू केली जाऊ शकते. त्यामुळे, जर लवाद करारातील पक्षकाराच्या अंतर्गत किंवा तर्फे दावा करणारा पक्ष लवाद प्रक्रिया लागू करू शकतो , तर त्याच तत्त्वानुसार, असा पक्ष लवाद कार्यवाहीमध्येही जोडला जाऊ शकतो, जरी तो लवाद कराराचा सही न करणारा पक्ष किंवा पक्षकार नसला तरी. हेच तत्त्व मेहरबान कर्नाटक उच्च न्यायालयाने मे. देवट्री कॉर्प. एलएलपी विरुद्ध मे. भूमिका नॉर्थ गार्डेनिया (M.F.A. No.2978 of 2024) या प्रकरणात मान्य केले आहे, ज्यावर दावेदाराच्या विद्वान वकिलांनी विश्वास ठेवला आहे. सदर प्रकरणात, लवाद कराराचा सही न करणारा असा मालमत्तेचा नंतरचा हस्तांतरिती पक्षकार म्हणून दाव्यात सामील करण्यासाठी अर्ज करण्यात आला होता. तो अर्ज मंजूर करताना मेहरबान उच्च न्यायालयाने विविध कायदेशीर पैलूंचा विचार केला, जे पुढीलप्रमाणे आहेत:
>
> > १५. वरील उद्धृत केलेल्या कलम ८(१) चे वाचन केल्यास हे स्पष्ट होते की लवाद करारातील पक्षकारच नव्हे तर त्या पक्षकाराच्या अंतर्गत किंवा तर्फे दावा करणारी व्यक्ती देखील, जर

न्यायिक प्राधिकरणासमोर कोणतीही कार्यवाही दाखल केली गेली असेल, तर ती कार्यवाही लवादाकडे पाठविण्याकरिता अर्ज करू शकते. या तरतुदीत स्पष्टपणे असे मान्य केले आहे की, करारातील "पक्षकार किंवा त्याच्या अंतर्गत अथवा तर्फे दावा करणारी कोणतीही व्यक्ती" लवादाद्वारे वादाचे निराकरण मागण्याचा हक्क राखते. जर लवाद करारातील पक्षकार किंवा त्याच्या अंतर्गत अथवा तर्फे दावा करणारी व्यक्ती विषय लवादाकडे संदर्भित करण्यासाठी अर्ज करू शकते, तर याचे उलटही लागू होते, म्हणजेच लवाद करारातील पक्षकाराच्या अंतर्गत किंवा तर्फे दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला लवाद न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन केले जाऊ शकते.

१६. दिनांक १६.१०.२०२० च्या करारामध्ये बंधनकारक लवाद कलम आहे. अपीलकर्ता/खरेदीदार हा हस्तांतरिती असल्यामुळे, तो दिनांक १६.१०.२०२० च्या करारातील विक्रेत्यांच्या जागी येतो आणि मालमत्ता त्यांना जोडलेल्या सर्व हक्कांसह आणि जबाबदाऱ्यांसह विक्रेत्यांकडून घेतो. हस्तांतरिती जबाबदाऱ्यांनी तेव्हाच बांधील नसतो, जेव्हा ज्याच्या हितासाठी जबाबदाऱ्या अस्तित्वात आहेत, तो त्या जबाबदाऱ्या सोडून देण्यास सहमत होतो. अपीलकर्त्याने असा कोणताही सोडून दिल्याचा दावा केलेला नाही किंवा सांगितलेले नाही.

१७. सुनावणीदरम्यान, माझ्या आदरणीय बहिणीने एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला की, जर दिनांक १६.१०.२०२० च्या करारातील बंधने विक्रेत्यांविरुद्ध अंमलात आणण्यासाठी दाखल केलेली कार्यवाही उत्तरवादीच्या बाजूने निवाड्यात परिवर्तित झाली, तर त्याचे परिणाम काय होतील? अपीलकर्त्याच्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी असे सादर केले की असा निवाडा अपीलकर्त्यावर बंधनकारक नाही. हा युक्तिवाद न टिकणारा आहे. कारण, कलम ९ अंतर्गत प्रलंबित कार्यवाहीदरम्यान अपीलकर्त्याच्या बाजूने झालेला विक्री व्यवहार हा कलम ९ कार्यवाहीच्या निकालाच्या अधीन आहे, आणि ही कार्यवाही लवाद न्यायाधिकरणासमोर सुरू होऊ शकणाऱ्या कार्यवाहीचा पूरक टप्पा आहे. त्यामुळे, कलम ९ कार्यवाहीदरम्यान मालमत्ता खरेदी करणारा अपीलकर्ता हा 'वाद प्रलंबित असताना खरेदीदार' (lite purchaser) असल्याने तो निवाडा त्याच्यावर लागू होत नाही असे म्हणण्यास परवानगी दिली जाऊ शकत नाही. अशा युक्तिवादास मान्यता देणे म्हणजे एकतर्फीपणे 'लवाद करार' समाप्त करणे होय, आणि परिणामी लवाद न्यायाधिकरणाचा निवाडा अंमलात न येणारा ठरेल. तसेच, हे १९९६ च्या अधिनियमातील कलम ८ च्या तरतुदीमागील उद्देशालाही हानी पोहोचवेल.

१८. वरील कारणांवरून, या न्यायालयाचे मत असे आहे की अपीलकर्ता कंपनी ही जरी लवाद कराराची पक्षकार नसली, तरी ती ज्याच्याकडून मालमत्ता प्राप्त करते त्या व्यक्ती/पक्षकाराच्या अंतर्गत दावा करणारी असल्याने, विक्रेत्यावर बंधनकारक असलेले लवाद कलम अपीलकर्त्यावर देखील बंधनकारक आहे. अपीलकर्त्यास असा युक्तिवाद करण्यास वाव नाही की लवाद करार त्याच्यावर बंधनकारक नाही, फक्त या कारणावर की तो लवाद करारावर सही न करणारा आहे.

१५. कर्नाटक उच्च न्यायालयाची ही निरीक्षणे सध्याच्या प्रकरणातील तथ्यांना तंतोतंत लागू होतात. प्रस्तावित उत्तरवादीने सदर लवाद कार्यवाही प्रलंबित असताना आणि दावेदाराचे विषयांकित मिळकतीवरील हित पूर्णपणे माहित असताना, उत्तरवादी क्रमांक ८ कडून मालमत्ता खरेदी केली आहे, आणि त्यामुळे तो उत्तरवादी क्रमांक ८ अंतर्गत किंवा तर्फे दावा करणारा आहे. अशा परिस्थितीत, फक्त तो लवाद करारावर सही न करणारा आहे या कारणावरून, त्याला या लवाद कार्यवाहीतील पक्षकार बनविता येणार नाही, असा युक्तिवाद केला जाऊ शकत नाही. असे करणे हे लवाद आणि समेट अधिनियम, १९९६ च्या कलम ८ च्या उद्देशाच्या विरुद्ध ठरेल.

१६. दावाकर्त्याच्या विद्वान वकिलांनी सादर केलेल्या या युक्तिवादातही तथ्य आहे की, बदल (प्रतिस्थापन) झाल्यास, तो अंशतः असला तरी, नवीन संमतीची आवश्यकता नाही. अशी संमती व्यक्त किंवा गर्भित (अप्रत्यक्ष) असू शकते, आणि ती प्रकरणातील तथ्यांवरून सिद्ध केली जाऊ शकते. जेव्हा प्रस्तावित उत्तरवादींविरुद्धचा दावा हा उत्तरवादी क्रमांक ८ अंतर्गत किंवा तर्फे दावा करणारा या आधारावर आहे, तेव्हा लवाद करारासाठी त्याची नव्याने संमती घेण्याचा प्रश्नच उरत नाही, कारण लवाद संमती आधीच उत्तरवादी क्रमांक १ ते ८ यांनी दिलेली आहे.

१९. तसेच, प्रस्तावित उत्तरवादींच्या वर्तनावरून त्याची गर्भित संमती देखील लवाद कार्यवाहीसंदर्भात निष्पन्न होते, कारण प्रस्तावित उत्तरवादींने सदर मालमत्ता खरेदी केली तेव्हा त्यांना लवाद कार्यवाही प्रलंबित आहे हे पूर्णतः ज्ञात होते, तसेच दावेदारास विषयांकित मिळकतीबाबत मिळवायचे हक्क आणि उत्तरवादी क्रमांक ८ यांच्या दावेदाराकडे असलेल्या जबाबदाऱ्या यांचीही त्यास पूर्ण माहिती होती. नोंदीवरून दिसून येते की दावेदाराने दिनांक २१ डिसेंबर २०२३ रोजी दिलेल्या आक्षेप नोटीस, दिनांक २७ डिसेंबर २०२३ च्या सार्वजनिक नोटीस, तसेच दावेदाराने नोंदविलेल्या दिनांक ०८ जानेवारी २०२४ च्या प्रलंबित दावा नोटीस असूनही प्रस्तावित उत्तरवादींने मालमत्ता खरेदी केली, आणि ती खरेदी लवाद आणि समेट अधिनियम, १९९६ च्या कलम ९ अंतर्गत दिलेल्या आदेशाच्या प्रत अपलोड झाल्यानंतर केवळ दोन दिवसांत केली, ज्यावरून हे सूचित होते की प्रस्तावित उत्तरवादीला सदर कार्यवाहीची माहिती होती. त्यामुळे हे सहजपणे निष्पन्न होते की प्रस्तावित उत्तरवादींने या लवाद कार्यवाहीत त्याच्या इम्प्लीडमेंट (नवीन पक्षकार म्हणून सामील होण्याबाबत) बाबतीत गर्भित संमती दिली आहे.

३३. निष्कर्षतः सांगायचे झाल्यास, न्यायाची हानी होऊ नये म्हणून प्रस्तावित उत्तरवादीला या लवाद कार्यवाहीत नवीन पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे, कारण तो उत्तरवादी क्रमांक ८ अंतर्गत आणि तर्फे दावा करणारा आहे आणि विषयांकित मिळकत त्याच्या ताब्यात आहे, ज्याला दावेदाराच्या बाजूने निर्माण झालेल्या जबाबदाऱ्या आणि हितसंबंध जोडलेले आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर केला जाणे आवश्यक आहे.

(भर दिला)

१०१. विद्वान एकल लवादांनी दिलेले वरील विवेचन आम्हाला स्वीकारणे कठीण आहे, आणि त्यामागे एकापेक्षा अधिक कारणे आहेत. सर्वप्रथम आणि सर्वात महत्त्वाचे

म्हणजे, वरील निष्कर्षापर्यंत पोहोचताना अधिकारक्षेत्राशी संबंधित मूलभूत आणि स्पष्ट चुका झालेल्या दिसतात. प्रथम, उत्तरवादी क्रमांक ९ हा विषयांकित मिळकतीचा एकमेव मालक होता, आणि याचिकाकर्त्याने ती मिळकत २९ मार्च २०२४ रोजीच्या हस्तांतरण दस्त द्वारे त्याच्याकडून खरेदी केली. सदर हस्तांतरण दस्तामुळे उद्भवणारा कायदेशीर परिणाम असा की, विषयांकित मिळकत याचिकाकर्त्याकडे सर्व बोज्यांपासून मुक्त निहीत झाली, जसे की वर नमूद केले आहे. याचिकाकर्त्याला विषयांकित मिळकतीबाबत त्याचे सर्व हक्क उपभोगण्यावर कोणतीही मर्यादा नव्हती. हे प्रकरण असे नव्हते की उत्तरवादी क्रमांक ९ (लवाद कार्यवाहीतील मूळ उत्तरवादी क्रमांक ८) यांनी स्वतःला लवाद न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन केले होते किंवा मे. एमिनन्स आणि मे. गगन यांच्यातील लवाद करार त्यांच्यावर लागू असल्याचे व्यक्त किंवा अप्रत्यक्षपणे स्वरूपात स्वीकारले होते. त्यामुळे याचिकाकर्ता हा उत्तरवादी क्रमांक ९ अंतर्गत किंवा तर्फे दावा करणारा असल्याचा प्रश्नच येत नाही. नोंदीवरील दस्तऐवज आणि कलम ९ कार्यवाहीतील न्यायनिर्णय यांच्या विरुद्ध जाऊन कोणतीही अप्रत्यक्ष संमती असल्याचा मुद्दा उपस्थित करण्याचाही प्रश्न नाही.

१०२. आम्ही असे नमूद करू इच्छितो की विद्वान एकल लवादांनी मे. देवट्री कॉर्प एलएलपी या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेतला, परंतु सदर प्रकरणातील तथ्य ही त्या निर्णयातील तथ्यांपेक्षा पूर्णपणे भिन्न होती. त्यामुळे, लवाद

न्यायाधिकरणाने असा निष्कर्ष काढणे की दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ चे करार पत्र आणि दिनांक २९ मार्च २०२४ चे हस्तांतरण दस्त यांच्यात कायदेशीर संबंध किंवा अंतर्गत हितसंबंध आहे, ज्यायोगे विषयांकित मिळकत मे. गगन यांची मे. एमिनन्सकडे असलेली देणी भागवण्यासाठी वापरली जाऊ शकते, हा निष्कर्ष स्वीकारण्यास कसलीही जागा नाही. हस्तांतरण दस्ताचा असा अर्थ लावणे की विषयांकित मिळकतीवर मे. एमिनन्स यांचा बोजा मान्य केला आहे, म्हणजे स्पष्ट कलमांच्या पूर्णतः विरुद्ध जाणे होय. दुसरे म्हणजे, उत्तरवादी क्रमांक ९ यांना याचिकाकर्त्याच्या बाजूने मिळकत हस्तांतरित करण्यास कोणताही प्रतिबंध किंवा निर्बंध नव्हता, आणि ती मिळकत दिनांक २९ मार्च २०२४ च्या हस्तांतरण दस्ताद्वारे कायदेशीररित्या हस्तांतरित झाली. मे. एमिनन्स यांनीही असे कोणतेही वादकथन केलेले नाही की उत्तरवादी क्रमांक ९ यांनी मालमत्ता याचिकाकर्त्याकडे हस्तांतरित केली ती संपत्ती हस्तांतरण अधिनियमाच्या कलम ५३ नुसार फसवे हस्तांतरण आहे. कोणत्याही परिस्थितीत, असा दावा केला जाऊ शकत नव्हता, कारण उत्तरवादी क्रमांक ९ वर मे. एमिनन्स यांच्या दृष्टीने दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ च्या करार पत्रानुसार कोणतीही स्वतंत्र जबाबदारी नव्हती, तसेच तो मे. एमिनन्सचा देणेकरीही नव्हता. अशा परिस्थितीत, संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ च्या कलम ५३(१) च्या उपयोजनाद्वारे, सद्भावनेने आणि मोबदल्यासाठी असलेले हस्तांतरिती म्हणून याचिकाकर्त्याचे हक्क अबाधित राहिले. याव्यतिरिक्त, मे. एमिनन्स यांनी याचिकाकर्त्याविरुद्ध कोणताही स्वतंत्र दावा दाखल केला नाही, ज्यामध्ये अशा

हक्कांचा दावा केला असेल आणि/किंवा कोणताही मनाई आदेश मिळवला असेल, कारण यासाठी कोणतीही कराराची गोपनीयता अस्तित्वात नव्हती. असे दिसते की खूप विलंबित निर्णय घेऊन, कोणत्याही करारसंबंधित गोपनीयतेशिवाय आणि/किंवा व्यावसायिक कारणांसाठी, याचिकाकर्त्याला पक्षकार म्हणून सामील करण्यासाठी विद्वान एकल लवादासमोर अर्ज करण्याचा प्रयत्न केला गेला.

१०३. तिसरे म्हणजे, हे असे प्रकरण नाही की मे. एमिनन्स यांना याचिकाकर्त्याच्या बाजूने तयार होणाऱ्या हक्कांची माहिती नव्हती, विशेषतः दिनांक २९ मार्च २०२४ च्या हस्तांतरण दस्तानुसार विषयांकित मिळकतीबाबत तयार झालेल्या हक्कांविषयी, कारण मे. एमिनन्स यांनी याच न्यायालयासमोर दाखल केलेल्या दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११७७/२०२३ मध्ये, जो लवाद आणि समेट अधिनियमाच्या कलम ९ अंतर्गत दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी दाखल केला होता त्यात अशाच प्रकारच्या दाव्यांवर भर देण्याचा प्रयत्न केला होता, सदर अर्जामध्ये मे. एमिनन्स यांनी विशेषतः विषयांकित मिळकतीवर बोजा असल्याचा दावा केला आणि उत्तरवादी क्रमांक ९ यांना विषयांकित मिळकत कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करणे, विकणे किंवा कोणत्याही तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करणे यास मनाई करण्यासाठी मनाई आदेश मागितला होता, त्या मिळकतीचे वर्णन दिवाणी किरकोळ अर्जाच्या परिच्छेद १७ मध्ये नमूद केलेल्या अनुसूची मध्ये देण्यात आले होते. सदर दिवाणी किरकोळ अर्जावर मे. पुणे जिल्हा

न्यायालयाचे विद्वान जिल्हा न्यायाधीश-२ यांनी दिनांक २२ मार्च २०२४ रोजी आदेश देऊन अर्ज फेटाळला. आणि या आदेशामध्ये मे. एमिनन्स यांचा विषयांकित मिळकतीवर बोजा असल्याचा संपूर्ण दावा विस्तृतपणे तपासल्यानंतर नाकारण्यात आला. अशा आदेशानंतरच, कोणतीही प्रलंबित वादप्रक्रिया नसल्यामुळे, मालमत्तेचा विक्री व्यवहार याचिकाकर्त्याच्या बाजूने अंतिम करण्यात आला. अशा प्रकारे, दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी पुणे येथील विद्वान जिल्हा न्यायाधीशांच्या न्यायालयात एसीए च्या कलम ९ अंतर्गत दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केल्यापासून आणि दिनांक २२ मार्च २०२४ रोजी सदर अर्जाचा निर्णय होईपर्यंत, मे. एमिनन्सला केवळ जाणच नव्हती, तर त्याने उत्तरवादी क्र. ९ विरुद्ध विषयांकित मिळकत त्याच्या थकबाकीच्या देयकासाठी समाविष्ट करण्यासाठी त्या उद्देशाचा पाठपुरावा केला. तथापि, मे. एमिनन्स सदर कार्यवाहीत अयशस्वी ठरला. शिवाय, कलम ३७ अंतर्गत मे. एमिनन्स यांनी आदेशाच्या विरोधात दाखल केलेले अपीलही मागे घेण्यात आले. यानंतर विषयांकित मिळकतीचे याचिकाकर्त्याकडे हस्तांतरण झाल्यानंतर साधारण आठ महिन्यांनी, मे. एमिनन्स यांनी याचिकाकर्त्याला पक्षकार म्हणून सामील करण्याचा अर्ज केला आणि हा देखील एक सुसंगत घटक होता, जसा याचिकाकर्त्याच्या वतीने योग्यरित्या युक्तिवाद करण्यात आला होता.

१०४. शेवटी, मे. एमिनन्स यांच्या लावादीय दावा अर्जातील मुख्य प्रार्थना स्पष्टपणे पाहिल्यास, ती रक्कम वसुलीची आहे, आणि विषयांकित मिळकतीबाबतच्या दाव्यांचा आधार असा आहे की त्या मिळकतीवर बोजा आहे, ज्याप्रमाणे प्रार्थना (ब) मधून स्पष्ट होते. प्रत्यक्षात, ती एक अंमलबजावणी विनंती आहे आणि ती फक्त त्या परिस्थितीत संबंधित ठरते जेव्हा मे. एमिनन्स यांनी केलेला मुख्य दावा यशस्वी ठरतो. यावरून हे स्पष्टपणे दिसते की सदर मिळकत कोणत्याही प्रकारे लवाद प्रक्रियेचा विषय नव्हती, आणि जर त्या मिळकतीला लवाद प्रक्रियेचा विषय बनवलेलेच नव्हते, तर कोणत्या कायदेशीर बंधनाखाली याचिकाकर्त्यास लवाद प्रक्रियेत आवश्यक किंवा योग्य पक्षकार म्हणून जोडता येईल, हे समजणे अशक्य आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे, सुस्थापित कायदेशीर तत्त्वानुसार वादीस अशा व्यक्तीला प्रतिवादी बनवण्याची सक्ती नसते, ज्याच्या विरुद्ध कोणताही दिलासा मागितलेला नाही. दाव्याच्या निवेदनातील दिलासे पाहिल्यास हे स्पष्ट होते की याचिकाकर्त्याविरुद्ध कोणताही दिलासा मागितलेला नाही, जरी याचिकाकर्त्याच्या मिळकतीवर बोजा असल्याचा दावा करण्यात आला असला तरी. याचिकाकर्ता ही स्वतंत्र कायदेशीर व्यक्ती असून , तिच्याविरुद्ध कोणताही दिलासा मागितलेला नसताना, तिला लवाद प्रक्रियेत सहभागी करण्याचे कारण दिसत नाही.

१०५. दावा निवेदन सरळ वाचल्यास हे स्पष्ट होते की याचिकाकर्त्याविरुद्ध प्रत्यक्षात कोणताही दिलासा मागितलेला नाही. विषयांकित मिळकतीबाबत दिलासा मागितला

आहे आणि प्रार्थना (ब) मध्ये ज्या प्रकारे शब्दबद्ध केले आहे, त्यावरून मे. एमिनन्स यांनी याचिकाकर्त्याविरुद्ध कोणताही हक्क स्पष्टपणे अधोरेखित केला आहे किंवा मागितला आहे असे मानता येणार नाही. दिवाणीप्रक्रिया संहिता, आदेश १ नियम ३ चे तरतुदी विचारात घेतल्यास, हे सुस्थापित आहे की या नियमाचा उद्देश असा आहे की वादाच्या विषयाशी संबंधित सर्व व्यक्ती पटलावर आणाव्यात, जेणेकरून सर्व वाद एकाच वेळी व त्या व्यक्तींच्या उपस्थितीत निकाली निघावेत, विलंब, असुविधा आणि एकापेक्षा अधिक प्रक्रिया टाळता याव्यात (पहा : अनिल कुमार सिंग विरुद्ध शिव नाथ मिश्रा[37]). हेही सुस्थापित आहे की एखाद्या पक्षास प्रतिवादी म्हणून केवळ त्या परिस्थितीतच सामील करता येते, जेव्हा त्या पक्षाचा वादाच्या विषयावर कायद्याने मान्य असलेला हितसंबंध असतो, म्हणजेच समान हितसंबंधांपेक्षा भिन्न नसलेला, परंतु कायद्याने मान्यता दिलेला हितसंबंध. वादाच्या निकालामुळे अप्रत्यक्षपणे किंवा व्यावसायिकदृष्ट्या प्रभावित होऊ शकणाऱ्या व्यक्तीला, वादात पक्षकार म्हणून जोडता येत नाही.

१०६. याप्रमाणे, सर्व अशा शक्यतांचा आणि त्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या कायदेशीर परिणामांचा विचार करता, केवळ न्यायालयीन कार्यवाहीत झालेल्या घडामोडींचाच नव्हे, तर विषयांकित जमीन/ मिळकतीशी संबंधित दस्तांमधून निर्माण झालेल्या परिणामांचाही विचार करता, ज्यांचा आपण सविस्तर उल्लेख केला आहे, केवळ एवढ्यामुळे की

[37] (१९९५) ३ **एससीसी** १४७

याचिकाकर्त्याने सदर जमीन/मालमत्ता खरेदी केली आहे, याचिकाकर्ता हा लवाद प्रक्रियेत आवश्यक पक्षकार ठरेल, असा निष्कर्ष स्वीकारण्यास आम्ही प्रवृत्त होत नाही. त्यामुळे, आम्ही या निष्कर्षास येतो की याचिकाकर्त्याच्या वतीने मांडण्यात आलेल्या दाव्यांना स्वीकारणे आवश्यक आहे.

१०७. वरील निरीक्षणे केल्यानंतर, आता आम्ही हे विचारात घेतो की मे. एमिनन्स यांचा, वकील श्री. खांबाटा यांनी मांडलेला मुद्दा आम्हाला वेगळा निष्कर्ष घेण्यास का प्रवृत्त करू शकला नाही. श्री. खांबाटा यांचे मुख्य प्रतिपादन असे आहे की याचिकाकर्त्याने लवाद कार्यवाही प्रलंबित असताना, उघड डोळ्यांनी विषयांकित मिळकत खरेदी केली असल्यामुळे, याचिकाकर्त्याने अंतर्निहित रीतीने लवाद प्रक्रियेने बांधील राहण्यास संमती दिली असे मानले पाहिजे. दुसरे म्हणजे, उत्तरवादी क्रमांक ९ कडून मिळकतीचा हक्क घेताना, याचिकाकर्ता हा उत्तरवादी क्रमांक ९ च्या तर्फे किंवा त्याच्या अंतर्गत दावा करीत आहे, म्हणूनच याचिकाकर्त्यास लवाद प्रक्रियेतील पक्षकार म्हणून जोडणे आवश्यक आहे. आमच्या मतानुसार, सदर तथ्यांच्या स्थितीत ही भूमिका ग्राह्य ठरत नाही. कारण आम्ही वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा केली आहे, विशेषतः मे. एमिनन्स यांनी कलम ९ अंतर्गत सक्षम न्यायालयात दाखल केलेल्या कार्यवाहीमध्ये उत्तरवादी क्रमांक ९ ला विषयांकित मिळकत विकण्यापासून रोखण्यास अपयश आले. तसेच, मे. एमिनन्स यांचा मिळकतीवर बोजा असल्याचा दावा देखील पूर्णपणे फसला. जर श्री. खांबाटा

यांचा युक्तिवाद स्वीकारला तर दोन परिणाम उद्भवतील: पहिला म्हणजे, मे. एमिनन्स यांनी कलम ९ अंतर्गत दाखल केलेल्या कार्यवाहीवर जिल्हा न्यायाधीशांनी दिलेले आदेश, ज्यात स्पष्टपणे नमूद केले गेले होते की विषयांकित मिळकतीवर मे. एमिनन्स यांचा कोणताही बोजा नाही, हे आदेश संपूर्णपणे निरर्थक ठरतील. प्रार्थना (ब) मधील मागणी पाहता, मे. एमिनन्स यांचा दावा हा मिळकतीवरील बोजावरच आधारित होता. न्यायालयाचे आदेश कायदेशीर परिणाम घडवतात, आणि त्यांना दुर्लक्षित करणे शक्य नाही. सदर प्रकरणात न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की उत्तरवादी क्रमांक ९ ला मिळकत व्यवहार करण्यात कोणताही प्रतिबंध नाही आणि मालमत्तेवर मे. एमिनन्स यांचा बोजा नाही. दुसरा म्हणजे, फक्त एवढेच की, याचिकाकर्त्याने दिनांक २९ मार्च २०२४ रोजीच्या हस्तांतरण दस्ताद्वारे उत्तरवादी क्रमांक ९ कडून मिळकत खरेदी केली आहे, त्यामुळे याचिकाकर्त्याने मे. एमिनन्स (उत्तरवादी क्रमांक २) च्या तर्फे किंवा अंतर्गत दावा केला आहे, असे मानण्यास कोणताही कायदेशीर आधार राहत नाही. हे दावा कथनपत्राच्या प्रार्थना (ब) मध्ये मांडलेल्याच्या अगदी विरुद्ध आहे. म्हणूनच, या दोन्ही आधारांवर श्री. खांबाटा यांचा असा युक्तिवाद स्वीकारणे शक्य नाही.

१०८. हे दिसून येते की श्री. खांबाटा यांनी मांडलेला हा युक्तिवाद, ज्यामध्ये त्यांनी कर्नाटक उच्च न्यायालयाच्या मे. देवट्री कॉर्प एलएलपी (सुप्रा) या निर्णयाचा आधार घेतला आहे आणि ज्याचा उल्लेख विद्वान एकल लवादांनी वादग्रस्त आदेश देताना केला

आहे, ते सद्यप्रकरणातील तथ्यस्थितीला स्पष्टपणे लागू पडत नाही. कारण त्या प्रकरणात विक्रीचा करार हा कलम ९ च्या कार्यवाही प्रलंबित असताना झाला होता. सदर कार्यवाही ३१ जुलै २०२३ रोजी दाखल करण्यात आली, आणि त्या अर्जाच्या प्रलंबित अवस्थेत, २० डिसेंबर २०२३ रोजी अपीलकर्त्याने वादातील मिळकत त्या कार्यवाहीतील उत्तरवादीच्या विक्रेत्यांकडून खरेदी केली. दिनांक २ जानेवारी २०२४ रोजी, कलम ९ न्यायालयाने विक्रेत्यांविरुद्ध आदेश पारित करून त्यांना अनुसूचीतील मालमत्ता हस्तांतरित करण्यापासून प्रतिबंधित केले होते. या परिस्थितीत, उच्च न्यायालयाने संविधान पीठाच्या कॉक्स अँड किंग्स लि. (सुप्रा) या निर्णयातील कायद्याच्या तत्त्वांचा अवलंब करून, करारातील विशिष्ट अटींचा संदर्भ घेत, तसेच खटला प्रलंबित या तत्त्वाचा अवलंब करून असे ठरविले की अपीलकर्ता खरेदीदार हा हस्तांतरिती असल्याने, त्याने करारातील विक्रेत्यांच्या जागी प्रवेश केला होता आणि मालमत्ता त्यांना जोडलेल्या सर्व हक्कांसह आणि जबाबदाऱ्यांसह विक्रेत्यांकडून घेतली होती, असे उच्च न्यायालयाने निष्कर्ष काढला. न्यायालयाने पुढे हेही ठरविले की, कलम ९ ची कार्यवाही प्रलंबित असताना झालेला व्यवहार हा त्या कार्यवाहीच्या निकालावर अवलंबून असेल आणि अशा प्रकारची कार्यवाही लवाद प्रक्रियेपूर्वीची पूरक प्रक्रिया (step-in-aid) म्हणून गणली जाईल. ही परिस्थिती सध्याच्या प्रकरणातील तथ्यांपेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. कारण, सध्याच्या प्रकरणात, वर नमूद केल्याप्रमाणे, विषयांकित मिळकत याचिकाकर्त्याच्या बाजूने कलम ९ च्या कार्यवाहीवर अंतिम आदेश झाल्यानंतरच

विधिपूर्वक विक्री/हस्तांतरण करण्यात आली आहे. जिथपर्यंत सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान पीठाने कॉक्स अँड किंग्स लि.. (सुप्रा) या प्रकरणात लवाद प्रक्रियेत करारावर सही न केलेल्या पक्षांना पक्षकार म्हणून सामील करण्याबाबत मांडलेली कायदेशीर तत्त्वे आहेत, त्याबाबत आम्ही पुढे थोड्या वेळाने विचार करणार आहोत.

१०९. करारातील लावादीय अटींवर सही न केलेल्या पक्षांना लवाद प्रक्रियेत पक्षकार म्हणून सामील करण्यासंदर्भात कायद्याचे तत्त्व, याबाबत श्री. खांबाटा यांनी मांडलेल्या युक्तिवादांबाबत, आम्ही खालील चर्चेत त्याचा उल्लेख करणार आहोत.

लवाद करारावर सही न करणाऱ्याला लवाद कार्यवाहीत पक्षकार म्हणून सामिल करण्यासंबंधी कायद्याची स्थिती.

११०. या प्रश्नावर आपण थांबून राहण्याची आवश्यकता नाही, कारण सर्वोच्च न्यायालयाच्या कॉक्स अँड किंग्स लि. (सुप्रा) मधील अधिकारपूर्ण घोषणा लक्षात घेता, अशा प्रश्नावरील तत्त्वे आता पुन्हा वादग्रस्त राहिलेली नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयात लवाद अधिनियम लवाद करारावर सही न करणाऱ्याला पक्षकार म्हणून सामील करण्याची परवानगी देतो का, आणि कलम ७ अंतर्गत लवाद करण्याचा हेतू पक्षकारांच्या आचार आणि वर्तनावरून निश्चित करता येतो का याची तपासणी केली. कलम २(१)(एच) अंतर्गत 'पक्ष' या शब्दाचा अर्थ लवाद कराराचा पक्ष असा आहे आणि पुढे कलम २(१)(बी) अंतर्गत परिभाषित केलेला 'लवाद करार' याचा अर्थ कलम ७ मध्ये संदर्भित केलेला करार असा आहे, हे लक्षात घेता, न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की कलम

७ वैध आणि बंधनकारक लवाद कराराचे आवश्यक घटक स्पष्ट करते . सर्वोच्च न्यायालयाने भवन कन्स्ट्रक्शन (सुप्रा) मध्ये निष्कर्ष काढल्याप्रमाणे, लवाद करार, कराराची निर्मिती असल्याने, पक्षकारांच्या विवादांना पर्यायी विवाद निवारण यंत्रणेकडे सादर करण्याच्या संमतीवर आधारित असतो, असे निष्कर्ष काढण्यात आले. सामान्यतः, लवाद कराराचा पक्षकार हा लवाद करारावर किंवा लवाद करार अंतर्भूत असलेल्या मूळ करारावर सही करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांच्या आधारावर निश्चित केला जातो, असे निरीक्षण करण्यात आले. तथापि, गेल्या दोन दशकांत सही न करणाऱ्या पक्षकारांना नवीन पक्षकार म्हणून सामील करण्याच्या कायद्यात लक्षणीय विकास झाला आहे, असे निरीक्षण करण्यात आले. या विकासाला न्यायालयाने ढोबळ मानाने दोन टप्प्यांमध्ये विभागले: क्लोरो कंट्रोल्स (सुप्रा) पूर्वी आणि क्लोरो कंट्रोल्स (सुप्रा) नंतरचा कायद्याचा विकास, आणि परदेशी अधिकारक्षेत्रातील त्यासंबंधी समकालीन न्यायशास्त्र. संविधान पीठाने “संमती ही लवादाची मूलभूत गरज आहे” आणि “पक्षीय स्वायत्तता” हे विवाद निराकरणाचे प्रमुख तत्त्व असल्याचे स्पष्ट केले. लवाद करार हा कराराच्या स्वरूपाचा असून त्यात गोपनीयेतेचे तत्त्व आणि अशा करारामुळे निर्माण होणाऱ्या बंधनकारक परिणामांचा समावेश असतो. त्यामुळे हे मान्य तत्त्व आहे की "लवाद हा कराराचा विषय आहे" आणि ज्याने संमती दिलेली नाही, त्या पक्षाला त्याच्या इच्छेविरुद्ध लवादासमोर जाण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. तसेच हे ठरविण्यात आले की, "संमती ही लवादाची आधारशिला आहे", त्यामुळे सही न केलेल्या पक्षास (non-signatory)

बळजबरीने लवाद कराराचा “पक्ष” बनवणे म्हणजे ‘कराराची गोपनीयता’ आणि ‘पक्षकार स्वायत्तता’ या पवित्र तत्त्वांचे उल्लंघन होईल. पुढे असे स्पष्ट करण्यात आले की अनेक पक्षकारांचा समावेश असलेल्या करारांमध्ये न्यायालये/न्यायाधिकरणांना वारंवार हे निश्चित करावे लागते की लवाद कराराचे पक्ष कोण आहेत. निर्णायक प्रश्न असा असतो की सही न केलेल्या पक्षाने लवाद कराराबद्दल बंधनकारक होण्यासाठी संमती दिली आहे का. अशा स्थितीत, न्यायालये/न्यायाधिकरणे करार कायद्याचे आणि कॉर्पोरेट कायद्याचे तत्त्व लागू करतात. तसेच, कायदेशीर सिद्धांत विशिष्ट करारातील भाषा आणि प्रत्यक्ष परिस्थितीचे मूल्यमापन करण्यासाठी एक चौकट पुरवतात, जेणेकरून पक्षांनी लवाद कराराने बांधील होण्याचा हेतू व्यक्त केला आहे का, हे निश्चित करता येते. लावादीय कार्यवाहीमध्ये सही न करणाऱ्याला, नवीन पक्षकार म्हणून सामील करण्यासंबंधीच्या मुद्द्याच्या निर्णयासाठी बहुमताच्या निर्णयात संविधान पीठाने केलेली खालील निरीक्षणे सर्वोच्च आहेत आणि ती लागू करणे आवश्यक आहे:–

> <u>लवाद करार</u>
>
> I. लवादासाठी संमती हा आधार
>
> ६२. लवाद ही एक पर्यायी वाद निराकरण यंत्रणा आहे जिथे पक्षीय संमतीने परस्परांमधील वाद देशातील न्यायालयांना वगळून लवादसमोर सादर करण्याचा निर्णय घेतला जातो. लवाद पक्षांना एक तटस्थ, कार्यक्षम आणि तज्ज्ञ प्रक्रिया उपलब्ध करून देतो , ज्यामध्ये एकच मंचावर वादाचा निपटारा केला जातो आणि त्याचा निर्णय पक्षांवर अंतिम व बंधनकारक असतो. पक्षीय स्वायत्तता हे तत्त्व लवाद प्रक्रियेचा पाया आहे, कारण त्याद्वारे पक्षांना तांत्रिक औपचारिकता टाळण्याची आणि वादास लागू होणारे मूलभूत आणि प्रक्रियात्मक कायदे आणि नियम निश्चित करण्याची मुभा मिळते. पक्षीय स्वायत्ततेमुळे पक्षांना लवादाचे ठिकाण (seat of arbitration), लवादांची संख्या, लवादांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया, लवादाच्या प्रक्रियेवर लागू होणारे शासकीय नियम आणि लवादाचे

प्रशासन करणारी संस्था यांची निवड करता येते. लवाद प्रक्रिया विस्तृतपणे दोन टप्प्यांमध्ये विभागली जाते. पहिला टप्पा, लवाद कराराच्या अस्तित्वाने सुरू होतो आणि लवाद निर्णय (arbitral award) दिल्यावर संपतो. दुसरा टप्पा, लवाद निर्णयाच्या अंमलबजावणीशी संबंधित असतो.

६३. संमती लवादाची आधारशिला आहे. लवाद करार पक्षकारांनी त्यांचे वाद लवादाकडे सादर करण्याच्या संमतीची नोंद करतो. या न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने बिहार राज्य खनिज विकास महामंडळ विरुद्ध एनकॉन बिल्डर्स (आय) प्रा. लि. ४७ मध्ये लवाद कराराचे चार आवश्यक घटक सांगितले आहेत:

> (i) कल्पित व्यवहार/प्रकरणाशी संबंधित वर्तमान किंवा भावी मतभेद अस्तित्वात असणे आवश्यक आहे.
>
> (ii) पक्षकारांनी असे मतभेद एका खाजगी न्यायाधिकरणाद्वारे सोडवण्याचा हेतू ठेवला असावा.
>
> (iii) पक्षकार अशा न्यायाधिकरणाच्या निर्णयाने बांधील राहण्यास लेखी सहमत असले पाहिजे.
>
> (iv) पक्षकार समान मताचे (ad idem) असले पाहिजेत.

६८. करारामधून निर्माण झालेला असल्यामुळे, लवाद करार देखील करार कायद्यातील सर्वसाधारण तत्त्वांच्या अधीन असतो, ज्यामध्ये कराराची गोपनीयता हे तत्त्व समाविष्ट आहे. कराराची गोपनीयता या तत्त्वाचा अर्थ असा की करारामुळे करारातील पक्षकारांशिवाय कोणालाही हक्क प्राप्त होत नाहीत किंवा जबाबदाऱ्या लादल्या जाऊ शकत नाहीत. या सिद्धांताचे दोन पैलू आहेत: प्रथम, करारातील पक्षकारांनाच त्या करारातून अधिकार मिळतात किंवा ते कराराने बांधील राहतात; आणि दुसरे, करारातील पक्षकार तृतीय पक्षावर कोणतीही जबाबदारी लादू शकत नाहीत. त्याचा तर्कसंगत परिणाम असा की, तृतीय पक्षाला करारातून कोणतेही हक्क किंवा अधिकार प्राप्त होऊ शकत नाहीत. एम. सी. चाको विरुद्ध स्टेट बँक ऑफ त्रावणकोर या प्रकरणात, या न्यायालयाने हे एक स्थापितकायदा म्हणून स्पष्ट केले की, कराराचा पक्षकार नसलेला कोणताही व्यक्ती, त्या करारातील अटी अंमलात आणू शकत नाही, काही स्पष्ट मान्य अपवाद वगळता, जसे की, ट्रस्ट, कौटुंबिक व्यवस्था, आणि हक्कांचे हस्तांतरण. फक्त लवाद करारातील पक्षकारांनाच त्या करारामुळे बांधील राहता येते किंवा लाभ मिळतो, हे तत्त्व लवाद प्रक्रियेसाठी मूलभूत आहे. हे तत्त्व आंतरराष्ट्रीय लवाद अधिवेशनांमध्ये तसेच लवाद अधिनियमात एकसमानरीत्या प्रतिबिंबित होते. उदाहरणार्थ, युनसीट्राल मॉडेल कायद्याच्या कलम ७ मध्ये लवाद कराराची व्याख्या अशी केली आहे: “पक्षकारांदरम्यान उद्भवलेल्या किंवा उद्भवू शकणाऱ्या वादांना, परिभाषित कायदेशीर संबंधाच्या संदर्भात करारात्मक असो किंवा नसो, लवादाद्वारे निकाली काढण्यासाठी केलेला करार.” (जोर दिलेला आहे)

६९. हे एक स्थापित कायद्याचे तत्त्व आहे की लवाद हा कराराचा विषय असतो आणि ज्या वादासाठी एखाद्या पक्षाने संमती दिलेली नाही, त्या वादासाठी त्याला लवाद प्रक्रियेत भाग घेण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. कारण, संमती ही लवादाची मूलभूत आधारशिला आहे, त्यामुळे लवाद करारावर सही न केलेल्या पक्षाला जबरदस्तीने लवाद कराराचा “पक्ष” बनवता येत नाही. असे केल्यास कराराची गोपनीयता आणि पक्षीय स्वायत्तता या पवित्र तत्त्वांचे उल्लंघन होईल . तथापि, अनेक

पक्षांचा समावेश असलेल्या करारांच्या प्रकरणात, न्यायालये आणि न्यायाधिकरणांना अनेकदा हे ठरवावे लागते की कोणते पक्ष लवाद कराराचे पक्षकार आहेत.

II लवाद करारातील पक्षकार

७०. लवाद करारातील पक्षकार कोण आहेत हे निश्चित करण्याची सामान्य पद्धत म्हणजे करारातील प्रस्तावना (recitals) मध्ये ज्यांची नावे नमूद आहेत आणि ज्यांनी करारावर सही केली आहे अशा संस्थांचा किंवा व्यक्तीं पहाणे. करारावर पक्षकाराची सही असणे म्हणजे त्या व्यक्ती/संस्थेने लवाद न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रासमोर जाण्यास दिलेल्या संमतीचा सर्वात स्पष्ट आणि ठोस पुरावा होय. तथापि, ज्या व्यक्तींनी किंवा संस्थांनी करारावर सही केली नाही, त्या त्याद्वारे बांधील नसतील असा निष्कर्ष प्रत्येक वेळी बरोबरच असेल असे नाही. एखाद्या करारासाठी लेखी स्वरूपात असणे आवश्यक असले तरी, करारामध्ये सही असणे हे प्रत्येकवेळी आवश्यक नसते. त्यामुळेच, "तृतीय पक्ष" या पारंपरिक शब्दाऐवजी "सही न करणारे (non-signatories)" हा शब्द अधिक योग्य आहे —कारण संमती कधीकधी सहीविना इतर मार्गाने व्यक्त केली जाऊ शकते सही न करणारा अशी व्यक्ती किंवा संस्था आहे जी वादात गुंतलेली आहे, जो लवादाचा विषय आहे, जरी तिने औपचारिकपणे लवाद करार केलेला नाही. महत्त्वाचा मुद्दा हा असतो की अशा सही न करणाऱ्याने करारातील पक्षकारांबरोबर कायदेशीर नाते निर्माण करण्याचा आणि लवाद कराराने बांधील राहण्याचा हेतू व्यक्त केला होता का. अशा परिस्थिती उद्भवू शकतात की जिथे काही व्यक्ती/संस्था लवाद करारावर किंवा लवाद अट असलेल्या मूळ करारावर औपचारिकपणे सही करत नाहीत, तरीदेखील त्यांना त्या कराराच्या अटींनी बांधील राहण्याचा हेतू असतो. दुसऱ्या शब्दांत, लवाद करारातील "पक्षकार" कोण आहे हा मुद्दा मुख्यतः संमतीवर अवलंबून असतो.

७३. वरील विवेचनातून हे निष्पन्न होते की अप्रत्यक्ष करार (implied contract) असताना, प्रश्नाचा केंद्रबिंदू हा असतो की पक्षांनी कराराच्या अटींनी बांधील राहण्याची संमती दिली आहे का. अशी संमती त्यांच्या कृत्यांमधून किंवा वर्तनातून प्रकट होते. वर्तनावर आधारित अप्रत्यक्ष करार सिद्धांत या न्यायालयानेदेखील मान्य केला आहे. हाजी मोहम्मद इशाक विरुद्ध मोहम्मद इक्बाल या प्रकरणात, वादीने प्रतिवादीस तंबाखू पुरवली होती. पक्षांमध्ये कोणताही स्पष्ट लिखित करार नव्हता, तरीसुद्धा प्रतिवादीने माल स्वीकारला, पण वादीने वारंवार मागणी करूनही प्रतिवादीने थकबाकी चुकती केली नाही. या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने निरीक्षण केले की, माल स्वीकारण्याचे प्रतिवादीचे वर्तन आणि वादीने केलेल्या कोणतीही मागणी नाकारली नसणे, यावरून स्पष्ट होते की, दोघांमध्ये थेट करार अस्तित्वात आला होता, ज्यास कायद्यात वर्तनावरून अप्रत्यक्ष करार (implied contract by conduct) म्हणतात. भारतीय करार कायद्यानुसार, एखाद्या पक्षाचे वर्तन किंवा कृती हे त्याने कराराने बांधील राहण्याची संमती दिल्याचे द्योतक असू शकते. हेच तत्त्व लवाद करारालाही लागू होते, कारण लवाद करार हा देखील करारातूनच निर्माण होतो. तथापि, लवाद करार वैध आणि अंमलबजावणीयोग्य होण्यासाठी, त्याला लवाद अधिनियमांतर्गत नमूद केलेल्या अटी पूर्ण कराव्या लागतात.

८४. हे गृहीत धरले जाते की लवाद करारावर औपचारिक सही करणारे पक्षकार त्या कराराने बांधील राहतील. तथापि, अपवादात्मक परिस्थितींमध्ये, ज्या व्यक्ती किंवा संस्था लिखित लवाद करारावर किंवा त्या करारासोबत असलेल्या मूळ करारावर औपचारिकपणे सही करत नाहीत किंवा संमती देत

नाहीत, त्यांनाही त्या लवाद कराराने बांधील धरण्यात येऊ शकते. मागील परिच्छेदांत नमूद केल्याप्रमाणे, कराराची गोपनीयता हे तत्त्व करारातील तृतीय पक्षांवर हक्क किंवा जबाबदारी लादण्यास मर्यादा घालते. सामान्यत: फक्त लवाद करारातील पक्षकारांनाच, कारण त्यांनी संमती व्यक्त केली आहे, त्या कराराच्या संपूर्ण परिणामांना, दिलासा आणि उपाययोजना यांना सामोरे जावे लागते. म्हणूनच, न्यायालये किंवा न्यायाधिकरणांसमोर निर्णायक प्रश्न असा असतो की: सही न करणाऱ्या पक्षाने लवाद कराराने बांधील राहण्यास संमती दिली आहे का? सही न करणारा लवाद कराराने बांधील आहे का हे ठरविण्यासाठी, न्यायालये आणि न्यायाधिकरणे करार कायदा आणि कॉर्पोरेट कायद्याची सामान्य तत्त्वे लागू करतात. कायदेशीर सिद्धांत पक्षकारांच्या लवाद कराराने बांधील राहण्याच्या हेतूचे मूल्यांकन करण्यासाठी करारातील विशिष्ट भाषा आणि तथ्यात्मक परिस्थिती तपासण्यासाठी एक चौकट उपलब्ध करून देतात.

८५. गॅरी बॉर्न यांनी असे सुचवले आहे की विविध कायदेशीर सिद्धांत आणि तत्त्वे लवाद कराराने बांधील राहण्याविषयी पक्षकारांचा खरा हेतू निश्चित करण्याचा पाया उपलब्ध करून देतात. म्हणून, 'सही न करणाऱ्यांना' किंवा 'तृतीय पक्षांना' लवाद कराराचा 'विस्तार' अशा शब्दावलींचा वापर करणे अयोग्य आहे:

> "आंतरराष्ट्रीय लवादावरील न्यायिक केस कायद्यात आणि विवरणामध्ये काहीवेळा उपरोक्त सिद्धांतांपैकी एका किंवा अधिकच्या आधारावर सही न करणाऱ्यांना किंवा "तृतीय पक्षांना" लवाद कराराचा "विस्तार" करण्याचा संदर्भ दिला जातो. हे उल्लेख चुकीचे आहेत, कारण ते संकेत देतात की लवाद कराराचा पक्षकार नसलेली व्यक्ती किंवा संस्था, पक्षांच्या संमतीशिवाय इतर कोणत्यातरी आधारावर त्या कराराच्या परिणामांना अधीन होते. 'विस्तार' किंवा 'तृतीय पक्ष' या उल्लेखांच्या विरुद्ध, वरील सिद्धांत बहुतेक वेळा असा निष्कर्ष काढण्यासाठी पाया उपलब्ध करून देतात की प्रत्यक्षात ती संस्था किंवा व्यक्ती लवाद कराराची वास्तविक पक्षकार आहे आणि म्हणूनच त्या कराराचा 'तृतीय पक्षाकडे' विस्तार करण्याची गरज नसते,कारण त्या पक्षकाराच्या कृतींमधून करारास संमती मिळते किंवा औपचारिक सही नसतानाही कायदेशीरदृष्ट्या ती त्याच्याशी बांधील ठरते. त्यामुळे, लवाद कराराचा सामान्यतः 'विस्तार' केला जात नाही, तर लवाद कराराला संमती देणारे खरे पक्षकार ओळखले जातात.

८६. जगभरातील न्यायालये आणि न्यायाधिकरणे लवाद कराराने बांधील राहण्यासाठी सही न करणाऱ्या पक्षांची संमती निश्चित करण्यासाठी पारंपरिक करार आणि व्यापारी कायद्याचे सिद्धांत लागू करीत आहेत. साधारणपणे, संमती-आधारित सिद्धांत जसे की एजन्सी, करारबदल, हक्कांचे हस्तांतरण, कायद्याच्या कार्यवाहीद्वारे निर्माण होणारी बंधने, विलीनीकरण आणि उत्तराधिकार, तृतीय पक्ष लाभार्थी, हे विविध क्षेत्रांमध्ये लागू केले गेले आहेत. अपवादात्मक परिस्थितींमध्ये, संमती नसलेल्या सिद्धांतांचा देखील वापर करून, सही न करणाऱ्या पक्षाला लवाद कराराने बांधील करण्यात आले आहे, जसे की: जसे की कॉर्पोरेट आवरणाला भेदणे (piercing the corporate veil) किंवा अल्टर इगो, इस्टोपल. गट कंपनी सिद्धांत हा संमती-आधारित सिद्धांतांपैकी एक असून, सही न करणाऱ्या पक्षाला लवाद कराराने बांधील करण्यासाठी पक्षकारांचा वास्तविक हेतू निश्चित करण्यासाठी वापरला गेला आहे, जरी काही प्रकरणांमध्ये त्यावर मतभेद राहिले आहेत.

१२३. मूळ कराराच्या पूर्ततेमध्ये सही न करणाऱ्याचा सहभाग हा न्यायालये आणि न्यायाधिकरणे यांनी विचारात घेण्याचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. सही न करणाऱ्या पक्षाचे वर्तन हे त्या पक्षाने लवाद कराराने बांधील राहण्याचा हेतू व्यक्त केल्याचे द्योतक असते. पक्षांनी लवाद कराराने बांधील राहण्याचा हेतू होता का, हे निश्चित करण्यासाठी, सही न करणारा पक्ष मूळ कराराच्या वाटाघाटी, पूर्तता आणि समाप्ती या प्रक्रियेत कशाप्रकारे सहभागी झाला होता, यासंबंधीच्या परिस्थितींचे मूल्यमापन केले जाते. युनिड्रॉइट आंतरराष्ट्रीय व्यावसायिक कराराचे तत्त्व, २०१६ नुसार, पक्षांचा वैयक्तिक हेतू खालील परिस्थितींवरून ओळखता येतो:

(a) पक्षकारांमधील प्राथमिक वाटाघाटी;

(b) पक्षकारांनी आपल्यामध्ये स्थापित केलेल्या प्रथा;

(c) करार पूर्ण झाल्यानंतर पक्षांचे वर्तन;

(d) कराराचे स्वरूप आणि उद्देश;

(e) संबंधित व्यापार/व्यवसायात विशिष्ट शब्द व शब्दप्रयोगांना दिला जाणारा सामान्य अर्थ; आणि

(f) प्रचलित परंपरा व प्रथा.

१३२. आमचे मत आहे की, लवादाच्या संमतीजन्य स्वरूपावर (consensual nature of arbitration) आणि आधुनिक व्यावसायिक वास्तवामध्ये, जिथे एक सही न करणारा अनेक भिन्न मार्गांनी व्यावसायिक व्यवहारामध्ये गुंतलेला असतो, या दोहोंमध्ये संतुलन साधण्याची आवश्यकता आहे. असा समतोल तेव्हाच योग्यरीत्या साधता येऊ शकतो, जेव्हा डिस्कव्हरी एंटरप्रायझेस (सुप्रा) मध्ये नमूद केलेले घटक समग्रपणे लागू केले जातात. उदाहरणार्थ, मूळ कराराच्या अंमलबजावणीत सही न करणाऱ्या पक्षाचा असा सहभाग, ज्यातून हे सूचित होते की करारात लवाद अट असलेल्या कराराने बांधील राहण्याचा त्याचा हेतू होता,हा अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे. इतर घटक जसे की, व्यवहाराचे संयुक्त स्वरूप आणि विषय-वस्तूची समानता हे दर्शवू शकतात की, सही न करणाऱ्या पक्षाविरुद्धचे दावे हे लवाद न्यायाधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील विषयाशी अत्यंत निकटने अंतर्गत रित्या जोडलेले आहेत. घटकांकडे समग्रपणे पाहिल्यास, असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की, सही न करणारे, सही करणाऱ्या पक्षांशी असलेल्या त्यांच्या संबंधांमुळे आणि विषय-वस्तूंशी गुंतागुंतीने जोडलेल्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे, सही करणाऱ्या पक्षकारांमधील वादासाठी वास्तविक अपरिचित पक्ष नाहीत.

१३५. लवाद अधिनियमामध्ये “पक्षाच्या तर्फे दावा करणारी किंवा अंतर्गत दावा करणारी व्यक्ती” या वाक्यप्रचाराची व्याख्या केलेली नाही. “तर्फे दावा करणारी किंवा अंतर्गत दावा करणारी व्यक्ती” ही त्या कराराची किंवा करारातील अटींची सही न करणारी व्यक्ती असते, परंतु ती सही केलेल्या पक्षाच्या तर्फे किंवा अंतर्गत दावा करू शकते. लवादावरील रसेल मध्ये नमूद आहे की, हस्तांतरिती हा व्यक्ती लवाद करारातील पक्षाच्या तर्फे किंवा अंतर्गत दावा करणारी व्यक्ती म्हणून लवाद करार लागू करू शकतो(१०७). हस्तांतरितीला करारातील हक्क मिळतात तसेच त्या करारातील लवाद अटींचे लाभ आणि भार दोन्ही त्याच्यावर लागू होतात. (१०८)याचप्रमाणे, इंग्लंडमधील न्यायालयांनी असे ठरवले

आहे की, हस्तांतरिती किंवा प्रत्यासन करणारा व्यक्ती लवाद करारातील पक्षाच्या तर्फे किंवा अंतर्गत दावा करू शकतो. (१०९) इंग्लिश कायद्यानुसार, ज्या ठराविक परिस्थितीत एक व्यक्ती किंवा संस्था पक्षकाराद्वारे किंवा त्याच्या अंतर्गत दावा करू शकते, त्या हस्तांतरण, प्रत्यासन, आणि करारबदल आहेत. ते सही करणाऱ्या पक्षाच्या जागी येतात आणि त्यांना लवादाचा अधिकार सही केलेल्या पक्षाकडून प्राप्त होतो, लवाद कराराखाली स्वतंत्र अधिकार असल्यामुळे नाही.

१४३. लवादीय प्रक्रिया ही पक्षकारांनी त्यांचे वाद पर्यायी विवाद निवारण यंत्रणेकडे निर्देशित करण्याच्या संमतीवर आधारित आहे. परिणामी, ज्या करारास एखाद्या तृतीय पक्षाने संमती दिलेली नाही, त्या कराराच्या आधारे त्याला लवाद प्रक्रियेत भाग घेण्यास भाग पाडता येत नाही. "तर्फे दावा करणे किंवा अंतर्गत दावा करणे" हा वाक्यप्रचार लवाद अधिनियमाच्या कलम २(१)(h) किंवा कलम ७ मध्ये वापरलेला नाही. कारण या तरतुदी पक्षीय स्वायत्तता आणि पक्षीय स्वतंत्रता या तत्त्वांवर आधारित आहेत, ज्यासाठी पक्षाने आपला वाद लवादाद्वारे निकाली लावण्यास संमती देणे आवश्यक असते. याउलट, लवाद करारातील एखाद्या पक्षाच्या तर्फे किंवा अंतर्गत दावा करणारी व्यक्ती, मूळ पक्षाच्या जागी उभी राहते आणि लवाद कराराशी संबंधित मूळ पक्षाचा हक्कच पुढे चालवते, त्यापेक्षा वेगळा किंवा स्वतंत्र हक्क नाही.

१५१. आपल्यासमोर संदर्भित करण्यात आलेल्या प्रश्नांपैकी एक प्रश्न असा आहे की कलम ८ मधील "तर्फे दावा करणे किंवा अंतर्गत दावा करणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ असा करता येईल का की त्यामध्ये गट कंपनी सिद्धांत समाविष्ट होतो. गट कंपनी सिद्धांत हा अशा तत्त्वावर आधारित आहे की, पक्षांचा परस्पर हेतू तपासून पहिला जातो, म्हणजे गटातील सही न करणारी संस्था आपल्याच हक्काने लवाद कराराची पक्षकार होऊ शकते का. अशी सही न करणारी संस्था सही करणाऱ्या पक्षाच्या "तर्फे" किंवा "अंतर्गत" दावा करणारी नसते. वर नमूद केल्याप्रमाणे, "तर्फे दावा करणे किंवा अंतर्गत दावा करणे" हा वाक्यप्रचार अशा उत्तराधिकारी व्यक्तीं संदर्भात वापरला जातो, ज्या व्युत्पन्न क्षमते (derivative capacity) मध्ये कार्य करतात आणि लवाद करारातील सही करणाऱ्या पक्षाची जागा घेतात. याउलट, गट कंपनी सिद्धांत वापरला जातो तो सही न करणाऱ्या पक्षाला लवाद कराराने बांधील करण्यासाठी, जेणेकरून त्या पक्षास कराराच्या पूर्ततेदरम्यान लाभ मिळाले असल्यास त्या लाभाचा वापर करता येईल आणि जबाबदाऱ्या देखील स्वीकाराव्या लागतील. हा सिद्धांत अशा सही न करणाऱ्या पक्षाला लवाद कराराने बांधील करण्यासाठी वापरता येतो, आणि त्यासाठी कलम ८ आणि कलम ४५ मधील "तर्फे दावा करणे किंवा अंतर्गत दावा करणे" हा वाक्यप्रचार लागू आहे का, यावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही.

१६३. लवाद अधिनियमातील कलम १६ भारतीय लवाद कायद्यातील सक्षमता-सक्षमता (competence-competence) हे तत्त्व प्रतिष्ठापित करते. या तरतुदीनुसार लवाद न्यायाधिकरणाला स्वतःच्या अधिकारक्षेत्रावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे, त्यामध्ये लवाद कराराच्या अस्तित्वाबाबत किंवा वैधतेबाबत कोणतीही हरकत असेल तरी त्यावर निर्णय देण्याचा अधिकार समाविष्ट आहे. कलम १६ ही एक समावेशक तरतूद आहे, ज्यामध्ये लवाद न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राशी संबंधित सर्व प्राथमिक मुद्दे समाविष्ट होतात. सक्षमता-सक्षमता सिद्धांताचा उद्देश असा आहे की प्रारंभीच्या टप्प्यावर न्यायालयीन हस्तक्षेप कमीत कमी करावा. लवाद कराराचे पक्ष कोण आहेत याचा निर्णय हा लवाद न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राच्या क्षमतेच्या मूळापर्यंत जाणारा प्रश्न आहे.

१६६. वरील कायदेशीर स्थिती आम्हाला या अनिवार्य निष्कर्षाकडे घेऊन जाते की संदर्भाच्या टप्प्यावर न्यायालयाने फक्त लवाद कराराचे प्रथमदर्शनी अस्तित्व आहे का हे निश्चित करणे आवश्यक असते. जर संदर्भित न्यायालय हा मुद्दा ठरवू शकत नसेल, तर तो मुद्दा लवाद न्यायाधिकरणाने ठरवण्यासाठी सोडावा. संदर्भ न्यायालयाने अनावश्यकपणे लवाद प्रक्रियेत हस्तक्षेप करू नये , आणि लवाद न्यायाधिकरणाला त्याचे प्राथमिक अधिकारक्षेत्र वापरू द्यावे. शिन-एत्सु केमिकल कं. लि. विरुद्ध अक्ष ऑप्टिफायबर लि. या प्रकरणात, या न्यायालयाने निरीक्षण केले की लवाद कराराच्या वैधतेशी संबंधित अंतिम निर्णय लवाद न्यायाधिकरणावर सोडल्यास त्याचे ठोस फायदे आहेत:

> ७४. [...] "जरी न्यायालयाने केवळ प्रथमदर्शनी विचार करून असा निष्कर्ष काढला की लवाद करार अवैध नाही, निष्प्रभ किंवा अंमलबजावणीयोग्य नाही, तरीसुद्धा लवादाला हा मुद्दा पूर्णपणे तपासून अंतिम निर्णय देण्यापासून काहीही रोखत नाही. जर लवादाला करार वैध आहे असे आढळले, तर कोणतीही अडचण नाही, लवाद प्रक्रिया सुरू राहील आणि लवाद निर्णय दिला जाईल. परंतु, जर लवादाला करार निरुपयोगी, निष्प्रभ किंवा अवैध असल्याचे आढळले, तर त्याचा अर्थ असा होतो की लवादाची मागणी करणाऱ्या पक्षाला लवाद प्रक्रियेत जाण्याची संधी देण्यात आली होती, आणि मुद्द्याचा संपूर्ण विचार केल्यानंतर लवादाने असा निष्कर्ष दिला की लवादास काहीही वाव नाही."

१६९. लवाद करारातील सही न करणाऱ्या पक्षकारांना नवीन पक्षकार म्हणून जोडण्याच्या बाबतीत, खालील दोन परिस्थिती प्रामुख्याने उद्भवतील: पहिली, ज्या वेळी लवाद करारावर स्वाक्षरी करणारा पक्ष कोणत्या सही न करणाऱ्या पक्षाला लवाद करारात सामील करण्याची मागणी करतो; आणि दुसरी, ज्या वेळी सही न करणारा पक्ष स्वतःच लवाद कराराची अंमलबजावणी करण्याची मागणी करतो. दोन्ही परिस्थितींमध्ये, संदर्भ न्यायालयाने प्रथमदर्शनी निश्चित करणे आवश्यक आहे की, लवाद करार अस्तित्वात आहे का; आणि संबंधित गैर-स्वाक्षरीत पक्ष हा प्रत्यक्ष आणि खरा लवाद कराराचा पक्ष आहे का. अशा प्रश्नांचे निर्धारण गुंतागुंतीचे असल्याने, संदर्भ न्यायालयाने हा मुद्दा लवाद न्यायाधिकरणाकडे सोपवावा, ज्यामध्ये लवाद न्यायाधिकरण तथ्यात्मक पुरावे आणि लागू असलेल्या कायदेशीर सिद्धांतांच्या आधारे हे ठरवू शकेल की गैर-स्वाक्षरीत पक्षावर त्याचे अधिकारक्षेत्र विस्तारते का.लवाद न्यायाधिकरणाने या प्रक्रियेत तथ्यात्मक, परिस्थितिजन्य, आणि कायदेशीर पैलू यांचा विचार करून निर्णय घ्यावा की गैर-स्वाक्षरीत पक्ष लवाद कराराच्या कक्षेत आहे की नाही. या प्रक्रियेत, लवाद न्यायाधिकरणाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे, जसे की गैर-स्वाक्षरीत पक्षाला लवाद न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राबाबत हरकती घेण्याची पूर्ण संधी देणे. अशी व्याख्या केल्याने सक्षमता-सक्षमता या तत्वाला खरी प्रभावी अंमलबजावणी मिळते, कारण लवाद करारातील योग्य पक्ष कोण आहेत याचे निर्धारण दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १६ अंतर्गत लवाद न्यायाधिकरणाने करावे.

....

निष्कर्ष

१७०. वर केलेल्या चर्चेच्या आधारे आम्ही खालील निष्कर्षांवर येतो:

१७०.१ दिवाणी प्रक्रिया संहिता नव्हे, तर लवाद अधिनियमा मधील कलम २(१)(h) आणि कलम ७ यांनुसार "पक्ष" या संज्ञेचा अर्थ स्वाक्षरी केलेले तसेच सही न केलेले (non-signatory) या दोन्ही पक्षांचा समावेश होतो.

१७०.२ सही न करणाऱ्या पक्षकारांचे आचरण हे लवाद कराराने बांधील राहण्याच्या त्यांच्या संमतीचे सूचक असू शकते.

१७०.३ कलम ७ नुसार लवाद करार लिखित स्वरूपात असणे आवश्यक असले तरी, यामुळे गैर-स्वाक्षरीत पक्षांना त्या लवाद कराराने बाध्य केले जाऊ शकत नाही, असा अर्थ होत नाही.

१७०.४ लवाद अधिनियमांतर्गत "पक्ष" ही संकल्पना आणि "त्या पक्षातर्फे किंवा त्याच्या अधीन दावा करणारा" ही संकल्पना या दोन संकल्पना वेगळ्या आणि भिन्न आहेत.

१७०.५ गट कंपनी सिद्धांताचा अवलंब करण्यामागील मूळ आधार असा आहे की गटातील कंपन्यांची कॉर्पोरेट स्वतंत्रता कायम ठेवत, पक्षकारांच्या समान हेतूचा शोध घेतला जातो, ज्यायोगे गैर-स्वाक्षरीत पक्षाला लवाद कराराशी बांधील राहण्यास सामावून घेतले जाऊ शकते.

१७०.६ अल्टर इगोचे किंवा पीअरसिंग कॉर्पोरेट विल चे तत्त्व हे गट कंपनी सिद्धांत लागू करण्याचा आधार असू शकत नाही.

१७०.७ गट कंपनी सिद्धांत हा स्वतंत्र असा कायदेशीर सिद्धांत आहे आणि तो लवाद अधिनियमातील कलम २(१)(h) आणि कलम ७ यांचे सुसंगत वाचन केल्यावर उद्भवतो.

१७०.८ गट कंपनी सिद्धांत लागू करताना, न्यायालय किंवा न्यायाधिकरण परिस्थितीनुसार डिस्कव्हरी एंटरप्रायझेस (सुप्रा) मध्ये ठरविलेले सर्व एकत्रित घटक विचारात घेईल. परिणामी, एकल आर्थिक युनिट या तत्त्वावर आधारित राहून गट कंपनी सिद्धांत लागू करता येणार नाही.

१७०.९ जे व्यक्ती पक्षाच्या तर्फे किंवा त्याच्या अधीन दावा करणारे असतात, ते फक्त व्युत्पन्न क्षमतेने हक्क मांडू शकतात.

१७०.१० क्लोरो कंट्रोल्स (सुप्रा) या निर्णयात, या न्यायालयाने गट कंपनी सिद्धांताला "पक्षाच्या तर्फे किंवा त्याच्या अधीन दावा करणारे" या वाक्याशी जोडण्याचा जो प्रयत्न केला, तो करार कायदा आणि कॉर्पोरेट कायद्याच्या सर्वमान्य तत्त्वांच्या विरोधात असून, तो दृष्टिकोन अयोग्य आहे.

१७०.११ गट कंपनी सिद्धांत हा अनेक पक्ष व अनेक करार असलेल्या जटिल व्यवहारांमध्ये पक्षांच्या उद्देशाचे निर्धारण करण्यासाठी उपयुक्त असल्यामुळे, भारतीय लवाद न्यायशास्त्रात सुरू ठेवावा.

१७०.१२ संदर्भाच्या टप्प्यावर, संदर्भ न्यायालयाने सही न करणारा पक्ष लवाद कराराने बांधील आहे की नाही, हे ठरवण्याचे कार्य लवाद न्यायाधिकरणावर सोपवावे.

१७०.१३ या न्यायनिर्णयात या न्यायालयाने गट कंपनी सिद्धांताच्या संदर्भात केलेले कोणतेही अधिकृत निर्धारण हे इतर तत्त्वे किंवा सिद्धांत ज्याद्वारे सही न करणाऱ्या पक्षांना लवाद कराराने बांधता येते, त्याच्या लागूतेस मर्यादा आणणारे म्हणून समजले जाऊ नये.

> १७१. या संविधान पीठाकडे संदर्भित केलेल्या कायद्याच्या प्रश्नांची उत्तरे आम्ही उपरोक्त अटींमध्ये देतो. प्रशासकीय बाजूच्या भारताच्या मुख्य न्यायाधीशांचे निर्देश प्राप्त करून, निपटारा करण्यासाठी रजिस्ट्रीने नियमित खंडपीठासमोर प्रकरण ठेवावे.
>
> (भर दिला)

१११. न्यायमूर्ती श्री. पी. एस. नरसिंह यांच्या समवर्ती न्यायनिर्णयात, लॉर्डशिप्स यांनी खालील निरीक्षणे केली आहेत की गट कंपनी सिद्धांत हा सही न करणाऱ्याचा लवाद कराराचा पक्ष होण्याचा उद्देश शोधण्यावर आधारित आहे. संबंधित निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत:

> २३०.२ गट कंपनी सिद्धांत हा सही न करणाऱ्याचा लवाद कराराचा पक्ष होण्याचा उद्देश शोधण्यावर आधारित आहे. या सिद्धांतासाठी सही करणाऱ्या पक्षकारांशी थेट संबंध, विषय-वस्तूची समानता, व्यवहाराचे एकत्रित / संकलित स्वरूप, आणि कराराची पूर्तता यासारख्या अतिरिक्त घटकांवरून हेतू एकत्रित करणे आवश्यक आहे.
>
> ......
>
> २३०.४ कलम ८ आणि ४५ मधील "तर्फे किंवा त्याच्या अधीन दावा करणारे" हा शब्दप्रयोग केवळ व्युत्पन्न हक्क प्रदान करण्यापुरता आहे; आणि या शब्दप्रयोगामुळे कोणताही सही न करणारा पक्ष लवाद कराराचा पक्ष म्हणून उदयास येत नाही. क्लोरो कंट्रोल्स (सुप्रा) या निर्णयात गट कंपनी सिद्धांत हा "तर्फे किंवा त्याच्या अधीन दावा करणारे" या वाक्यांशाद्वारे कलम ८ आणि ४५ मध्ये समाविष्ट असल्याचे ठरवणे हे चुकीचे आहे. कलम २(१)(h) आणि कलम ७ मधील "पक्ष" हा शब्द आणि "पक्षाच्या तर्फे किंवा त्याच्या अधीन दावा करणारे" यांच्या संकल्पना वेगळ्या आहेत. हे संविधान पीठाकडे निर्देशित केलेल्या उर्वरित प्रश्नांची उत्तरे देते.

११२. वरील कायदेशीर तत्त्वांचा संदर्भ घेत, आणि विशेषत: सर्वोच्च न्यायालयाने कॉक्स अँड किंग्स (सुप्रा) या निर्णयातील परिच्छेद १३५ आणि १५१ मध्ये केलेल्या निष्कर्षांना विचारात घेतल्यास, पक्षकारांमध्ये कोणताही हेतू किंवा परस्पर हेतू सिद्ध न झाल्यास एखादा स्वाक्षरी न करणारा लवाद कार्यवाहीचा पक्ष बनू शकत नाही. सध्याच्या प्रकरणात विशेषत: याचिकाकर्ता हा स्वाक्षरी न करणारा असून तो कोणत्याही

स्वाक्षरीकर्त्या पक्षाच्या तर्फे किंवा त्याच्या अधीन हक्क प्राप्त करत नाही , म्हणजेच मे. गगन (उत्तरवादी क्र.२) कडून सुद्धा नाही. त्यामुळे, श्री. खांबटा यांचा हा युक्तिवाद स्वीकारणे कठीण आहे की, याचिकाकर्ता, जो लवाद कराराला सही न करणारा होता, त्याचा हेतू याचिकाकर्त्याचा सही करणाऱ्या पक्षकारांशी थेट संबंध असल्याच्या किंवा विषय-वस्तूची समानता, व्यवहाराचे संमिश्र स्वरूप, आणि २५ फेब्रुवारी २०१७ च्या करारपत्राखालील कराराची पूर्तता यासारख्या अतिरिक्त घटकांवरून एकत्रित केला जाऊ शकतो. याचिकाकर्त्याच्या वर्तनातून देखील असा कोणताही संकेत मिळत नाही की याचिकाकर्त्याने लवाद कराराने बांधील राहण्यास संमती दिली आहे, किंवा गट कंपनी सिद्धांत लागू करण्यासाठी आवश्यक असलेला कोणताही घटक अस्तित्वात आहे, किंवा याचिकाकर्ता कोणत्याही प्रकारे लवादातील उत्तरवादी पक्षांशी, विशेषत: उत्तरवादी क्र.९ शी संबंधित आहे, किंवा याचिकाकर्ता मे. गगनतर्फे किंवा अंतर्गत दावा करत आहे. गट कंपनी सिद्धांत लागू करण्यासाठी पक्षकारांची स्वतंत्र कॉर्पोरेट ओळख कायम ठेवत, परस्पर उद्देश सिद्ध होणे आवश्यक असते. सध्याच्या प्रकरणात असा कोणताही परस्पर उद्देश सिद्ध होत नाही की स्वाक्षरीकर्त्यांनी गैर-स्वाक्षरीकर्त्याला लवाद कराराने बांधील करण्याचा हेतू ठेवला होता. म्हणून, याचिकाकर्ता हा लवाद कराराचा पक्ष होऊ शकत नाही.

११३. तसेच, आमच्या मतानुसार, लवाद आणि समेट अधिनियमाचे कलम २(१)(एच) सह कलम ७ चे सुसंगत वाचन लागू करून, ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लि. विरुद्ध मे. डिस्कव्हरी एंटरप्रायझेस प्रा. लि. (सुप्रा) मध्ये प्रतिपादन केलेली एकत्रित घटक (cumulative factor) चाचणी लागू केल्यास, याचिकाकर्त्याला कोणत्याही प्रकारे, एक सही न करणारा पक्ष म्हणून नवीन पक्षकार जोडले जाऊ शकते आणि/किंवा लवादात सहभागी होण्याच्या याचिकाकर्त्याच्या हेतूशिवाय लवाद प्रक्रिया लादली जाऊ शकते, हे स्वीकारण्यास आम्ही प्रवृत्त नाही. आमच्या मते, एम/एस. एमिनन्स यांच्याकडून याचिकाकर्त्यावर अशाप्रकारे लवाद प्रक्रिया लादणे म्हणजेच पक्षस्वातंत्र्य या नियमाचे पूर्णपणे उल्लंघन व त्याचा नाश करण्यास समान आहे.

११४. कॉक्स अँड किंग्स या निर्णयात मांडलेला सिद्धांत सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या अलीकडील निर्णयामध्ये अदव्या प्रोजेक्ट्स प्रा. लि. विरुद्ध विशाल स्ट्रक्चरल्स प्रा. लि. आणि इतर (सुप्रा) या प्रकरणात अनुसरलेला आहे. लवाद करारामध्ये गैर-स्वाक्षरीकर्त्याच्या समावेशासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने पुढील सिद्धांत पुन्हा अधोरेखित केला आहे:

> "३६. कॉक्स अँड किंग्स (सुप्रा) मध्ये, या न्यायालयाने असे ठरवले की, जर स्वाक्षरीकर्ते आणि गैर-स्वाक्षरीकर्ते यांच्या आचरणातून असा परस्पर हेतू दिसून येतो की गैर-स्वाक्षरीकर्त्याला लवाद कराराने बांधील राहायचे आहे, तर गैर-स्वाक्षरीकर्त्याला लवाद करारातील 'पक्ष' मानता येते. असा सही न करणारा पक्ष आहे की नाही हे निश्चित करण्याची चाचणी पुढीलप्रमाणे आहे:"
>
> > १३२. आमच्या मतानुसार, लवादाच्या संमतीवर आधारित स्वरूप आणि आधुनिक व्यापारी वास्तव ज्यामध्ये गैर-स्वाक्षरीकर्ता विविध पद्धतींनी व्यापारी व्यवहारामध्ये गुंतलेला असतो,

यामध्ये संतुलन राखण्याची आवश्यकता आहे. डिस्कव्हरी एंटरप्रायझेस (सुप्रा) मध्ये ठरवलेले घटक एकत्रितपणे लागू केल्यास असे संतुलन साध्य होऊ शकते. उदाहरणार्थ, गैर-स्वाक्षरीकर्ता हा मूळ कराराच्या अंमलबजावणीत अशा प्रकारे सहभागी असेल की त्यातून हे सूचित होते की लवाद करार असलेल्या त्या कराराने तो बांधील राहण्याचा त्याचा हेतू होता, तर हे एक महत्त्वाचे अंग आहे. व्यवहाराचे संमिश्र स्वरूप आणि विषय-वस्तूची समानता यासारखे इतर घटक हे सूचित करतील की, सही न करणाऱ्याविरुद्धचे दावे न्यायाधीकरणाच्या अधिकारक्षेत्राच्या विषय-वस्तूंशी घट्टपणे जोडलेले होते. अशा सर्व घटकांकडे समग्र दृष्टिकोनातून पाहिल्यास, असे अनुमान काढता येते की गैर-स्वाक्षरीकर्ते हे, स्वाक्षरीकर्त्यांशी असलेल्या त्यांच्या संबंधांमुळे व व्यापारातील कर्तव्यांच्या अंमलबजावणीतील सक्रिय सहभागामुळे, जे विषयाशी निकट संबंधात आहेत, प्रत्यक्षात त्या वादासाठी अपरिचित नाहीत.

३६.१ ओएनजीसी विरुद्ध डिस्कव्हरी एंटरप्रायझेस (सुप्रा) या प्रकरणात नमूद केलेले घटक गैर-स्वाक्षरीकर्ते लवाद करारातील 'पक्ष' ठरू शकतात का , हे ठरवण्यासाठी समग्रपणे विचारात घेणे आवश्यक आहे, आणि ते पुढीलप्रमाणे आहेत:

> "४०. एखादी कंपनी गट कंपनी मध्ये असली, परंतु लवाद कराराची स्वाक्षरीकर्ती नसली, तरीही ती त्या कराराने बांधील राहील का, हे ठरवताना कायदा खालील बाबींचा विचार करतो:
>
> (i) पक्षांचा परस्पर हेतू;
>
> (ii)गैर-स्वाक्षरीकर्त्याचा लवाद कराराच्या स्वाक्षरीकर्त्याशी असलेला संबंध;
>
> (iii) विषयवस्तूचे समानत्व;
>
> (iv) व्यवहाराचे संकलित स्वरूप; आणि
>
> (v)कराराची पूर्तता.

३६.२. शेवटी, एसीएच्या कलम ७ अंतर्गत लावादीय करार लेखी असणे आवश्यक आहे या अटीच्या पार्श्वभूमीवर, सही न करणाऱ्या पक्षांकडून लावादीय कराराने बांधील राहण्याचा परस्पर हेतू लेखी स्वरूपात सिद्ध झाला पाहिजे. कराराच्या तयार करण्याच्या, कार्यान्वित करण्याच्या आणि समाप्तीच्या प्रक्रियेत सही न करणाऱ्या पक्षाचे वर्तन आणि त्यासोबतच्या परिस्थिती, जसे की सही केलेल्या पक्षांसोबतचा थेट संबंध, विषयाची समानता आणि व्यवहाराचा संयुक्त/संमिश्र स्वभाव, हे सर्व कराराच्या नोंदीमधून निश्चित केले पाहिजे, जसे की कॉक्स अँड किंग्स (सुप्रा) मध्ये ठरविण्यात आले आहे:

> "२२९. कारण कलम ७(४)(ब) अंतर्गत आणि गट कंपनी सिद्धांत अंतर्गत न्यायालय किंवा न्यायाधीकरणासमोरचा मूलभूत प्रश्न एकच आहे, त्यामुळे हा सिद्धांत कलम ७(४)(ब) मध्ये अंतर्भूत केला जाऊ शकतो. परिणामी, कराराच्या नोंदीत सही न करणाऱ्या पक्षाच्या करार तयार करण्याच्या, कार्यान्वित करण्याच्या आणि समाप्ती या टप्प्यातील वर्तनाचे तसेच त्यासोबतच्या परिस्थितीचे, जसे की सही करणाऱ्या पक्षांसोबतचा त्याचा थेट संबंध,

विषयाची समानता आणि व्यवहाराचा संयुक्त स्वरूप , प्रतिबिंब असल्यास, त्याचा सर्वसमावेशक वापर करून सही न करणाऱ्या पक्षासोबत लावादीय करार अस्तित्वात आहे का हे निश्चित केले पाहिजे. या तपासणीमध्ये सही न करणारा पक्ष हा गट कंपनीतील आहे हे तथ्य निष्कर्षाला अधिक बळकटी देईल. या पार्श्वभूमीवर, गट कंपनी सिद्धांत लागू करण्यात कोणतीही अडचण नाही कारण तो कायद्यातील कलम ७ मध्ये विधिसंगत आधारावर अंतर्भूत आहे.

२३०.१. वादांचे लवादाकडे संदर्भ देण्याचा करार लेखी स्वरूपात असला पाहिजे, तोंडी कराराऐवजी; मात्र त्यावर पक्षांनी सही केलेली असणे बाध्यकारी अट नाही. कलम ७(४)(ब) अंतर्गत, न्यायालय किंवा लवाद न्यायाधिकरण हे सही न करणारा लवाद कराराचा पक्षकार आहे की नाही, हे करारामध्ये पक्षकारांनी वापरलेल्या स्पष्ट भाषेचा अर्थ लावून , तसेच कराराच्या निर्मिती, पूर्तता आणि संपुष्टात आणण्याच्या भोवती असलेल्या परिस्थितीसह जोडून निश्चित करेल. कराराचे अर्थ लावताना आणि त्याची मांडणी करताना, न्यायालये किंवा न्यायाधीकरणे न्यायनिवाड्यास मदत करणारी आणि योग्य निर्णय घेण्यासाठी सहाय्य करणारी प्रस्थापित तत्वे अवलंबू शकतात. गट कंपनी सिद्धांत हे असेच एक तत्व आहे.

३९. त्यामुळे, उत्तरवादी क्रमांक २ आणि ३ यांनी आपल्या वर्तनाद्वारे एलएलपी करारातील करारबद्ध हक्क व जबाबदाऱ्या पार पाडण्याची संमती दिलेली असल्याने, हे स्पष्ट होते की त्यांनी त्या करारातील कलम ४० मध्ये असलेल्या लावादीय कराराने देखील बांधील राहण्यास संमती दिलेली आहे. कारण ते मूळ कराराचे तसेच लावादीय कराराचे पक्ष आहेत, त्यामुळे लवादास एसीएच्या कलम १६ अंतर्गत आणि सक्षमता -सक्षमता (अधिकारक्षेत्र स्वतः ठरवण्याच्या सिद्धांतानुसार) आपले अधिकार वापरताना त्यांना लवाद प्रक्रियेत पक्ष म्हणून नवीन पक्षाला दाव्यात सामील करण्याचा अधिकार आहे.

(यावर विशेष भर दिलेला आहे)

११५. यापुढे, सर्वोच्च न्यायालयाच्या ए.एस.एफ. बिल्डटेक प्रायव्हेट लिमिटेड (सुप्रा) या अलीकडील निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण केले आहे:

"१२६. याच पार्श्वभूमीवर आणि उदयोन्मुख सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय पद्धतींचा विचार करून, कॉक्स अँड किंग्स (आय) (सुप्रा) ने 'गट कंपनी सिद्धांताची' आणि परस्पर संमतीचे निर्धारण करणाऱ्या इतर तत्त्वांची लागूता ओळखली, जेणेकरून सही न करणाऱ्यांनाही लवाद कराराचे पक्षकार म्हणून बांधील केले जाईल, जोपर्यंत ते वास्तविक पक्षकार आहेत आणि त्यांनी अप्रत्यक्षपणे अशा करारास संमती दिली आहे, असे सिद्ध होते. या तत्त्वांचा कायदेशीर आधार फक्त १९९६ च्या अधिनियमाच्या उद्देशाशी संबंधित नाही, तर कलम २(१)(h) आणि ७ या ठोस तरतुदींमध्ये शोधता येतो. तथापि, जर अशा तत्त्वांना प्रत्यक्षात प्रभावी करण्याची शक्ती ओळखली नाही, तर या तत्त्वांची केवळ ओळख ढोंग ठरेल, कारण या संबंधात कोणत्याही स्पष्ट तरतुदीचा अभाव आहे. आमच्या विचारानुसार, सही न करणाऱ्या पक्षाला लवाद प्रक्रियेत नवीन पक्ष म्हणून दाव्यात सामील करण्याची लवादाची शक्ती मान्य करणे हे कलम २(१)(h) आणि ७ या स्पष्ट तरतुदींमधील अपेक्षित उद्देश्य आहे आणि १९९६ च्या

अधिनियमाच्या आराखड्याचा व उद्देशाचा नैसर्गिक परिणाम आहे, तसेच प्रभावी पर्यायी वाद निराकरण प्रणाली उपलब्ध करण्याच्या लवाद कायद्याच्या मूलभूत तत्वांशी सुसंगत आहे."

११६. अशाप्रकारे, लवाद कराराने बांधील राहण्यास सहमती देणारा सही न करणारा पक्ष हा अनिवार्य आणि अशा पक्षाला लवाद कार्यवाहीमध्ये एक पक्ष म्हणून आणण्यासाठी अपरिहार्य असल्याचे ठरविण्यात आले, जे येथील तथ्यांमध्ये नक्कीच घडलेले नाही. याचिकाकर्ता हा खरा पक्ष नाही किंवा त्याने कोणत्याही लवाद करारासाठी मुक संमती दर्शविलेली नाही.

११७. वरील परिस्थितीत, संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयास प्रदान केलेले पूर्ण अधिकारक्षेत्र याचिकाकर्त्याच्या कायदेशीर हक्कांचे उल्लंघन होत असल्याने न्यायाची थट्टा होण्यापासून रोखण्यासाठी वापरणे आवश्यक आहे. लवाद करारात सही न करणारा उत्तरवादी क्रमांक ९ आणि पुन्हा लवाद करार आणि लवाद कार्यवाहीपासून पूर्णपणे अलिप्त अशी संस्था, याचिकाकर्ता, यांच्यातील स्वतंत्र कायदेशीर संबंधांच्या योजनेचा विचार करता, या प्रकरणात न्यायालयाच्या हस्तक्षेपाचा अभाव हा स्पष्ट न्यायाची चूक होण्यास कारणीभूत ठरेल. लवाद प्रक्रियेचा उद्देश केवळ ढोबळ स्वरूपाचा नसतो. लवाद प्रक्रियेतील मूलभूत तत्त्व पक्षीय स्वायत्तता, म्हणजेच लवाद करारातील विरुद्ध पक्ष स्वतःच्या संमतीने वाद निराकरणाची प्रक्रिया स्वीकारतात, हे तत्त्व इतक्या प्रमाणात ताणले जाऊ शकत नाही की, पूर्णतः करारबाह्य व्यक्तींवर, ज्यांचा लवाद वादांशी काहीही संबंध नाही, जे सही न करणारे पक्ष आहेत, ज्यांनी लवाद

न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रास संमती दिली नाही, त्यांच्यावर लवाद प्रक्रिया लादली जाईल, जसे की सदर प्रकरणात झाले आहे.

११८. लवाद न्यायाधिकरण हे दिवाणी प्रक्रिया संहिता मधील ऑर्डर १ नियम ३ आणि त्यासमकक्ष तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करणारे दिवाणी न्यायालय नाही, विशेषतः लावादीय करारात नवीन पक्षांना सामील करणे किंवा न सामील करणे या संदर्भात. कारण लवाद प्रक्रियेत वादाचे निवारण हे दिवाणी दाव्याद्वारे नव्हे तर संबंधित पक्षांनी निवडलेल्या खाजगी मंचावर केले जाते, ज्यास त्यांनी लवाद कराराद्वारे विशिष्ट अधिकारक्षेत्र प्रदान केले आहे. त्यामुळे, लवाद न्यायाधिकरणाने पक्षांना सामील करण्याबाबत किंवा न सामील करण्याबाबतची प्रक्रिया दिवाणी प्रक्रिया संहिता मधील नियमांवर आधारित असू शकत नाही, कारण लवादाची मूलभूत संकल्पना ही अशी आहे की, पक्ष स्वतःच्या संमतीने लवाद न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राला अधीन राहतात. त्यामुळे, गट कंपनी सिद्धांत आणि त्या सिद्धांताद्वारे मान्यताप्राप्त करारबद्ध संबंधांच्या लागूतेवर नियंत्रण ठेवणाऱ्या तत्त्वांना दुर्लक्षित करून, लवाद करारावर सही न करणाऱ्यावर लवाद लादला जाऊ शकत नाही, जसा सर्वोच्च न्यायालयाने कॉक्स अँड किंग्स (सुप्रा) मध्ये निष्कर्ष काढला आहे. या परिस्थितीत, आमच्या मतानुसार, जेव्हा लवाद न्यायाधिकरण जे कायद्यानुसार (एसीए) द्वारे संचालित आहे ते असा आदेश

पारित करते ज्यामुळे स्पष्ट अन्याय होतो, तेव्हा उच्च न्यायालयाने अनुच्छेद २२६ / २२७ अंतर्गत आपले अधिकारक्षेत्र वापरणे अत्यावश्यक ठरते.

११९. या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा विचारात घेणे आवश्यक आहे. हा मुद्दा लवाद कायद्यांतर्गत स्थापित झालेल्या लवाद तत्त्वांपासून झालेल्या विचलनाशी संबंधित आहे. मे. एमिनेन्स यांनी मे. एमिनेन्स आणि मे. गगन यांच्यामधील प्रलंबित लवाद प्रकरणात, याचिकाकर्त्याला उत्तरवादी म्हणून याचिकेत सामील करण्याचा अर्ज दाखल करून केलेली कृती या तत्त्वांपासून चुकीची आहे. योग्य कायदेशीर स्थिती अशी आहे की लवाद करारातील पक्षाविरुद्ध लवाद कायद्याचे कलम २१ मध्ये नमूद केलेल्या पद्धतीनेच लावादीय कार्यवाही सुरू करता येऊ शकते, म्हणजेच ज्याद्वारे लवादासाठी संदर्भ पाठवला जातो तो त्या लवाद करारातील पक्षाकडे पोहोचला पाहिजे. हे एक अत्यावश्यक पूर्वअट आहे. म्हणूनच मे. एमिनेंस यांनी याचिकाकर्त्याविरुद्ध लावादीय कार्यवाही सुरू करण्यासाठी पहिला टप्पा म्हणजे कलम २१ नुसार लवादासाठी दिलेली सूचना याचिकाकर्त्यास पाठवून, त्याची संमती मिळवण्याचा आधार स्पष्ट करणे आवश्यक होते, आणि जर याचिकाकर्त्याने अशा सूचना देऊनही लवाद मान्य करण्यास नकार दिला असता, तर मे. एमिनेंस यांना नंतर कायद्यातील योग्य प्रक्रियेचा अवलंब करता आला असता, आणि त्याच प्रक्रियेत प्रथमदर्शनी हे ठरवले गेले असते की मे. एमिनेंस आणि याचिकाकर्ता यांच्यात कोणती कराराची गोपनीयता आहे का आणि लवादात कोणताही

दिलासा देता येईल का. याच कारणासाठी कलम २१, जे वाचले जाते कलम ८ आणि कलम ११ सोबत त्या अंतर्गत मजबूत यंत्रणा एसीएमध्ये ठेवली आहे. सामान्यतः हेच घडते. परंतु मे. एमिनेंस यांनी केलेल्या कृतीमुळे असे दिसते की या कायदेशीर आवश्यक पूर्वअटींना बगल देत, त्यांनी लवादात "बॅक-डोअर एन्ट्री" मिळवण्याचा प्रयत्न केला आहे आणि थेट लावादीय प्रक्रिया सही न करणाऱ्या आणि संमती न देणाऱ्या याचिकाकर्त्यावर थोपवण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून एसीएतील अशा मूलभूत तरतुदींकडे विद्वान एकल लवाद यांनी वादग्रस्त आदेश पारित करताना दुर्लक्ष केले, ज्याचा परिणाम असा झाला की याचिकाकर्त्यावर लवाद प्रक्रिया लादली गेली आणि आता त्याला लवादाचा निवाडा होईपर्यंत प्रतीक्षा करणे भाग पडेल. आमचे स्पष्ट मत असे आहे की एसीएची योजना अशा अवांछित परिणामासाठी अशा प्रकारे समजली जाऊ शकत नाही, म्हणजेच लवादाचा भाग बनण्यासाठी पक्षाचा कायदेशीर हक्क तपासला जाण्यापूर्वी, विशेषतः जेव्हा सामील केला जाणारा पक्ष तृतीय पक्ष असतो व जे कलम २१ व इतर तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक आहे, ते केवळ सोयीसाठी करता येणार नाही. हे 'सक्षमता-सक्षमता' तत्त्व लागू करून करता येणार नाही. निःसंशय लवाद न्यायाधिकरणाला स्वतःच्या अधिकारक्षेत्रावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे, परंतु स्वतःच्या अधिकारक्षेत्राचा निर्णय घेताना, संमती नसलेल्या तृतीय पक्षावरील अधिकारक्षेत्राचा अभाव, आणि लावादीय करारावर सही न करणारा पक्ष असल्याचा युक्तिवाद, विशेषतः जेव्हा गट कंपनी सिद्धांत लागू होत नाही, अशा प्रकरणात, दुर्लक्षित करून लवाद

न्यायाधिकरण निर्णय देऊ शकत नाही. अशा प्रकारच्या कृतीस एसीएच्या तरतुदींनी मान्यता दिलेली नाही, तसेच यामुळे तृतीय पक्षावर संपूर्ण स्वेच्छाचार थोपवला जाईल. असा पक्ष ज्याला कलम २१ नुसार दिलेल्या सूचनेविरुद्ध स्वतःचे हक्क बचाव करण्याचा कायदेशीर अधिकार आहे, त्याला वंचित ठेवणे योग्य ठरणार नाही, विशेषतः जेव्हा लावादीय प्रक्रियेचा संपूर्ण आधार हा पक्षांची इच्छा, संमती व पक्षीय स्वायत्तता यावर आधारित आहे. अशा तत्त्वांकडे दुर्लक्ष करून कुणावर बळजबरीची अधीनता लादता येणार नाही. लवाद न्यायाधिकरण हे पक्षांनी दिलेल्या अधिकारक्षेत्रापलीकडे जाऊ शकत नाही. अशा पक्षीय स्वायत्ततेच्या तत्त्वांच्या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल ऑर्गनायझेशन फॉर रेल्वे इलेक्ट्रिफिकेशन विरुद्ध ईसीआय एसपीआयसी एसएमओ एमसीएमएल (जे.व्ही.) एक संयुक्त उद्यम कंपनी[38] या न्यायनिर्णयात स्पष्ट केलेले तत्त्व अत्यावश्यक ठरते, म्हणजेच पक्षीय स्वायत्तता, लवाद न्यायाधिकरणाचे अर्धन्यायिक स्वरूप, पक्षपात न करण्याचे तत्त्व इत्यादी तत्त्वांचे पालन करणे लवाद न्यायाधिकरणासाठी आवश्यक आहे.

> ६०. लवादाचे पक्षासोबतचे संबंध हे कराननिष्ठ (contractual) असतात. लवादाचे हक्क व जबाबदाऱ्या हे मुख्यतः पक्षांसोबतच्या करार संबंधांचे परिणाम असतात. [गॅरी बॉर्न, इंटरनॅशनल कमर्शियल आर्बिट्रेशन, (तिसरी आवृत्ती) पृ. २१११.] तथापि, कॉमन लॉ अंतर्गत स्थिती अशी आहे की लवादाचे हक्क आणि कर्तव्ये हे करार आणि राष्ट्राच्या कायद्याने दिलेल्या अर्धन्यायिक दर्जाच्या एकत्रिततेतून प्राप्त होतात. के/एस नॉर्जार्ल ए/एस विरुद्ध ह्युंदाई हेवी इंडस्ट्रीज कं. लि. (के/एस नॉर्जार्ल ए/एस विरुद्ध ह्युंदाई हेवी इंडस्ट्रीज कं. लि., १९९२ क्यूबी ८६३ : (१९९१) ३ डब्ल्यूएलआर १०२५ (सीए)) मध्ये, लॉर्ड ब्राउन- विल्किन्सन यांनी निरीक्षण केले की कराराशी संबंधित बाबी आणि अर्धन्यायिक दर्जाशी संबंधित बाबी यांमध्ये फरक करणे अशक्य आहे. के/एस नॉर्जार्ल ए/एस विरुद्ध

[38] (२०२५) ४ सुप्रीम कोर्ट केसेस ६४१

ह्युंदाई हेवी इंडस्ट्रीज कं. लि., १९९२ क्यूबी ८६३ : (१९९१) ३ डब्ल्यूएलआर १०२५ (सीए) मध्ये लॉर्ड ब्राउन- विल्किन्सन यांनी त्यांच्या अभिप्रायात निरीक्षण केले की करार व दर्जा यांच्या विचारांना "वेगळे करणे अशक्य आहे : प्रत्यक्षात लवादाचे हक्क आणि कर्तव्ये या दोन घटकांच्या संयोगातून निर्माण होतात."] त्याचप्रमाणे ओएनजीसी लि. विरुद्ध अफकॉन्स गुणानुसा जेव्ही (ओएनजीसी लि. विरुद्ध अफकॉन्स गुणानुसा जेव्ही, (२०२४) ४ एससीसी ४८१ : (२०२४) ३ एससीसी (सिव्ह) ६०४) मध्ये, या न्यायालयाने मान्य केले की लवादाचे हक्क आणि कर्तव्ये पुढील स्रोतांमधून निर्माण होतात : (i) लवादाला राष्ट्राच्या कायद्याने प्रदान केलेला अर्धन्यायिक दर्जा, ज्याअंतर्गत लवादाने निष्पक्ष निर्णय करणाऱ्या व्यक्तीप्रमाणे वागणे आवश्यक असते; आणि (ii) पक्षांसोबतचा लवादाचा करार, जो लवाद-पक्ष संबंधाशी संबंधित अनेक पैलू नियंत्रित करतो, त्यात लवादाचे मानधन, गोपनीयता, आणि लवाद कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा यांचा समावेश आहे. [ओएनजीसी लि. विरुद्ध अफकॉन्स गुणानुसा जेव्ही, (२०२४) ४ एससीसी ४८१, परिच्छेद १०२ : (२०२४) ३ एससीसी (सिव्ह) ६०४]

६१. लावादीय न्यायाधिकरण हे अर्धन्यायिक कार्य करते कारण ते परस्पर विरोधी पक्षांचे हक्क व जबाबदाऱ्या निर्णयप्रक्रियेच्या माध्यमातून ठरवते. [श्री इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स लि. विरुद्ध टफ ड्रिलिंग (पी) लि., (२०१८) ११ एससीसी ४७०, परिच्छेद १४ : (२०१८) ५ एससीसी (सिव्ह) १५६] न्यायाधिकरणाला सामान्यतः प्रक्रियात्मक आणि मूलभूत कायद्याच्या आधारे निर्णय किंवा निवाडा देणे आवश्यक असते. लवाद अधिनियम पक्षांना लवाद न्यायाधिकरणाने अनुसरण करावयाच्या प्रक्रियात्मक आणि मूलभूत कायद्याची निवड करण्यास लवचिकता प्रदान करते. लवाद प्रक्रियेच्या दरम्यान, लवाद न्यायाधिकरण सामान्यतः पक्षांनी मान्य केलेल्या ठिकाणी बैठक घेते, स्टेटमेंट ऑफ क्लेम आणि बचाव विचारात घेते, तोंडी सुनावणी आयोजित करते, आणि तज्ञांची नेमणूक करू शकते. त्यामुळे, पक्षकारांच्या हक्कांवर न्यायनिर्णय देण्यासाठी लवाद न्यायाधिकरणे न्यायिकपणे कार्य करतात.

६२. लवाद अधिनियम ही स्वयं-समाविष्ट संहिता आहे. [लवाद करार विरुद्ध ए अँड सी अधिनियम, १९९६ आणि स्टॅम्प अधिनियम, १८९९ मधील आंतरक्रिया २०२४ ६ एससीसी १, परिच्छेद ९२] लवाद अधिनियम आणि करार अधिनियमाखालील कायदेशीर चौकट पक्षकारांच्या त्यांच्या विवादांचे निराकरण करण्यासाठी लवाद न्यायाधिकरणावर अधिकार सोपवण्याच्या करारबद्ध हेतूला मान्यता देते आणि लागू करते. लवाद अधिनियमाचे कलम ८ न्यायिक प्राधिकरणांवर जेथे लवाद करार आहे तेथे पक्षकारांना लवादाकडे निर्देशित करण्यासाठी बंधनकारक करते. लवाद अधिनियमातील इतर तरतुदी देखील न्यायालयाच्या हस्तक्षेपाला अत्यल्प ठेवण्यासाठी [कलम ५, लवाद अधिनियम.] व लवाद न्यायाधीकरणाला त्यांच्या अधिकारक्षेत्राबाबत निर्णय घेण्याच्या क्षमतेची दखल घेण्यासाठी बनविल्या आहेत. [कलम १६, लवाद अधिनियम.].

६३. जरी लवाद अधिनियम लवादाच्या सर्व बाबींवर निर्णय घेण्याबाबत पक्षीय स्वायत्ततेची दखल घेतो, तरीही तो लवाद न्यायाधीकरणाची रचना आणि लवाद प्रक्रीयेच्या संचालनाचे नियमन करण्यासाठी एक प्रक्रियात्मक चौकटही घालून देतो. कलम १२(५) चा समावेश हा स्थापित सिद्धांत मानण्याचे प्रतीक आहे की अर्धन्यायिक प्रक्रीया नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनुसार चालविली पाहिजे. कलम १८ लवाद न्यायाधीकरणाला लवाद प्रक्रीया चालविताना समता व न्यायबुद्धीचे तत्त्व पाळण्याचे मार्गदर्शन करते. त्यामुळे, लवाद अधिनियम लवाद न्यायाधीकरणाला पक्षकारांतील वादांचा निर्णय घेताना न्यायालयीन स्वरूपात वागण्याचे बंधन घालतो. [इंजिनीअरिंग मजदूर सभा विरुद्ध हिंद

सायकल लि., १९६२ एससीसी ऑनलाईन एस सी १३४, परिच्छेद ५; दिवाण सिंग विरुद्ध चंपात सिंग, (१९६९) ३ एससीसी ४४७, परिच्छेद ९]

६४. लवाद कार्यवाहीमध्ये "न्यायालयेसदृश स्वरूप" असल्यामुळे, कायदा लवाद न्यायाधिकरणांना वस्तुनिष्ठपणे कार्य करण्याची आणि "कोणत्याही लहरीशिवाय, आणि कायद्याच्या सामान्य तत्त्वानुसार व नैसर्गिक न्यायाच्या नियमांनुसार न्यायिक पद्धतीने त्यांचे विवेकाधिकार वापरण्याची" मागणी करतो. [ग्रिंडलेज बँक लि. विरुद्ध सेंट्रल गव्हर्नमेंट इंडस्ट्रियल ट्रिब्यूनल, १९८० सप्लीमेंट एससीसी ४२०, परिच्छेद ८ : १९८१ एससीसी (एल अँड एस) ३०९] लवादीय नियुक्तीची रचना किंवा लवादीय कार्यवाहीची प्रक्रिया ही लवाद अधिनियमातील बंधनकारक तरतुदींचे ज्यामध्ये कलम १२ आणि कलम १८ चा समावेश आहे यांचे उल्लंघन करत असल्यास, लवादीय निवाडा रद्द केला जाऊ शकतो. या प्रमाणे, लवाद अधिनियम स्पष्टपणे अधोरेखित करतो की कायद्याची तत्त्वे आणि प्रक्रिया यांचा परस्पर संबंध तुटू शकत नाही.

६६. लवाद पारंपरिक न्यायनिर्णय देणाऱ्या यंत्रणांना प्रभावी पर्याय म्हणून कार्य करतात. लवादांचे उद्दिष्ट असे आहे की, कायदा धीमा असेल तेथे लवाद वेगवान असावेत, कायदा खर्चिक असेल तेथे लवाद स्वस्त असावेत, कायदा तांत्रिक असेल तेथे लवाद सोपे असावेत आणि वाद वाढवणाऱ्या ऐवजी शांतता निर्माण करणारे असावेत. [रेडफर्न आणि हंटर ऑन इंटरनॅशनल आर्बिट्रेशन, (७ वी आवृत्ती, २०२२) पृष्ठ ३.] लवाद निष्पक्ष आणि पारदर्शक सुनावणी घेऊन, तसेच त्यांच्या निर्णयासाठी पुरेशी व ठोस कारणे देऊन त्यांच्या निर्णयप्रक्रियेवर विश्वास निर्माण करू शकतात. सीमेन्स इंजिनीअरिंग केस, (१९७६) २ एससीसी ९८१, पृष्ठ ९८६-८७, परिच्छेद ६: "६. ... जर न्यायालयांचे स्थान प्रशासकीय प्राधिकरणे आणि न्यायाधीकरणे घेणार असतील आणि खरं तर काही प्रकारच्या प्रकरणांमध्ये प्रशासकीय कायद्याच्या वाढत्या प्रसारामुळे तसे करण्याची गरज भासू शकते, तर अशा प्रशासकीय प्राधिकरणांनी आणि न्यायाधीकरणांनी त्यांच्या आदेशांनी प्रभावित होणाऱ्या व्यक्तींना न्याय्य आणि योग्य सुनावणी द्यावी आणि दिलेल्या आदेशांच्या समर्थनार्थ स्पष्ट आणि सुस्पष्ट कारणे द्यावीत. अशानेच अर्ध-न्यायिक कार्य करणाऱ्या प्रशासकीय प्राधिकरणांना आणि न्यायाधीकरणांना त्यांच्या अस्तित्वाचे औचित्य सिद्ध करता येईल आणि निर्णयप्रक्रियेवर लोकांचा विश्वास आणि विश्वासार्हता निर्माण करता येईल. आदेशासाठी कारणे देण्याचा नियम हा दुसरी बाजू ऐकून घ्या या तत्त्वाप्रमाणेच नैसर्गिक न्यायाचा मूलभूत नियम आहे आणि तो प्रत्येक अर्ध-न्यायिक प्रक्रियेमध्ये योग्यभावे पाळला गेला पाहिजे, अन्यथा केवळ नियमाचे दिखाऊ पालन पुरेसे ठरणार नाही."] लवाद न्यायाधिकरणांद्वारे केल्या जाणाऱ्या न्यायनिर्णयाच्या कार्यांमुळे, त्यांच्यातून उद्भवणारे निर्णय स्वतंत्र आणि तटस्थ असलेल्या प्रक्रियेवर आधारित असणे अपरिहार्य आहे.

७०. अनुच्छेद १४ अंतर्गत समानतेची संकल्पना म्हणजे समान वागणूक देण्याचा मूलभूत सिद्धांत आहे. अनुच्छेद १४ चे मूलतत्त्व असे आहे की, सारख्या परिस्थितींमध्ये कायदा सर्व व्यक्तींवर समान रीतीने लागू झाला पाहिजे. एम. नागराज विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, (२००६) ८ एससीसी २१२, परिच्छेद १०६ : (२००७) १ एससीसी (एल अँड एस) १०१३ न्यायनिर्णयाच्या संदर्भात समान वागणुकीचा परिणाम असा की, "समान स्थितीत असलेल्या सर्व वादकारकांना दिलासा मिळवण्यासाठी व बचावासाठी समान प्रक्रियात्मक अधिकार मिळाले पाहिजेत, तेही समान संरक्षणासह व कोणत्याही भेदभावाशिवाय." [श्री मीनाक्षी मिल्स लि. विरुद्ध ए. व्ही. विश्वनाथा शास्त्री, (१९५४) २ एससीसी ४९७, परिच्छेद ६ : (१९५४) २६ आयटीआर ७१३], युनियन ऑफ

इंडिया विरुद्ध मद्रास बार असोसिएशन (युनियन ऑफ इंडिया विरुद्ध मद्रास बार असोसिएशन, (२०१०) ११ एससीसी १, परिच्छेद १०२ : (२०१०) १५६ कॉम्प कॅस ३९२) या निर्णयात संविधान खंडपीठाने स्पष्ट केले की, अनुच्छेद १४ मधील समानतेच्या हक्कामध्ये हा हक्क सामावलेला आहे की, व्यक्तीचे हक्क निष्पक्ष आणि स्वतंत्र न्यायिक अधिकार वापरणाऱ्या न्यायपीठाकडूनच निर्णयित झाले पाहिजेत. अशा प्रकारे, प्रक्रियात्मक समानतेचा घटनात्मक नियम हा निष्पक्ष आणि न्याय्य न्यायनिर्णय प्रक्रियेचा आवश्यक अविभाज्य घटक आहे.

७२. लवाद कायद्याचे (विशेषतः तदर्थ लवादाचे) परिभाषित वैशिष्ट्य म्हणजे, ते पक्षकारांना त्यांच्या इच्छेनुसार लवाद निवडण्याचे स्वातंत्र्य देते. डोमेस्टिक न्यायालये किंवा न्यायाधिकरणे याच्या विपरीत, जेथे न्यायाधीशांच्या पूर्व-निवडलेल्या आणि यादृच्छिकपणे वाटप केलेल्या खंडपीठासमोर पक्षकारांना त्यांचे दावे न्यायप्रविष्ट करावे लागतात. लवाद अधिनियमातील कलम ११(२) अंतर्गत पक्षकारांना लवादांची नियुक्ती करण्यासाठी प्रक्रिया ठरविण्याची परवानगी दिली आहे. कलम ११(२) मधील “प्रक्रिया” म्हणजे लवाद स्वतंत्र आणि निष्पक्षपणे त्यांच्या वादाचा निवाडा करू शकतील अशा लवादांची नियुक्ती करण्यासाठी पक्षकारांनी केलेल्या टप्प्याटप्प्याच्या कार्यवाह्या. लवादांच्या नियुक्तीच्या टप्प्यावर औपचारिक समानता नसल्यास, कोणत्याही पक्षाला पक्षपाती नसलेल्या लवादाच्या नियुक्तीत समान सहभाग मिळणार नाही. लवाद ही अर्ध-न्यायिक प्रक्रिया असल्याने, स्वतंत्र व निष्पक्ष लवादाची नियुक्ती केल्याने लवाद प्रक्रियेदरम्यान पक्षकारांमध्ये प्रक्रियात्मक समानता सुनिश्चित होते. हेच कलम ११(८) अंतर्गतही मान्य केलेले आहे, ज्यामध्ये नियुक्ती करणाऱ्या प्राधिकरणावर स्वतंत्र आणि निष्पक्ष लवाद नियुक्त करण्याची जबाबदारी टाकलेली आहे.

८१. आम्ही स्वीकारतो की लवाद ही एका खाजगी वाद निराकरण यंत्रणा आहे. तरीसुद्धा, ती लवाद अधिनियमांतर्गत समाविष्ट असलेल्या समानता आणि न्यायबुद्धीच्या तत्त्वांना अधीन आहे. लवाद अधिनियमाच्या कलम १८ अंतर्गत लवाद प्रक्रियेत पक्षकारांशी समान वागणूक आणि न्याय्यतेचे पालन करणे हे एक बंधनकारक तत्त्व आहे जे लावादीय प्रक्रियेच्या वर्तनावर लागू होते. म्हणूनच, खाजगी कराराच्या नातेसंबंधातून निर्माण होणाऱ्या वादांचे निराकरण हे काही अंतर्निहित तत्त्वांच्या अधीन असते, ज्यांचे पालन अर्ध-न्यायिक स्वरूप असलेल्या न्यायाधीकरणासारख्या खाजगी लवादाने करणे आवश्यक आहे. समानता आणि न्यायबुद्धीच्या किमान वैधानिक मानकांचे पालन करून खाजगी वादांचे निराकरण करणे हे केवळ न्यायाच्या हितासाठीच आवश्यक नाही, तर भारतातील लवाद प्रक्रियेची शुचिता टिकण्याकरिता देखील अत्यावश्यक आहे.

१२०. उपरोक्त कारणांमुळे, विद्वान एकल लवाद यांनी वादग्रस्त आदेश पारित करताना आमच्या मतानुसार स्पष्टपणे अधिकारक्षेत्राच्या अभावात, किंवा अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या स्पष्ट अभावात कार्य केले आहे , म्हणून वादग्रस्त आदेश कायदेशीरदृष्ट्या दुराग्रही मानावा लागेल. लवादीय कार्यवाहीच्या पार्श्वभूमीवर अंतर्निहित अधिकारक्षेत्र ही संकल्पना समजण्यासाठी पक्षांनी लवाद प्रक्रियेस दिलेले मूलभूत

अधिकार, अधिकारक्षेत्र आणि शक्ती यांचा विचार करणे आवश्यक आहे , म्हणजे पक्षकारांमधील करारपत्र ज्याद्वारे लवादास विशिष्ट वादांचे निराकरण करण्याचा अधिकार प्रदान केला जातो. हेच लवादाचे अधिकार आणि अधिकारक्षेत्र यांचे मूलभूत स्त्रोत आहे. लवाद हा त्याच्यावर पक्षकारांनी लवाद करारांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारक्षेत्राच्या सीमांमध्येच स्वतःला मर्यादित ठेवण्यास बांधील आहे. लवादाकडे असलेले अधिकार लवाद कराराच्या विशिष्ट मर्यादांपलीकडे आणि/किंवा लवाद करारा संबंधित विषय व वादांच्या चौकटीपलीकडे जाऊ शकतात, हे स्वीकारणे अवघड आहे. म्हणून लवाद करारात स्पष्टपणे न दिलेल्या अधिकारांचा लवादाद्वारे उपयोग केला जाऊ शकत नाही. पक्षकारांकडून प्रदान केलेल्या अधिकारांच्या व्याप्तीपलीकडे अशा पद्धतीने केलेला अधिकारांचा वापर हा अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या स्पष्ट अभावातील वापर मानला जाईल. लवादाने स्वतःचे अधिकारक्षेत्र जपून, निर्धारित सीमांमध्ये राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून कार्यवाहीची शुचिता राखली जाईल आणि अंमलात येण्यास सक्षम असलेला निवाडा दिला जाईल. लवाद कार्यवाहीशी पूर्णपणे असंबंधित पक्षकाराला लवाद विवादाच्या न्यायनिर्णयाच्या कक्षेमध्ये आणणे हा प्रक्रियात्मक स्वरूपाचा आदेश नाही, जो अंतर भरण्यासाठी किंवा लवाद करारापुरत्या मर्यादित असलेल्या परिस्थिती हाताळण्यासाठी दिला जातो. दिवाणी न्यायालयाला असलेल्या अंतर्निहित शक्ती आणि लवादाला पक्षकारांनी दिलेल्या अंतर्निहित अधिकारक्षेत्रातील शक्ती यामध्ये फरक आहे. अशा अधिकारक्षेत्राचा वापर करताना ही फरकरेषा

लवादाच्या लक्षात राहणे अत्यंत गरजेचे आहे, विशेषतः जेव्हा पूर्णपणे लवादाच्या निर्णयाच्या क्षेत्राबाहेरील वादांशी संबंधित प्रश्न लवादासमोर येतात. जर अशी स्थिती स्वीकारली गेली की लवाद करारावर सही न करणारे तृतीय पक्ष, जे लवाद प्रक्रियेतील नसून ज्यांनी लवादासाठी संमती दिलेली नाही, त्यांचे हक्क — विशेषतः जमीन व मालमत्तेबाबतचे — पूर्णपणे असंबंधित लवाद प्रक्रियेतील निर्णयासाठी आणले जातील, तर यामुळे केवळ गोंधळ निर्माण होणार नाही तर संपूर्ण लवाद प्रक्रियेची शुचिता दुरूपयोगास आणि नाशास येईल. लवाद स्वतःला अशी सर्वसमावेशक अंतर्निहित अधिकारक्षमता असलेले समजू शकत नाही की तो लवाद प्रक्रियेबाहेरील पक्ष आणि मालमत्ता आपल्या कार्यक्षेत्रात आणू शकेल, विशेषतः जेव्हा लवाद करारातील पक्षकारांनाही अशा विषयावर कोणतेही कायदेशीर हक्क नसतात. लवादास कोणत्याही अप्रत्यक्ष अधिकारांचा आणि/किंवा पक्षांनी न दिलेल्या अधिकारांचा उपयोग करण्याचा प्रश्नच येत नाही. एकदा लवादाला एखाद्या चौकशीमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार नसेल, तर अशा कोणत्याही चौकशीचा प्रत्येक क्षण हा अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या अभावात केलेला असतो.

१२१. वर नमूद केलेल्या तथ्यात्मक परिस्थितीवरील चर्चेमधून स्पष्ट होते की मे. कोक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा) या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने लवाद करारात सही न करणाऱ्या पक्षाला नवीन पक्ष म्हणून दाव्यात सामील करण्यासंदर्भात ज्या कायदेशीर

तत्त्वांची मांडणी केली आहे, ती तत्त्वे सदर प्रकरणातील तथ्यांवर लागू केल्यास, प्रलंबित लवादीय कार्यवाहीमध्ये याचिकाकर्त्याला नवीन पक्ष म्हणून दाव्यात सामील करण्यास परवानगी देत नाही, कारण लवादीय कार्यवाही मुख्यत्वे मे. इमिनन्स आणि मे. गगन यांच्यात आहे. सर्वोच्च न्यायालयाने मे. कोक्स अँड किंग्स लिमिटेड (सुप्रा) मध्ये घालून दिलेली चाचणी म्हणजे पक्षकारांचा हेतू (intention) — आणि कोणत्याही टप्प्यावर याचिकाकर्त्याचा लवाद प्रक्रियेत सहभागी होण्याचा हेतू होता का, हे पाहणे. मे. इमिनन्स पूर्णपणे अयशस्वी ठरले आहे हे दाखवण्यात की याचिकाकर्त्याने कोणत्याही प्रकारे लवादीय कार्यवाहीचा पक्ष होण्यासाठी किंवा लवादामध्ये सहभागी होण्यासाठी संमती दिली आहे, विशेषतः जेव्हा लवादीय कार्यवाही ही मुख्यतः मे. इमिनन्स आणि मे. गगन यांच्यामध्ये होती. पक्षकारांमधील वाद हा [म्हणजे मे. इमिनन्स (उत्तरवादी क्र. १) आणि मे. गगन (उत्तरवादी क्र. २)] करार पत्र दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ अंतर्गत येणारा आहे.

१२२. आम्ही विस्तृतपणे चर्चा केली आहे की दिलासा हा केवळ रकमेच्या वसुलीसाठी आहे आणि विषयांकित मिळकती संबंधी एकमेव दिलासा, ज्याचा उल्लेख आपण वर केला आहे, तो फक्त तेव्हाच लागू होऊ शकतो जेव्हा मे. इमिनन्स आपल्या मुख्य दाव्यात यशस्वी ठरते आणि विनंती कलम (अ) अंतर्गत मागितलेल्या रकमेच्या हुकूम मिळण्यास पात्र ठरते. मे. एमिनन्स चे देयक सुरक्षित करण्यासाठी विषयांकित

मिळकतीवर कोणताही बोजा निर्माण केलेला नाही, हे देखील स्पष्ट आहे. तसेच मे. इमिनन्सतर्फे मांडलेल्या प्रलंबित दावा संदर्भातील युक्तिवादालाही कोणतेही महत्त्व उरलेले नाही, कारण मे. इमिनन्सने कलम ९ च्या प्रलंबित कार्यवाहीदरम्यान प्रलंबित दावा नोंदणी करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु मे. इमिनन्सतर्फे दाखल सदर कलम ९ कार्यवाहीमध्ये प्रलंबित दावा नोंदणीची विनंती दिनांक २२ मार्च २०२४ रोजी फेटाळण्यात आली. त्या नंतरच उत्तरवादी क्रमांक ९ आणि याचिकाकर्ता यांच्यामध्ये दिनांक २९ मार्च २०२४ रोजी हस्तांतरण दस्त करण्यात आला, जो विधिवत नोंदणीकृत असून, विषयांकित मिळकती संदर्भात याचिकाकर्त्याचे हक्क निश्चित करणारा आहे. म्हणूनच, मे. इमिनन्स आणि मे. गगन यांच्या करार पत्र मधून निर्माण झालेले लवादीय न्यायाधीकरण, आपले अधिकारक्षेत्र इतके वाढवू शकत नव्हते की याचिकाकर्त्याने व्यक्त केलेली संमती नसताना, त्याला लवाद कराराने बांधील केले जाईल आणि त्याला लवादीय न्यायाधीकरणाच्या अधिकारक्षेत्रात आणले जाईल. लवादीय न्यायाधीकरणाने घेतलेला दृष्टिकोन हा पक्षीय स्वायत्तता या मूलभूत तत्त्वांच्या विरुद्ध आहे. लवाद न्यायाधिकरण दिवाणी न्यायालयाचे अधिकारक्षेत्र गृहीत धरू शकत नाही. विद्वान एकल लवादाने दिलेला वादग्रस्त आदेश हा संपूर्णपणे अंतर्निहित अधिकारक्षेत्राच्या अभावात दिला गेला आहे. त्यामुळे लवादीय न्यायाधीकरणाकडे याचिकाकर्त्याविरुद्ध असा आदेश देण्याचे अधिकारक्षेत्रच नव्हते.

१२३. मे. इमिनन्स तर्फे मांडण्यात आलेला हा युक्तिवाद की , याचिकाकर्त्याने मे. इमिनन्सने दाखल केलेल्या नवीन पक्षाला दाव्यात सामील करण्याबाबतच्या अर्जाला उत्तर प्रतिज्ञापत्र दाखल करून, लवादीय कार्यवाहीत स्वतःला उत्तरवादी म्हणून सामील करण्यास स्वीकृत किंवा मान्य केले आहे आणि त्यामुळे याचिकाकर्त्याने लवादीय न्यायाधीकरणाच्या अधिकारक्षेत्रास मुक संमती किंवा स्वीकार दिला, हा युक्तिवाद पूर्णपणे न टिकणारा आहे. कारण असे की, मे. इमिनन्सने लवादीय न्यायाधीकरणासमोर याचिकाकर्त्याला उत्तरवादी म्हणून सामील करण्यासाठीचा अर्ज केला होता, म्हणून त्या अर्जाला विरोध करणे आणि प्रथम लवादीय न्यायाधीकरणास हे पटवणे की याचिकाकर्ता लवादीय कार्यवाहीपासून पूर्णपणे परका / असंबंधित आहे, यात काहीही गैर नव्हते. म्हणून याचिकाकर्त्याने उत्तर दाखल केले म्हणजे त्याने लवादीय न्यायाधीकरणाच्या अधिकारक्षेत्रास संमती दिली, असे कोणत्याही प्रकारे म्हणता येत नाही — विशेषतः जेव्हा याचिकाकर्ता सही न करणारा आहे आणि व्यक्त संमती किंवा मुक संमती दोन्ही दिलेली नाही. या कारणासाठी, आम्ही मे. इमिनन्सचा तो युक्तिवादही स्वीकारू शकत नाही की याचिकाकर्त्यासाठी योग्य उपाय म्हणजे , कलम १६(६) अंतर्गत, जर लवादाचा हुकूम / निवाडा याचिकाकर्त्याविरुद्ध झाला, तर नंतर त्या निवाड्याला आव्हान देण्याबाबतचा. अशा प्रकारचा युक्तिवाद स्वीकारणे म्हणजे, सदर प्रकरणाच्या परिस्थितीत, स्पष्ट अन्याय घडवून आणणे ठरेल. तसेच, याचिकाकर्त्यावर त्याच्या संमतीशिवाय लवाद थोपवणे, ही अवैध कृती ठरेल, जी याचिकाकर्त्याच्या

कायदेशीर हक्कांचे उल्लंघन करते, जसे वरील परिच्छेदांमध्ये चर्चा केली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अशा पद्धतीने लवाद थोपवणे हे लवाद नियंत्रित करणाऱ्या मूलभूत तत्त्वांपासून पूर्णपणे विचलित करणारे आहे.

१२४. आम्ही हे देखील निरीक्षण करू शकतो की, निर्दिष्ट प्रकरणात, गट कंपनी सिद्धांताच्या तत्त्वाचा विचार करता, लवादीय न्यायाधीकरणास, लवादीय करारामध्ये सही न करणाऱ्यांना आवश्यक पक्ष म्हणून दाव्यात सामील करण्याच्या अर्जावर निर्णय घेण्याचे अधिकारक्षेत्र नक्कीच असू शकते. तथापि, सदर प्रकरण हे कॉक्स अँड किंग्स (सुप्रा) या न्यायनिर्णयात नमूद केलेल्या अपवाद प्रकारात बसणारे प्रकरण नाही.

१२५. आम्ही मे. एमिनन्स यांच्या वतीने मांडलेल्या या युक्तिवादाशीही सहमत नाही की, एसीए च्या कलम २(१)(एच) अंतर्गत पक्षकारांच्या व्याख्येत सही न करणाऱ्यांचा समावेश आहे म्हणूनच, सध्याच्या तथ्यांमध्ये, याचिकाकर्त्यासारख्या सही न करणाऱ्याला लवाद कार्यवाहीत पक्षकार म्हणून सामील केले जाऊ शकते. पक्षकारांच्या व्याख्येत सही न करणाऱ्यांचा समावेश हा फक्त कॉक्स अँड किंग्स (सुप्रा) या सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान खंडपीठाने मान्य केलेल्या परिस्थितीतच लागू होतो. अगदी कॉक्स अँड किंग्स (सुप्रा) या न्यायनिर्णयातसुद्धा असा कुठल्याही प्रकारचा निष्कर्ष किंवा निर्देश आढळत नाही की, लवादीय करारावर सही न केलेला आणि लवादीय कार्यवाहीच्या विषय-वस्तूपासून पूर्णतः अनभिज्ञ असलेला पक्ष, अशा लवादीय

कार्यवाहीत पक्ष म्हणून सामील केला जाऊ शकतो. म्हणूनच, मे. एमिनन्स यांच्या वतीने मांडलेला सदर युक्तिवाद हा कॉक्स अँड किंग्स (सुप्रा) या सर्वोच्च न्यायालयाच्या कायद्याच्या विरुद्ध आहे.

१२६. याचिकाकर्त्याला लवाद करारातील पक्षकाराचा म्हणजेच उत्तरवादी क्र. २ म्हणजेच मे. गगन प्लॅटिनम स्पेसेस एलएलपीचा हितसंबंधातील उत्तराधिकारी (तर्फे किंवा अंतर्गत दावा करणारा) मानले जाणे आवश्यक आहे, हा युक्तिवादही स्वीकारण्यास आम्ही तयार नाही, याचे कारण असे की उत्तरवादी क्र. ९ - मे. गगन आय-लँड टाऊनशिप प्रायव्हेट लिमिटेड स्वतःच लवाद करारावर सही करणारा नाही, जरी त्याचे हक्क आणि युक्तिवाद विचारात घेऊन तो नंतर लवाद कार्यवाहीत पक्षकार म्हणून सामील केला गेला. खरेतर, मे. एमिनन्सच्या वतीने दिनांक २५ मार्च २०२३ रोजी जारी केलेल्या, लवाद कलम लागू करण्याच्या नोटीसमध्ये उत्तरवादी क्र. ९ - गगन आय-लँड टाऊनशिप प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध लवाद कलम लागू केलेले नाही. असे दिसते की संबंधित वेळी उत्तरवादी क्र. ९ लवाद कार्यवाहीसाठी परका होता. याचे विशेषतः कारण हे आहे की मे. एमिनन्सने जिल्हा न्यायाधीशांसमोर, पुणे येथे लवाद आणि समेट अधिनियमाच्या (एसीए) कलम ९ अंतर्गत दाखल केलेल्या अर्जात उत्तरवादी क्र. ९ ला उत्तरवादी क्र. ८ म्हणून सामील केले होते.

१२७. जर मे. एमिनन्सला प्रश्नांकित जमीन/ मिळकतीबद्दल आणि उत्तरवादी क्र. ९ आणि याचिकाकर्ता यांच्यात झालेल्या हस्तांतरण कराराच्या विषय -वस्तूबद्दल याचिकाकर्त्याविरुद्ध कोणतेही कायदेशीर हक्क असते, तर मे. एमिनन्सने निश्चितच लवाद करारावर सही न करणाऱ्या उत्तरवादी क्र. ९ विरुद्ध, तसेच लवाद करारावर सही न करणाऱ्या याचिकाकर्त्याविरुद्ध उचित कायदेशीर कारवाई करून मांडले असते. तथापि, फक्त एवढ्या कारणावरून की पैशांची मागणी म्हणजे मे. गगन यांना दिलेल्या पैशांच्या वसुलीचा दावा हा लवादीय कार्यवाहीचा विषय आहे, याचिकाकर्त्यास अशा लवादीय कार्यवाहीत ओढणे, जेथे मे. एमिनन्स आणि मे. गगन यांच्या दरम्यानसुद्धा कोणताही लवादीय करार नाही, आणि याचिकाकर्त्याचे हक्क पूर्णपणे वेगळे आहेत, असे करून याचिकाकर्त्यावर लवादीय प्रक्रियेचा बोजा टाकला जाऊ शकत नाही. हे केवळ लवादीय वादाचा स्वरूपच बदलते, असे नव्हे, तर विद्वान लवादावर त्या कराराच्या परिघाबाहेर जाऊन अधिकार वापरणे लादते, आणि ज्या करार पत्राने दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ अंतर्गत वाद उत्पन्न झाले आहेत, त्याच्या बाहेर जाऊन अधिकारक्षेत्र वापरण्यास भाग पाडते.

१२८. न्यायनिर्णय संपवण्यापूर्वी, आम्हाला हे देखील नमूद करणे आवश्यक वाटते की सदर संबंधित न्यायनिर्णयांचा अवलोकन केल्यानंतर इतर काही न्यायनिर्णय देखील देखील उद्धृत केले होते, तथापि, त्या सर्वांचा या न्यायनिर्णयात समावेश करून भार

टाकण्याचा आमचा हेतू नाही, कारण अशा न्यायनिर्णयांमध्ये मांडलेली कायदेशीर तत्व आधीपासूनच सुस्थापित आहेत.

१२९. वरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर, आम्ही या स्पष्ट मताला पोहोचलो आहोत की ही याचिका यशस्वी होणे आवश्यक आहे. त्यानुसार विनंती क्लॉज (अ) आणि (ब) च्या नुसार न्यादेश कायम करण्यात येतो. खर्च नाही.

१३०. या टप्प्यावर उत्तरवादी क्र. १ – एमिनन्सतर्फे विद्वान वकील श्री. कामा यांनी काही काळासाठी या आदेशावर स्थगिती देण्याची मागणी केली आहे. याचिकाकर्त्याच्या वतीने या मागणीला विरोध करण्यात आला. आम्हाला उचित वाटते की या न्यायनिर्णयाची प्रत उपलब्ध झाल्याच्या दिवसापासून चार आठवड्यांच्या कालावधीसाठी या आदेशावर स्थगिती लागू राहील.

(न्यायमूर्ती. अद्वैत एम. सेठना) **(न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी.)**

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x